५५१



यशवंतराव चव्हाण

0954
Y.C.P
M923.60954/Mah
015970
LIBRARY

ना. धों. महानोर

प्रिय श्री.
अरुण आई
आणि शरद नवे
[illegible]
नाशिक [illegible]
तुमचे [illegible]

यशवंतराव चव्हाण

यशवंतराव चव्हाण

Y. B. CHAVAN LIBRARY
- MUMBAI -
CALL NO.: M 923.5095 - MAH
ACC. NO.: 15970
DATE: 05/11/05

ना. धों. महानोर

YASHWANTRAO CHAVAN
Na.Dho. MAHANOR
यशवंतराव चव्हाण
ना. धों. महानोर
© सौ. सुलोचना महानोर

प्रकाशन क्रमांक : ३११

प्रथम आवृत्ती : २५ नोव्हेंबर १९९१

प्रकाशक :
बाबा भांड,
साकेत प्रकाशन प्रा. लि.,
११५, म. गांधीनगर,
रेल्वे स्टेशन रोड, औरंगाबाद- ४३१ ००५.

टाइपसेटिंग :
पेज सेटर्स,
एन- ५, सिडको, औरंगाबाद.

मुद्रक :
संजीव अत्रे,
मुद्रणिका
औरंगाबाद.

मुखपृष्ठ : विकास जोशी

किंमत : ४० रुपये

ज्या सर्वसामान्य जनतेवर
आदरणीय यशवंतराव चव्हाणांनी
आयुष्यभर अकृत्रिम प्रेम केलं त्या
जनतेला-

यशवंतराव चव्हाणांसंबंधी मी खूप ऐकलं होतं. अनेक लोकांकडून त्यांच्या राजकारणासंबंधी, मुत्सद्दीपणासंबंधी, जाणता, सुजाण, सुसंस्कृत नेता म्हणून मी ऐकलेलं होतं. साहित्य-कला-संस्कृतीच्या संबंधीच्या त्यांच्या असाधारण आस्था व प्रेमाबाबत मला अनेकांनी सांगितलं होतं. अनेक आठवणी लोकांनी सांगितल्या. साहित्य कलेच्या क्षेत्रातलं त्यांचं जाणतेपण व अकृत्रिम रसिकता, नवीन ग्रंथांचं वाचन व त्यासंबंधी चर्चा करणं असं अनेकांनी भरभरून मला सांगितलं. विद्यालयात शिक्षण घेत असताना लहानपणी असं खूप काही आम्ही ऐकलं. खूप दिवस त्यांच्यासंबंधी ऐकत गेलो. वृत्तपत्र व आकाशवाणीच्या माध्यमातून सतत यशवंतरावांसंबंधी ऐकून प्रेम व आकर्षण रुजत गेलं. त्यांना कधी समोरासमोर ऐकता येईल, पाहता येईल तर फार चांगलं हे खूप दिवस मनात घर करून असायचं. खूपच लहान खेड्यापाड्यांत, आडवळणाला आम्ही मुलं शिकत होतो. अशा ठिकाणी आपल्याला कधी त्यांची भेट होईल हे शक्यच नव्हतं. मराठी बिगरी ते चौथी असं माझं बालपणाचं शिक्षण तीन वेगवगळ्या दूरच्या खेड्यांमध्ये वणवण करीत झालं. नंतर मराठी पाचवी ते अकरावीचं शिक्षण माझ्या पळसखेडपासून दहा किलोमीटर अंतरावरच्या जळगाव जिल्ह्यातल्या गावी झालं. नंतरची एक-दोन वर्षं जळगावच्या महाविद्यालयात काढली. नंतरचं शिक्षण अर्धवट सोडून मी पळसखेडला माझ्या खेड्यात कायमचा शेतीसाठी आलो. अठराव्या वर्षी घरी आलो तेव्हापासून त्या एक हजार लोकवस्तीच्या खेड्यात आजवर मी आहे. एवढ्या लहान खेड्यात सगळंच जतन करणं अवघड होतं. अशक्यप्राय होतं. मी धडपड करीत राहिलो.

१९५७ची संयुक्त महाराष्ट्राची चळवळ महाराष्ट्राच्या राजकारणाला संपूर्ण कलाटणी देणारी चळवळ झाली. महाराष्ट्राच्या इतिहासात या चळवळीला खूपच महत्त्वपूर्ण स्थान आहे. या चळवळीनं सगळ्यांनाच खूप नव्यानं शिकविलं. नवा इतिहास घडविला. शेंदुर्णी हे जळगाव जिल्ह्यातलं मोठं गाव. शेंदुर्णीच्या परिसरातल्या पंचवीस खेड्यांतले विद्यार्थी त्या वेळी शेंदुर्णीला शिकायला राहायचे. शेंदुर्णीच्या विद्यालयानं, त्या वेळच्या तिथल्या शिक्षकांनी, तिथल्या वाचनालयांनी व त्या वेळच्या राजकीय सामाजिक घडामोडींनी आम्हां विद्यार्थ्यांना खूप शिकवलं. तिथे येणाऱ्या-जाणाऱ्या थोरामोठ्यांनी खोलवरचे संस्कार आम्हांला दिले. नाटकातल्या भूमिका, वक्तृत्व, प्रचंड वाचन, काव्यप्रेम या गोष्टींमुळे मी लोकप्रिय विद्यार्थी होतो. त्याचा वापर त्या वेळचे शेंदुर्णीचे सगळे लोक करून घेत. मी ज्या शिक्षणसंस्थेत शिकत होतो त्या शिक्षणसंस्थेचेच शेंदुर्णीचे गजाननराव गरुड हे तरुण अभ्यासू व तडफदार असे राजकीय कार्यकर्ते होते. १९५७च्या विधानसभेचे ते उमेदवार होते. जळगाव लोकसभा मतदारसंघासाठी मुंबईचे नौशेर भरूचा हे उमेदवार होते. कायद्याचे त्या वेळचे विधी न्यायमंत्री हरीभाऊ पाटसकर यांच्या विरोधात ते उभे होते. समाजवादी पक्षाचे संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे हे दोन्ही उमेदवार मुख्यतः शेंदुर्णी परिसरात सगळी व्यूहरचना करीत असायचे. त्यावेळी मी आठवी-नववीत होतो. मी या समाजवादी पक्षाच्या उमेदवारांसाठी काम करीत होतो. त्यांची सभासम्मेलनं, सभेचं प्रास्ताविक, जेवणखाण असं सगळं मी मनापासून करीत होतो. माझ्याही अंगात कळत-नकळत तो संचार होत गेला. त्या दोन-पाच वर्षांच्या काळात नानासाहेब गोरे, एसेम जोशी, बॅ. नाथ पै, आचार्य अत्रे, बापूसाहेब काळदाते, शाहीर अमर शेख अशा कितीतरी थोर माणसांनी शेंदुर्णीला काबीज केलेलं होतं. खूप लोकप्रियता मिळविली होती. मी या सगळ्या लोकांमध्ये वावरत होतो. त्यांच्या भेटीगाठी व विचारांचे माझ्यावर त्या वेळी खोल

परिणाम झाले. चांगले वाचन व साहित्य- कला मला जवळचं होती. त्याच वेळी या लोकांच्या भेटीगाठींच्या परिणामामुळे समाजकारण, राजकारण थोडं-बहुत आपलं वाटायला लागलं. लहान वयात मर्यादित स्वरूपात का होईना त्यात मी अडकलो. काँग्रेसची परिस्थिती त्या वेळी जवळपास सर्वदूर विदीर्ण झालेली होती. सर्वत्र स्पष्टपणानं काँग्रेसचे उमेदवार पडणार ह्याचं चित्र सगळ्यांसमोर दिसायचं. मोठमोठ्या सभा घेऊन देशातल्या ज्येष्ठ माणसांना लहान-लहान खेड्यांमध्येसुद्धा भाषणांसाठी आणलं जात होतं. सर्वत्र रणधुमाळीचं वातावरण होतं. पळसखेड ह्या माझ्या खेड्याजवळ एका किलोमीटर अंतरावर जळगाव-औरंगाबादच्या सरहद्दीवर वाकोद नावाचं खेडं आहे. पळसखेड व वाकोद तसं एकच झाल्यासारखं आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या ह्या कठीण निवडणूक-काळात वाकोद ह्या खेड्गावी पंतप्रधान जवाहरलाल नेहरू ह्यांची सभा आयोजित केली गेली होती. म्हणजे जवळपास माझ्याच खेड्यात पंतप्रधान नेहरू येणार व मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण येणार म्हणून खूपच धमाल उडालेली होती. लोकांना खूप आनंद झालेला होता. या दोन्ही मोठ्या नेत्यांचं खूप आकर्षण लोकांमध्ये होतं. लहान मुलं, म्हातारे, बायाबापड्या, राजकारणी, सामान्य शेतकरी उत्स्फूर्तपणानं पायी, बैलगाड्यांवर जसं जमेल तसं आले. कित्येक मैलांवरून भाकरी बांधून घेऊन आले. दीड-दोन लाख लोकांची झुंबड वाकोदच्या सभेला त्या वेळी आश्चर्यचकित करणारी वाटायची. आम्ही शाळेतली नववी-दहावीतली मुलं सकाळीच झोपडीत येऊन सभेच्या अगदी समोर जागा घेऊन बसलो होतो. पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी व्यासपीठावर चढण्यापूर्वी एका चिमुरड्या मुलीला गुलाबाचं फूल देऊन तिचा पापा घेऊन सर्वांना नमस्कार केला. मुख्यमंत्री यशवंतराव व पंतप्रधान नेहरू व्यासपीठावर चढताच त्यांनी प्रचंड टाळ्यांचा व घोषणांचा स्वीकार केला. पंतप्रधान नेहरू छानपैकी सोप्या हिंदीत बोलले. यशवंतरावांनी मराठीत भाषण केलं. सुंदर, सोपी मराठी, बोलीभाषेचे,

लोकसाहित्याचे संस्कार व सौंदर्य असलेली कमावलेली भाषा, खेड्यातल्या जीवनातले सुखदुःखांचे आधार घेऊन त्यांच्या प्रश्नांना व शेतकऱ्यांच्या काळजाला हात घालणारं असं यशवंतराव बोलले. लहान-लहान वाक्यं. सुंदर सोपी मराठी. कुठेही अलंकरण नाही. पण ज्या प्रश्नांना घेऊन ते लोकांच्या मनात शिरले त्या त्यांच्या भावनाशील संपन्न भाषणानं दीड-दोन लाख लोक अक्षरशः भारावून गेले. कुणावरही व्यक्तिगत टीका न करता, न रागावता, न चिड-चिड करता शांतपणानं त्या वेळच्या विपरीत सभासंमेलनामध्ये ते बोलत होते. ज्येष्ठ विरोधी नेत्यांच्या विचारांची दखल घेऊन त्यांची सुंदर चिरफाड यशवंतरावांनी केली. आपले विचार पुन्हा पुन्हा ठामपणानं मांडले व सभा जिंकली. समोरची आम्ही पक्की समाजवादी प्रचारक मुलं, पण पार गडबडून गेलो होतो. अर्धेअधिक ढिले झालो होतो. यशवंतरावांसंबंधी : खूप ऐकलेलं होतं. आकर्षण होतं. त्यांना पाहण्याची इच्छा होती. ऐकायची इच्छा होती. त्याप्रमाणे वाकोदच्या सभेमुळे झालं. त्या दिवसापासून हळूहळू यशवंतरावांच्या विचारांच्या ऋणानुबंधात गुंतून पडलो. १९५७ ते थेट डिसेंबर १९७४ पर्यंत मात्र पुन्हा कधीच भेट झाली नाही. काही संबंधच आला नाही. काही कारणसुद्धा नव्हतं. यशवंतरावांजवळ जाता आलं नाही.

१९६० साली जळगाव जिल्ह्यातल्या पाचोरा या गावी कृषी खात्यानं फार मोठं राज्यव्यापी प्रदर्शन भरवलेलं होतं. फार मेहनत घेतली होती. त्याला जोडून शेतकरी मेळावा होता. मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण येणार असल्यानं व शेतकरी मेळावा असल्यानं आम्ही खूप शेतकरी तिथे गेलो. शेतीचं नवीन तंत्रज्ञान, शास्त्रीय ज्ञानाची प्रत्यक्ष शेतीतल्या प्रयोगांमधली गरज व परिवर्तनामुळे येणारी शेतीमधली आर्थिक सुबत्ता असा मुख्य विषय घेऊन परंपरागत शेतीच्या कल्पना दूर सारण्याचं आवाहन

यशवंतरावांनी केलं. ते एका जातिवंत शेतकऱ्याचं भाषण आहे असं आम्हांला वाटलं. परंपरागत शेतीतला चांगला भाग घेऊन नवनवीन जगभरच्या शेतीच्या प्रयोगांची जोड त्याला दिली तर खेड्यांचा व शेतकऱ्यांचा चेहरा बदलेल. त्यासाठी कृषी विद्यापीठांची स्थापना व त्या नव्या प्रयोगाचं ज्ञान शेतकऱ्यांच्या मुलांपर्यंत जावं म्हणून धडपड चाललेली आहे. त्यात नव्या विचारांनी सहभागी व्हावं व शासनालाही मार्गदर्शन करावं असं प्रगत शेतकऱ्यांना व शास्त्रज्ञांना त्यांनी आवाहन केलं. सत्तर टक्के शेतकरी समाजाची आर्थिक स्थिती वाईट आहे, त्यात सुधारणा घडवून आणली तरच राज्य करण्यात अर्थ आहे असं प्रामाणिकपणानं सांगून चार कृषी विद्यापीठांच्या मांडणीची पुढे विभागशः सुरुवात करण्याचं सूतोवाच त्यांनी केलं.

परभणीच्या कृषी विद्यापीठाच्या स्थापना समारंभप्रसंगी त्यांनी केलेल्या भाषणातील हा एक उतारा -

''शेतीच्या शास्त्रीय शिक्षणाचा दृष्टिकोन लोकांमध्ये वाढविला पाहिजे. यासाठी येथे शिकणारे शेतीचे सगळे स्नातक निव्वळ शेतकी खात्याकडे अधिकारी होऊन जाणार असले आणि जावयाच्या शर्यतीमध्ये त्या निमित्ताने पुढे जाणार असले तर मी असे म्हणेन की, ती दुसरी शोकपर्यवसायी गोष्ट होईल. येथे शिकलेला मनुष्य शेतकरीही होऊ शकला पाहिजे. तसे त्याने झाले पाहिजे. तुमची शेती हा निव्वळ तुमचा विचार राहिलेला नाही. तुमची शेती हा देशाचा विषय झालेला आहे. तुमची शेती तुमची आहे तशी ती देशाचीही आहे. तुमची शेती पिकली नाही तर तुमचे नशीब पिकणार नाही एवढाच त्याचा अर्थ नाही, तर त्याचबरोबर देशाचेही नशीब पिकणार नाही.''

आमच्या सगळ्या शेतकरी समाजाच्या मनावर त्यांच्या अशा नव्या विचारांचे खोलवर परिणाम होत गेले. मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणीचं स्थापनेच्या वेळचं त्यांचं भाषण किती दूरदर्शी व खोलवर शेतीचा विचार करणारं आहे हे जाणवलं. राज्य

शासनाचे त्यांचे नवे निर्णय होत गेले. पाणी व दुष्काळी प्रदेशाच्या, मागासलेल्या प्रदेशातल्या शेतीच्या प्रश्नांची यशवंतरावांनी फार आस धरलेली होती. बर्वे कमिशन तसेच पाणी-प्रश्नाची व दुष्काळी कोरडवाहू शेतीला निदान दोन-तीन पाण्याच्या व्यवस्थेची रचना नव्या योजना आखून केली जात होती. तेव्हाच्या त्यांच्या भाषणातला प्रत्येक शब्द, त्यामागची भूमिका व विचार आजही समर्पक आहे. त्या वेळीही तो माझ्यासारख्याला हलवून गेला होता. उजनी धरणाच्या भूमिपूजनाच्या वेळचा दुष्काळी सोलापूर जिल्ह्याच्या निमित्तानं मांडलेला पाणीप्रश्नाचा खालील विचार किती सोपा पण नवा, शेतकऱ्यांना पटणारा व त्यांनी स्वीकारावा असा आहे. हे सगळं ऐकून-वाचून, विचारांनी मी यशवंतरावांच्या जवळ गेलो.

''पंढरीच्या विठ्ठलाच्या या परिसरात, त्याच्या या पंचक्रोशीत आज मोठ्या आनंदानं मी आलो आहे. येताना मनात मी विठ्ठलाला म्हणालो, चंद्रभागा तुझ्या अंगणात पोहचण्यापूर्वीच आज आम्ही तिला अडवली आहे, तिला आज आम्ही साकडे घातले आहे. तुझ्या चरणांजवळ ही चंद्रभागा अठ्ठावीस युगे वाहत आली. या चंद्रभागेला उजनीजवळ आज आम्ही थांबवितो आहोत. महाराष्ट्रातील शेतकरी दरसाल आषाढी कार्तिकी एकादशीला खांद्यावर पडशी टाकून 'ग्यानबा-तुकाराम' म्हणत म्हणत तुझ्या दाराशी येत असतो. त्या ग्यानबा-तुकारामाच्या शेतीत आणि झोपडीत विठ्ठला, आता तू जा. तिथे तुझ्या चंद्रभागेला तू भेट. जनाबाईच्या मदतीला तू धावून गेलास आणि तुझी भक्ती करणाऱ्या तुझ्या सगळ्या भक्तांच्या मदतीलाही तू धावून गेलास. तशीच तुझी भक्ती करणाऱ्या महाराष्ट्राच्या झोपडीत गरीब शेतकऱ्याने आज तुझी चंद्रभागा अडविली आहे. त्यांच्या कल्याणासाठी, त्यांच्या मदतीसाठी विठ्ठला, तू त्यांच्या शेतीत जा. तू आता पंढरपूरच्या मंदिरात राहू नकोस. विठ्ठला, मीही मनोमन प्रार्थना केली आहे. तुकारामाची, ज्ञानेश्वराची, एकनाथाची

आठवण करून मी ही प्रार्थना केलेली आहे. पण कृपा करून आपण हे मात्र लक्षात ठेवा की निव्वळ प्रार्थनेनं हे सगळं घडणार नाही. त्यासाठी तुमच्या कष्टाची गंगा उपसावी लागणार आहे. त्यासाठी जिद्दीनं काम करण्याचा आपण निश्चय करू या.''

पुन्हा आठवण झाली. पाचोऱ्याचा शेतकरी मेळावा झाला. त्या ठिकाणी राधाबाई बुधगावकर आणि त्यांच्या कुटुंबीयांचा लोकनाट्याचा प्रयोग झाला. अस्सल मराठमोळी लोकनाट्यं व खड्या आवाजातल्या लोकसंगीतातल्या रचना यशवंतरावांना प्रभावित करून गेल्या. रसिक साहित्यिक यशवंतराव तिथे पुन्हा जागे झाले. त्यांनी नोंद घेतली. पुढे नेफा-लडाखच्या युद्धाच्या कठीण परिस्थितीत ते संरक्षणमंत्री होते. त्या वेळी राधाबाई बुधगावकर व त्यांच्या कुटुंबीयांचं घरंदाज मराठमोळं वगनाट्य जवानांच्या रंजनासाठी आठवणीनं पाठविलं. त्यांचा नंतर योग्य तो गौरव केला. या सगळ्या घटनांनी मी मनानं त्यांच्या जवळ गेलो मात्र समक्ष जवळीक येण्याचं कधी कारण नव्हतं.

१९६३ साली मराठवाडा साहित्य परिषदेच्या इमारतीचं भूमिपूजन त्यांच्या हातून झालं. रा. गो. साळवी यांच्या 'स्वाधीन की दैवाधीन' पुस्तकाचं प्रकाशन झालं. निझामी राजवटीमध्ये आजवर असलेला मराठवाडा नव्या प्रगतीच्या दिशेनं आहे. विशेषतः मराठी भाषेची निझामी राजवटीत जी गळचेपी झाली होती तीतून सुटका झाली. नव्यानं पुन्हा अशा साहित्य परिषदेसारख्या संस्था व साहित्य चळवळ उभी राहतेय् हे पाहून त्यांनी आर्थिक तरतूद केली. निझामी राजवटीत अडकलेल्या माणसांचा तिथल्याच माणसांनी उठाव करून सोडवणूक केली. विशेषतः साहित्य व संशोधन यात खूप व्यासंगीपणानं काम केलं, ह्याचा त्यांनी मुद्दाम गौरव केला. *'माझी मायबोली आज आली माहेराला'* ह्याचा खूप खूप आनंद त्यांच्या भाषणात ओतप्रोत होता. त्यांचं साहित्यावरलं

भाषण हे एका जातिवंत जाणत्या साहित्यिकाचंच भाषण होतं. मी लांबवर बसून ऐकलं. त्यांच्या संपन्न विचारशील, साहित्यिक व्यक्तिमत्त्वानं मी व माझे कित्येक स्नेही त्यांचे झालो. खेड्यातला माझा संकोच मला दूर घेऊन बसायचा. दूरवर बसून मी त्यांचा झालो.

'रानातल्या कविता' (१९६८), 'वही' (१९७०), 'गांधारी' (१९७३) ही माझी पहिली तीन पुस्तकं खूप गाजली. त्यांनी मला महाराष्ट्राचं केलं. त्याच वेळी जवळपास सगळ्याच विद्यापीठांत ही पुस्तकं अभ्यासक्रमात लागली. त्यांची भाषांतरं अनेक भाषांमध्ये झाली. त्यांवर खूप चर्चा परिसंवाद झाले. चांगलं काव्यवाचन करून मी कविता सर्वत्र पोचविली. ह्या माझ्या पहिल्या तीनही पुस्तकांना महाराष्ट्र राज्याची उत्तम साहित्यनिर्मितीची पारितोषिकं व सन्मान मिळाले. नव्या लेखकांच्या बाबतीत यशवंतराव जागरूक व स्वागतशील असायचे. त्याच्या जवळ जायचे. मलाही हे माहीत होतं, परंतु मला पुष्कळ लोकप्रियता व राज्यमान्यता मिळूनही का कोण जाणे, डिसेंबर १९७४ पर्यंत त्यांची-माझी ओळख झालीच नाही. मी त्यांच्या वाचनातून कसा सुटलो हे कळलंच नाही. यशवंतरावांच्या जवळ जाऊन ओळखदेख करून घेण्याची इच्छा अगोदरच्या अनेक कारणांमुळे व घटनांमुळे होतीच. बोलायची इच्छा होती. एक-दोनदा जिल्हा बँक, जिल्हा परिषदा व इतर विकास-कामांच्या मोठ्या समारंभात ते औरंगाबादला आले. मी राजकीय नेत्यांकडून थोडे प्रयत्न करून पाहिले. पण आमच्याकडले राजकारणी फार भारी. माझ्यासारख्या खेडवळ पोराला व कविता वगैरे लिहिणाऱ्याला ते कसे भेटू देणार? मी खूप लहानपणीच वाचनानं, वाङ्मयीन विचारानं व राजकीय, सामाजिक विचारानं चांगल्या श्रेष्ठ नेत्यांना व लेखकांना ऐकून, त्यांच्या जवळ जाऊन शेंदुर्णीत घडत गेलो. त्यात समाजवादी

प्रभाव होता. पण यशवंतरावांच्या पहिल्याच समक्ष ऐकलेल्या भाषणानं व नंतरच्या आत्मसात केलेल्या विचारांनी मी संपूर्ण त्यांचा झालो होतो. दूरवर राहून मी त्यांच्या प्रेमात पडलो होतो.

१९७४ साली डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात इचलकरंजीला अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन होतं. श्री. पु. ल. देशपांडे हे साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते. त्यांच्या लोकप्रियतेमुळे हजारो चाहते रसिक आलेले होते. विशेषतः चित्रपट, नाट्य, नृत्यसंगीत ह्या क्षेत्रांतही पुलंचे संबंध व कर्तृत्व असल्यानं त्या क्षेत्रांतली मंडळी फार मोठ्या प्रमाणावर संमेलनास होती. राजकारण, समाजकारण अशा अनेकविध क्षेत्रांतले लोक आलेले होते. राजकारण्यांनी व्यासपीठावर येऊ नये असा वाद व चर्चा साहित्य संमेलनापूर्वी महिनाभर गाजत राहिली. पन्नास हजार रसिकांच्या उपस्थितीत संमेलन वाजतगाजत सुरू झालं. यशवंतराव एक श्रोता म्हणून व्यासपीठाच्या समोर लोकांमध्ये येऊन बसले. अनेक उत्साही राजकारणी लोक व उत्साही साहित्यिक यशवंतरावांना व्यासपीठावर जाऊन बसावं म्हणून आग्रह करीत होते. यशवंतराव कोणाचंही न ऐकता शांतपणानं लोकांमध्ये बसले. साहित्य संमेलनात मनापासून सामील झाले. वादातला पारा व अकारणी चर्चा दोन तासांत संपूर्ण संपून गेली होती. साहित्याशिवाय तिथे काहीएक शिल्लक राहिलेलं नव्हतं. तीनही पिढ्यांमधले साहित्यिक संमेलनास आलेले होते. त्या सगळ्या साहित्यिकांत यशवंतराव पूर्णपणानं एकरूप झाले होते. त्यांच्याकडून नवीन लेखन, नवीन साहित्य प्रवाह समजावून घेत होते. नवीन लेखकांशी, अपरिचित लेखकांशी स्वतःच विचारपूस करून जवळीक साधत होते. राजकारणाचा आडपडदा दूर सारून यशवंतराव एक रसिक म्हणून साहित्य संमेलनात वावरत होते.

साहित्य संमेलनात दोन कविसंमेलनं होती. दोन्ही

कविसंमेलनांत श्रेष्ठ कवी व नवोदित कवी अशी सारखी विभागणी करून कविसंमेलनांची चांगली आखणी केलेली होती. श्रेष्ठ कवींचं कविसंमेलन वेगळं व नवोदित कवींचं वेगळं असा प्रकार केलेला नव्हता. तिथं मी पहिल्यांदाच अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावर कविता वाचल्या. कविसंमेलनाच्या अध्यक्षपदी कवी वि. द. घाटे होते. करंदीकर, पाडगावकर, इंदिरा संत अशा नावाजलेल्या कवींनी प्रत्येकी दोन कविता वाचल्या. कविता गाजलेल्या होत्या व चांगलं कविता वाचन करणारे कवी होते. समोर पन्नास हजार लोकांचा रसिक जाणता समुदाय होता. स्वतः संमेलनाचे अध्यक्ष पु. ल. देशपांडे प्रत्येक कवीच्या अगोदर प्रास्ताविक करून कवितेवर बोलत होते. परिचयात्मक बोलत होते. माझी वेळ आली!. *'डोळे थकून थकून गेले. पाखरासारखा येऊन जा'* ही चार ओळींची कविता मी पहिल्यांदा वाचली. सगळं सभागृह टाळ्यांच्या कडकडाटानं भरून गेलं. माझ्या कवितेचं उत्स्फूर्त स्वागत झालं. मी दुसरी पावसाची कविता वाचली. त्या कवितेचं पहिल्यापेक्षाही उत्स्फूर्त स्वागत रसिकांनी केलं. माझ्या आयुष्यातला सगळ्यांत आनंदाचा दिवस. एवढं कधी पाहिलेलं नाही. मी बसायला लागलो तेव्हा सभागृहातले लोक बिल्कुल ऐकायला तयार नव्हते. पुन्हा मी कविता वाचाव्यात असा आग्रह धरून होते. मी रसिकांच्या व संमेलनाच्या अध्यक्षांच्या आग्रहानं पाच-सहा कविता पुन्हा सादर केल्या. मी दुसऱ्या दिवशी होणाऱ्या कविसंमेलनातही कविता वाचणार आहे असं पुलंनी उत्साहात सांगितल्यावर लोक आणखीनच खूश झाले. माझा पहिल्याच संमेलनात पहिला दिवस असा महत्त्वपूर्ण व कवितेला भक्कम करणारा ठरला होता.

सायंकाळी आठ वाजता रात्रीच्या कार्यक्रमात कुमार गंधर्वांचं गाणं होतं. मी तिथेच साहित्यिकांच्या गर्दीत कुठेतरी भटकत होतो. श्री. रणजित देसाई व श्री. जगदीश खेबूडकर मला शोधत त्या ठिकाणी आले.

'ह्या मोटारगाडीत बसा-' रणजित देसाई

'कुठे जायचं?'

'तुम्ही गाडीत तर बसा, मग सांगतो.'

'तरीपण-'

'परराष्ट्रमंत्री यशवंतराव चव्हाणांकडे.'

मी एक शब्दही न बोलता नुस्ता पाहत राहिलो.

साहेबांनी कोल्हापूरचे सर्व कार्यक्रम रद्द केलेले आहेत. व्यंकटेश रंगतंतू मिल्समध्ये ते थांबलेले आहेत. तू त्यांना तुझ्या कविता ऐकवाव्यात अशी त्यांची इच्छा आहे. तुझ्या कवितांनी ते अक्षरशः वेडे झालेले दिसले. आमचा भाव आता थोडा कमी झालाय्, असं सांगून रणजित देसाई मला घेऊन गेले. तिथे रात्रीचं जेवण व कवितांची मैफिल असा कार्यक्रम बांधलेला होता. अनिल, बोरकर, पाडगावकर, बापट, करंदीकर, इंदिरा संत असे आम्ही आठ-दहा कवी त्या रात्री मैफिलीत होतो. संमेलनाध्यक्ष पु. ल. देशपांडे, सुनीताबाई देशपांडे व पन्नास-साठ ज्येष्ठ नामवंत साहित्यिक, शंभरेक राजकारणी, समाज-कार्यकर्ते होते. छान मैफिल झाली. पहाटे तीन वाजेपर्यंत काव्यवाचन व गप्पा झाल्या. अविस्मरणीय अशी ती कवितेची रात्र होती. रात्रीची मैफिल संपल्यावर यशवंतरावांनी मला थांबविलं. त्यांच्याशी बोलताना माझ्या लक्षात आलं की आज दिवसभरात केव्हातरी पुस्तकांच्या दुकानावरून त्यांनी माझे काव्यसंग्रह विकत घेतलेले होते. त्यांनी ते मला दाखविले. ह्याशिवाय आणखी कोणतं लेखन आहे का, असं विचारलं. माझी दोन पुस्तकं माझ्या हाती होती ती मी त्यांना सही करून दिली. माझी इत्थंभूत माहिती त्यांना पाहिजे होती.

'हजार लोकवस्तीच्या एवढ्याशा खेड्यात कसं राहता?'

'घरी सगळे अशिक्षित आहेत तर हा छंद कसा जडला?'

'छंद जडला त्यापेक्षा तो इतका चांगला कसा वाढविला?'

'थोडीशीच बरड शेती. घरातली प्रतिकूल स्थिती-'

'शेतीत काय पिकवता? किती माणसांचं कुटुंब?'

अशी आस्थेवाईकपणे चौकशी करून त्यांनी माझा पत्ता

लिहून घेतला.

मी फारच कमी बोलत होतो व घाबरत होतो, हे त्यांच्या लक्षात आलं होतं. त्यांनी मला मुलासारखं खूप जवळ मायेनं घेतलं. विश्वास दिला. त्यांच्या प्रेमात कायम बांधून ठेवलं.

आता आपण कायम भेटत राहणार असं ते म्हणाले. काहीही अडचण असो संकोच न करता मला भेटा. फक्त तुमच्या कवितेकडे दुर्लक्ष करू नका असं यशवंतराव म्हणाले. इचलकरंजीच्या साहित्य संमेलनानं मला चांगली लोकप्रियता दिली. माझ्या कवितेला शक्ती दिली. रसिक, साहित्यिक जवळ केले. यशवंतरावांसारखा माणूस माझ्या वाट्याला आला. त्यांची-माझी गाठ व्हावी, चांगली ओळख व्हावी असं खूप वर्षांपासून वाटत होतं. इचलकरंजीमध्ये अशा स्थितीत भेट पक्की झाली.

२५ व २६ जानेवारी १९७५ला माझे कार्यक्रम नरहर कुरुंदकरांनी नांदेडला बांधलेले होते. ते संपवून २६ ला रात्री नांदेडहून मी औरंगाबादेला आलो. २७ ला सकाळी घरी जायचं होतं. निघणार त्या वेळी प्रा. चंद्रकांत पाटील ह्या माझ्या मित्राच्या घरी श्री. पांडुरंग साळुंके व श्री. अंकुश भालेकर मोटारगाडी घेऊन काही कामासाठी आलेले होते. ते म्हणाले, आम्ही सिल्लोडकडेच निघालो आहोत, तिथपर्यंत आमच्यासोबत चला. तसंच तुम्हांला घरी जाता येईल. सिल्लोड हा माझा तालुका व मतदारसंघ. त्याच दिवशी सिल्लोडच्या सिद्धेश्वर साखर कारखान्याचं उद्घाटन परराष्ट्रमंत्री यशवंतराव चव्हाण ह्यांच्या हातून होतं. मुख्यमंत्री वसंतराव नाईक, वसंतदादा पाटील, यशवंतराव मोहिते असं अर्धअधिक मंत्रिमंडळ त्या समारंभासाठी आलेलं होतं. सिद्धेश्वर साखर कारखान्याचे अध्यक्ष श्री. माणिकराव पालोदकर ह्यांनी उद्घाटनानंतर पंचवीसेक हजार लोकांची सभा बोलाविलेली होती. सगळे त्या सभेत छान बोलले. त्यानंतर लगेच ह्या पाहुणेमंडळींचं

जेवण व भेटीगाठी सिल्लोडच्या विश्रामगृहावर होत्या. मोठ्या लांबलचक पोलिसांच्या लायनीतच पुढाऱ्यांची लाईन हारतुरे घेऊन उभी होती. त्यांना हात जोडून नमस्कार करीत, भेटी घेत मुख्यमंत्री वसंतराव नाईक, यशवंतराव व इतर नेतेमंडळी व्यासपीठावरून उतरून निघालेली होती. इचलकरंजीत माझी नि यशवंतरावांची ओळख झालेली वृत्तपत्रातून अनेकांना कळलेली होती. माहीत होती. बहुसंख्य लोक मला म्हणाले, ते ठीक आहे. राजकारण्यांचं ओळख व बोलणं तात्पुरतं असतं. पुष्कळदा खोटंही असतं. एवढ्या मोठ्या ठिकाणी यशवंतराव यांनी पुन्हा विचारणं, ओळख ठेवणं शक्य नाही. लोकांच्या ह्या बोलण्यावर विश्वास ठेऊन मी भेटण्याचं टाळलं. समोर गेलोच नाही. अंकुश भालेकर, पांडुरंग व मी पोलिस लाइनीजवळ उभे असताना गर्दीत त्यांना मी नमस्कार केला.

मला पाहून यशवंतराव थांबले. वसंतराव नाईकांना जवळ बोलाविलं. माझी ओळख करून दिली. मी ज्यांच्याविषयी खूप बोललो तो हाच पोरगा- शेतकऱ्यांचा कवी. ते मला विश्रामगृहाकडे घेऊन गेले.सगळं राजकारण व साखर कारखानदारीवरील बोलणं बंद केलं. तिथे असलेल्या सगळ्या मंत्र्यांना, पुढाऱ्यांना माझी चांगली ओळख करून दिली.

'ह्या नभाने या भुईला दान द्यावे
आणि ह्या मातीतुनी चैतन्य गावे'

ही माझी संपूर्ण कविता यशवंतरावांनी पाठ म्हणून दाखविली. *'जरा अस्मान झुकले'* ह्या कवितेच्या दोन ओळी म्हणून दाखविल्या व पुढल्या ओळी मी म्हणाव्यात असा आग्रह धरला. आमचं दोघांचं काव्यवाचन सुरू झालं होतं.

यशवंतरावांच्या नंतर दादासाहेब अन्वीकरांनी माझ्या *'ऊसमळ्याच्या गर्दीत'* या कवितेच्या ओळी व संदर्भ सांगितला.

'वसंतराव, तुम्ही पोटतिडकीनं शेतीवर राखण करता व तासभर बोलता तेच हा कवी दोन कवितांमधून प्रभावी मांडतो. बघा, कसा चांगला शेतकऱ्यांचा मुलगा शोधून काढलाय् मी!''

'यशवंतराव, हा तुमचा मुलगा असेल, पण माझा जावई आहे. जावई असल्यानं तुमच्यापेक्षा माझ्यावर त्याचं जास्त प्रेम राहील.'

'मी काही नवीन सांगितलं म्हणजे तुमचं ते पूर्वपरिचयाचंच कसं असतं, वसंतराव?' यशवंतरावांचा प्रश्न.

माझ्या धाकट्या भावाचा विवाह त्याच वर्षी झालेला होता. त्याला वसंतराव नाईकांच्या मतदारसंघातली बेलोरा गावची मुलगी केलेली असल्यानं नाईकसाहेब गमतीनं तसं म्हणाले होते. वसंतराव नाईक, वसंतदादा सगळ्यांनी मला सांगितलं, मुंबईत विमानात बसल्यापासून इथपर्यंत तुमच्या कविता, कादंबरी इतर माहिती ह्याशिवाय दुसरं यशवंतराव बोलले नाहीत. फार आपुलकीनं सगळं सांगत होते. इतर मंत्री व जिल्ह्यातले पुढारी सांगू लागले की यशवंतरावांचा निरोप होता, कोणी मोठा कवी असा तिकडे आहे त्याला भेटीला घेऊन या.आम्ही खूप फिरलो पण कोणी मोठा कवी भेटला नाही. तुम्हांला ओळखतो, पण तुम्हांला यशवंतराव बोलावतील असं वाटलं नव्हतं.

मग माझ्या लक्षात आलं. आठवड्यापूर्वी पळसखेडला मला दोघं-तिघं येऊन भेटले होते. 'तूसुद्धा थोडीफार कविता लिहितोसच. तुला ठाऊक असेल- कोणीतरी मोठा कवी या भागात आहे म्हणे. त्याची यशवंतरावांशी भेट घालून द्यायची आहे. तुला माहीत असेल तर सांग.' अशी माझ्याकडेच विचारपूस करीत होते.

हे सगळं ऐकून दादासाहेब अन्वीकर व यशवंतराव खूप हसले व व्यथित झाले. त्यांचा बिचाऱ्यांचा काही दोष नाही असं म्हणून गप्प बसले.

इचलकरंजीनंतर तीन आठवड्यांनी यशवंतरावांच्या ह्या भेटीनं-विशेषतः सगळ्यांसमोर त्यांनी कविता वाचल्या, माझी माहिती दिली, खूप आत्मीयता दाखविली, साहित्यावर चर्चा केली यानं मी भारावून गेलो होतो.

सगळ्यांत महत्त्वाचं म्हणजे इकडच्या भागातल्या पुढाऱ्यांना,

ओळख होणं जरुरी होतं. त्यानंतर सर्व वृत्तपत्रांतून ह्या घटनेच्या निमित्तानं खूप लिहून आलं. चर्चा झाली. यशवंतरावांना एक रसिक-साहित्यिक अशा रूपानं आमच्याकडील लोक आता ओळखू लागले. त्याआधी यशवंतरावांचा कवितेशी संबंध कसा काय येईल? कारण काय? असं बोलणारेही काही महाभाग आम्ही पाहिलेले होते. आठवण आली म्हणजे आता मी त्यांना मोकळेपणी दिल्लीला पत्र पाठवू लागलो. त्यांचीही पत्रं येऊ लागली.

२० मे १९७५ ला त्यांचं एक पत्र आलं :

''पत्र लिहीन-लिहीन म्हणत होतो; परंतु एकामागून एक अनेक प्रवास करावे लागल्यामुळे तसेच राहून गेले. आपण पाठविलेला 'वही' काव्यसंग्रह मिळाला. आठवणीनं पाठविल्याबद्दल आभारी आहे. तुम्ही 'गांधारी' दिल्यानंतर मी त्याच वेळी ते वाचून काढले होते. पुस्तकातली कथा ओळखीची वाटली, ग्रामीण जीवनातला गुंता स्पष्टपणे, निर्भीडपणे त्यात मांडला आहे. व्यक्तिचित्रे रेखीव वाटली. खरं सांगायचं तर तुमच्या कवितांतच माझे मन रमते. त्यामुळे तुमच्या कादंबरीहून माझे मन तिकडेच जास्त वळले हे मला कबूल केले पाहिजे. अर्थात तुम्ही गद्यही त्याच जिव्हाळ्याने व सहजतेने वापरू शकता 'गांधारीने' सिद्ध केले आहे, यात शंका नाही. मानवी जीवनातला संघर्ष ,त्यातील सामाजिक असमतोल जिथे जिथे असेल तो जसा तुम्ही 'गांधारी'मध्ये व्यक्त करण्याचा प्रयत्न केला आहे. तसा 'गोदावरी काठच्या' प्रदेशाच्या पार्श्वभूमीवर अनेकविध तऱ्हेने रेखाटता येण्याची शक्यता आहे.

माडगुळकरांची मायदेशी माणसे किंवा पेंडश्यांची कोकणची माणसे त्यांच्या कथा-कादंबऱ्यांत जशी जिवंत उभी राहिली आहेत तशीच मराठवाड्यातील जिवंत प्रतिमा तुमची लेखणी उभी करू शकेल असा विश्वास 'गांधारी'ने उत्पन्न केला आहे यात काही शंका नाही. अर्थात यासाठी तुम्हांला मराठवाडाभर व त्याच्या बाहेरही भटकावे लागेल. अनेकविध थरातील जीवनाचा जागता

शंका नाही. अर्थात यासाठी तुम्हांला मराठवाडाभर व त्याच्या बाहेरही भटकावे लागेल. अनेकविध थरातील जीवनाचा जागता परिचय करून घेतला पाहिजे. हिंदुस्थानच्या इतर भागांतही अधून-मधून जाण्याचा प्रयत्न करीत राहिले पाहिजे म्हणजे वैविध्यपूर्ण विशाल भारतीय जीवनाचा अनुभव तुमचे साहित्य संपन्न करील. अनुभवांची संपन्नता प्रतिभेला साहाय्य करते असे मला वाटते.

'वही' अजून वाचायचा आहे. पुढच्या आठवड्यात प्रवासात जाताना बरोबर घेऊन जाणार आहे. पुन्हा भेटलो तर सांगेन किंवा जमले तर कधी तरी लिहीन.

रानातल्या कविता वाचत असताना बालकवींची आठवण येत होती. परंतु ह्या कवितांमध्ये बालकवींच्या कवितांपेक्षाही काही अधिक आहे असे मला वाटत होते. कविता किंवा कवी यांची तुलना करणे योग्य नव्हे, परंतु फरक काय आहे हे समजून घेण्याचा मी प्रयत्न करीत आहे. काही आठवड्यांपूर्वी दिल्लीला नागपूर येथील मराठीचे तरुण व विद्वान प्राध्यापक सुभेदार 'मराठीतील नव्या वाङ्मयासंबंधी' बोलण्यासाठी आले होते तेव्हा त्यांचे व्याख्यान ऐकण्यास गेलो होतो. ऐकायला गेलो म्हणून अध्यक्ष झालो. त्यावेळी त्यांनी तुमच्या कवितांचे विश्लेषण करताना मी जे शोधायचा प्रयत्न करीत होतो ते एका वाक्यात सांगितले, व मला वाटते ते खरेही आहे. त्यांचे व्याख्यान इंग्रजीत झाले. त्यांनी सांगितले की बालकवींच्या कविता म्हणजे *'It reflects nature'* आणि महानोरांच्या कविता *'It springs from nature'* अकारण तुमची स्तुती करावी म्हणून काही लिहिले नाही. परंतु जे गुण आहेत ते सांगितले पाहिजेत. ते टिकावेत, वाढावेत असा अनौपचारिक सल्ला देणे कितपत बरोबर आहे मला माहीत नाही, परंतु तसे घडावे अशी इच्छा मात्र जरूर आहे.

दिल्लीलाही अवश्य या. पार्लमेंटमध्ये सेशन सुरू असताना या म्हणजे मराठी खासदारांना एकत्र जमवून तुमच्या कविता ऐकविता येतील. कुसुमाग्रजांनी दिल्लीकरांबद्दल तुम्हाला जे

सांगितले ते सर्वांशाने खरे आहे हे कबूल केले पाहिजे, परंतु दिल्ली देशाची राजधानी आहे. तुमच्यासारख्या प्रतिभावान माणसाने हे सर्व पाहिले पाहिजे, अनुभवले पाहिजे.

पत्र फार लांबले. पुन्हा केव्हातरी.

कळावे''

यशवंतरावांची न चुकता पत्रं येत राहिली. मीही पत्रं लिहीत गेलो. साहित्याशिवायच्या अनेक गोष्टी व व्यक्तिगत सुखदुःखं मन मोकळेपणी लिहीत गेलो. शेतीवाडीतल्या अडी-अडचणी, साहित्यातलं नवीन काही असलं तर मी त्यांना मुद्दाम लिहीत गेलो. शेतीत काही नवीन चांगलं निर्माण झालं तर उत्साहानं कळवीत राहिलो. असे संबंध वाढत गेले. दृढ झाले. सगळ्यांना आता नीट माहीत झालं होतं. पळसखेड ह्या चिमुरड्या उदासवाण्या खेड्याला एरवी कोण विचारीत होतं? मला व माझ्या कवितेला तिथे काय किंमत होती? यशवंतरावांच्या व माझ्या संबंधांची सगळ्यांना कल्पना आली तेव्हा महाराष्ट्रातल्या थोरा-मोठ्यांच्याही गाड्या माझ्या घरी येऊ लागल्या. त्यांच्या भेटीचा मला आनंदच होता, परंतु नंतर नंतर दुःख वाढत गेलं. राज्यातल्या मंत्र्यांकडली अडून बसलेली लहान-सहान कामं, मुख्यमंत्र्यांकडली कामं, गुंतागुंतीचे प्रश्न व योजना, तिकीट मागणं, मंत्रिपद मागणं इत्यादी नको त्या अनंत गोष्टींसाठी माझ्यावर तासन्‌तास दडपण आणून, चिठ्ठी, पत्र घेऊन लोक दिल्लीला जाऊ लागले. माझ्यामार्फत त्यांचं काम अधिक चांगलं व निश्चित होईल अशी त्यांची भावना होती. मी खूपच भिडस्त. मोठी माणसं घरी आलेली. नाही कसं म्हणणार? प्रत्येक वेळी इच्छा नसूनही मला यशवंतरावांना लिहावं लागलं. पुण्याला एका समारंभात यशवंतरावांशी माझी गाठ पडली. मी दूर उभा राहायचो. काहीतरी चूक केल्यासारखा माझा चेहरा असायचा. सगळ्यांशी बोलून झाल्यावर

गर्दीतून ते माझ्याकडे आले.

"काय कविराज?"

"ठीक चाललंय्, " मी.

यशवंतराव हसले.

"तुमचा स्वभाव आता मला माहीत झालेला आहे. सदैव कार्यरत असलेल्या उद्योगी लोकांचा मला नीट परिचय-ओळख आहे. तुम्हांला ते सगळं नवीन आहे. तुम्ही ह्या मंडळींना नकार देणं, दुखावणं शक्य नाही. मी योग्य ते काम जरूर करीन. अयोग्य काय ते मला ठाऊक आहे. तुम्ही अकारणी संकोचण्याचं कारण नाही. आमचं हे जग असंच चालत असतं. तुम्ही मला लिहीत रहा."

मी एक शब्दही बोललो नव्हतो.

ते माझ्या मनाच्या तळघरात घुसले.

माझं अवघडलेपण त्यांनी क्षणात दूर केलं.

स्वामी रामानंदतीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, अनंतराव व कित्येक स्वातंत्र्यसेनानींनी हैद्राबाद स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास घडविला. मराठवाड्याला स्वातंत्र्य मिळवून दिलं. माझ्या सोयगाव तालुक्यात व जवळपासच्या जळगाव-अजिंठा परिसरात खूप स्वातंत्र्यसैनिक सरहद्दीवर भूमिगत काम करीत होते. १९४८ ला माझ्या गावात जबरदस्त लढा झाला. दोन माणसं कापली गेली, ते हुतात्मे झाले. माझं खेडं वर्ष-सहा महिने माणसांशिवाय बेचिराख होतं. मला ह्या स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासाचा अभिमान होता आणि आजही आहे. एके दिवशी माझ्या सोयगाव तालुक्यातले कौली ह्या गावाचे ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक श्री. हरीभाऊ गोडबोले माझ्याकडे आले. खूप कामाची कागदपत्रं आणली. मी हबकलो. हरीभाऊ मला म्हणाले-

"तुमचं यशवंतरावांचं इतक चांगलं आहे तर मला

चिठ्ठी द्या.''

''कशासाठी?'' मी.

''मी स्वातंत्र्यसैनिक. लढ्यात एवढं काम केलं आहे. घरी काही फार आधार नाही. आर्थिक स्थिती फार वाईट आहे. तुम्ही मदत करावी असं वाटतं.''

''मी काय करू शकतो?''

''तुम्ही कोणाला तरी सांगा. मी सगळ्या मंत्र्यांना, मुख्यमंत्र्यांना भेटून थकलो. मुंबई-दिल्ली-औरंगाबाद असे हेलपाटे घालून थकलो. आमच्यामुळे ह्या खुर्च्यांवर बसलेले हे लोक आमच्यासाठी काहीएक करू शकत नाहीत. मी थकून गेलो. स्वातंत्र्यसैनिक म्हणून मला पेन्शन मिळाली तर मी जगू शकेन. माझे फार हाल आहेत. तुम्ही दिल्लीला यशवंतरावांकडे चला. माझी हात जोडून विनंती आहे.''

''हे मला अशक्य आहे.'' मी फारच वैतागलो. ते नित्य यायचे. भैरवी सांगायचे.

''प्रत्येकाचं ज्याच्या-त्याच्या कामापुरतं पाहणं व सांगणं असतं. ह्या महिन्यात चिठ्ठी नेणारे तुम्ही शंभराव्वे असणार. मला फार फार मुश्किल झालं. मी मूर्खासारख्या भिडस्तपणानं किती चिठ्ठी द्याव्यात? काय संबंध?'' तरीही मी फार वैतागून हरीभाऊंना चिठ्ठी दिली.

हरीभाऊ दिल्लीला जाऊन यशवंतरावांना भेटले. परराष्ट्र खात्याच्या कामासाठी यशवंतराव युगोस्लाव्हियाकडे त्याच दिवशी निघायचे होते. हरीभाऊंच्या कामासाठी दोन-तीन ठिकाणी त्यांनी फोन केले. गृहमंत्रालय व पंतप्रधानांना फोन केले. ''ऑफिसचे लोक तुम्हांला मदत करतील ते सांगतील तसं करा व संबंधितांना भेटा. गृहखात्याशी संबंधित काही भाग आहे-कागदपत्र पाहिजेत पण संबंधित अधिकारी मदत करतील व पंतप्रधान इंदिरा गांधींची भेट घालून देतील. मी दोन-तीन दिवसांत येतो तोवर थांबा. तुमची सगळी व्यवस्था इथे केलेली आहे. काही अडचणी असल्यास ह्या

मंडळींना निःसंकोच सांगा.'' असं सांगून यशवंतराव निघून गेले.

दोन-पाच दिवसांनी यशवंतराव येणार. पंतप्रधान इंदिरा गांधी आपल्याला भेटूच शकणार नाहीत. खरोखरी हा दिल्लीतला नोकरवर्ग काम करणार काय? दिल्ली-मुंबईत असे खूप खेटे घालण्याचा अनुभव आहे. खूप वाईट अनुभव पदरी आहेत. हरीभाऊंना विश्वास वाटेना.

एवढ्या घाईगर्दीतही यशवंतरावांचं १ जुलै १९७५ ला मला पत्र आलं होतं :

''आपले दिनांक २५ जूनचे पत्र मिळाले. श्री. हरीभाऊ गोडबोले यांच्या पेन्शनबाबत मी प्रयत्न करीत आहे. गृहमंत्र्यांना लिहिण्यासाठी आवश्यक लागणारे कागदपत्र यांचेकडून त्वरित मागवून घेण्यास माझ्या ऑफिसला सूचना दिल्या आहेत. कळावे.''

यशवंतरावांनी पंतप्रधान इंदिरा गांधींना सगळं कळविलेलं होतं. हरीभाऊ हे एवढे मोठे स्वातंत्र्यसैनिक अशा अवस्थेत असणं शोभादायक नाही. महाराष्ट्रातल्या अशा एका कवीकडून ते आलेले आहेत. ते कधीही चुकीच्या माणसाला पाठविणार नाहीत. मी कागदपत्रं, माहिती पाहिली. हैद्राबादलढ्यातले ते स्वातंत्र्यसैनिक आहेत. काही कागदपत्रं अपूर्ण असतील ती मी स्वतः मागवितो. तुम्ही याच भेटीत त्यांना पेन्शन, ताम्रपट असा सन्मान देऊन पाठवा.- पुन्हा बोलतो इत्यादी.

ठरविलेल्या वेळापत्रकाप्रमाणे यशवंतरावांच्या अनुपस्थितीत अधिकाऱ्यांनी मदत केली. पंतप्रधान इंदिरा गांधी हरीभाऊंशी तेरा मिनिटं हैद्राबाद मुक्तिसंग्रामात व त्या काळातल्या घटनांसंबंधी बोलल्या. खूप आस्था दाखविली. परराष्ट्रमंत्री यशवंतराव परत येण्याच्या आत संपूर्ण काम झालेलं होतं.

हरीभाऊ गोडबोले दिल्लीहून आल्यावर सरळ माझ्या घरी आले. खूप-खूप भरभरून बोलले. ओथंबून रडले. त्यांच्या डोळ्यांत सार्थक झाल्याचं, आनंदाचं पाणी मला दिसलं.

यशवंतरावांमधल्या काम करणाऱ्या मंत्र्यापेक्षाही माणूस

म्हणून जी वागणूक त्यांनी दिली, स्वातंत्र्यलढ्यातल्या माणसांसंबंधी, त्या काळातल्या आठवणी व इतिहासासंबंधी जो कळवळा व प्रेम भेटीत व्यक्त केलं, त्याचं मोल किती मोठं असं सांगत हरीभाऊ नंतर सर्वत्र बोलत राहिले. हरीभाऊंच्या शेवटच्या कंटाळवाण्या प्रयत्नात जर यशवंतराव आले नसते तर नव्वदाव्या वर्षांजवळ आज सुखानं हरीभाऊ जगू शकत नव्हते. जगूच शकत नव्हते. तहहयात पेन्शन देऊन आर्थिक तरतूद केली गेली. ताम्रपट व सन्मान देऊन हरीभाऊंच्या निमित्तानं स्वातंत्र्यलढ्यावरच प्रेमच व्यक्त केलं.

१९७५. आणीबाणीचे दिवस होते. खेड्यांत, शहरांत सर्वत्र निराशा होती. लेखन-स्वातंत्र्याच्या बंदीमुळे सर्व बुद्धिवादी मंडळी प्रचंड विरोधात होती. इचलकरंजीच्या साहित्य सफलतेनंतर लगेच वर्षभरात कऱ्हाड ह्या आमच्या गावी यशवंतरावांनी साहित्य संमेलन घेतलं. श्रीमती दुर्गा भागवत ह्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष होत्या. यशवंतरावांच्या अत्यंत कसोटीचा क्षण होता. यशवंतराव स्वतः स्वागताध्यक्ष होते. शेतीमधल्या माझ्या खूप अडचणी त्या वेळी होत्या. मी संमेलनास जाणार नव्हतो. एवढ्या धकाधकीत, घाईत १६ सप्टेंबर १९७५ ला त्यांचं पत्र आलं :

"तुमच्या शेतावर येण्याच्या निमंत्रणाचे आकर्षण आहे. कधी वेळ येईल त्याची वाट पहात आहे. परंतु तत्पूर्वी डिसेंबरमध्ये कराडला होणाऱ्या मराठी साहित्य संमेलनासाठी न चुकता येण्याबाबतचे निमंत्रण मी तुम्हांला देऊन ठेवत आहे. या संमेलनाचा स्वागताध्यक्ष राहून तुम्हां लोकांचे स्वागत करण्याचा माझ्या मित्रांकडून मला आदेश आहे. अर्थात स्वागताध्यक्ष नसतो तरी तुम्हां सर्वांचे कराडला स्वागत करण्यासाठी मुद्दाम हजर झालो असतो. अधून-मधून लिहीत जा.

कळावे''

मला खूप आनंद झाला व शेतीतलं खूपच काही गुंतागुंतीचं असलं तरी ते सोडून कऱ्हाडला जायचं मी निश्चित केलं.

आणीबाणीतले ताणतणाव, निषेधाच्या भाषणांचा आगडोंब इत्यादी सर्व काही पचवून शांतपणानं यशवंतरावांनी कऱ्हाडचं संमेलन खूप यशस्वीपणानं पार पाडलं. कसं ते त्यांनाच ठाऊक! उद्घाटनाच्या पहिल्या दिवशी सायंकाळी सगळं हळुवार, शांतपणानं हाताळून रात्रीच्या साहित्य महामंडळाच्या पदाधिकाऱ्यांच्या आजी-माजी संमेलनाध्यक्षांच्या जेवणाच्या वेळी यशवंतराव व वेणूताई खूप-खूप आतिथ्यशील होत्या. अगदी घरातल्यासारखं आदरातिथ्य व व्यक्तिगत विचारपूस, काळजी घेणं चाललेलं होतं. गप्पा, जेवणावेळीचं खूप मनमोकळं वातावरण होतं. संमेलन उधळलं जाईल असं सर्वत्र बोललं जात होतं. ते संपूर्ण खोटं ठरलं. निव्वळ साहित्य व साहित्यिकांच्या गणगोतात यशवंतराव संपूर्ण साहित्यमय झालेले होते. कुणाविषयी राग नाही. संताप नाही. उलट ते सगळे साहित्यिक लोक रात्री एका उभारलेल्या तंबूत गप्पांमध्ये मनमुराद सामील झालेले होते.

जेवताना मी व नरहर कुरुंदकर जवळ बसलेलो होतो. यशवंतराव व वेणूताई आमच्याजवळ वाढायला आले. ''वेणूताई, महानोर ह्यांना पुरणपोळी व भाजीपाला द्या. ते खरोखरीच व्हिजिटेरियन कवी आहेत म्हणून त्यांना लोक निसर्गकवी म्हणतात. लालजळ, क्रांतिकारी लिहिणारे कुरुंदकर बाजूला बसलेले आहेत त्यांना लाल चिकन रस्सा व तिखट वाढा आणि दुर्गाताई, पुलंनासुद्धा.''

यशवंतराव व वेणूताई स्वतः अशी काळजी घेत राहिले. गप्पागोष्टी, जेवणं झाली. बहुसंख्य साहित्यिक निघून गेल्यावर आदरणीय लक्ष्मणशास्त्री जोशी, दुर्गाताई भागवत, पु. ल. देशपांडे, वसंत बापट, कुरुंदकर मी व आणखी पाच-सात साहित्यिकच मागे उरले. आम्ही खूप वेळ त्या ठिकाणी थांबलो होतो. कोकणी- मराठी

वाद त्या वेळी जोरदार चालला होता. कविवर्य बोरकरांची भूमिका, अट्टाहास, साहित्य अकादमी व दिल्लीतल्या तिथल्या लेखकांची भूमिका, शासनाची भूमिका अशी चर्चा दिल्लीतल्या ताज्या मीटिंगच्या आधारे बराच वेळ चालली. यशवंतरावांनी पुन्हा पुन्हा प्रश्न विचारून ते समजावून घेतलं. काही नोंदी घेतल्या. 'कविवर्य बोरकरांना मी लवकरच भेटतो, चूक की बरोबर हे नंतर. पण त्यांच्यासारख्यांना आधी समजावून तर घेतलं पाहिजे. ऐकून तर घेतलं पाहिजे-' यशवंतराव रात्री एक वाजेपर्यंत न थकता सर्वांशी असं बोलत राहिले.

एक वाजता सगळे साहित्यिक आपापल्या ठिकाणी गेल्यावर तंबूमध्ये राहिले फक्त वसंतदादा पाटील, वृक्षमित्र श्री. धो. म. मोहिते, वेणूताई व मी. पुन्हा एक विषय यशवंतरावांना संपवून टाकायचा होता. चर्चा साहित्यावरून थेट पर्यावरण, झाडं अशा विषयांवर आली.

वृक्षमित्र मोहिते ह्यांना देवराष्ट्रच्या बाजूच्या डोंगराचा आणखी बराच भाग जंगल वाढविण्यासाठी द्यावा, चांगली वनश्री तिथे व्हावी, हरिणं व इतर श्वापदं, पक्षी, अभयारण्य अशी नीट आखणी करून त्यात आर्थिक तरतूद व वाढ करून काही नवे निर्णय घ्यावे. श्री. मोहिते यांना नुसती आर्थिक मदत न देता ह्या कामात रस असलेले कार्यकर्ते जाणीवपूर्वक त्यांच्या पाठीशी उभे करावेत, झाडं, पर्यावरण ह्या कामाच्या संबंधी समाजात, कार्यकर्त्यांत ओढ नाही. हे वाईट आहे, असं काहीतरी वसंतदादा यशवंतरावांना सांगत होते. यशवंतरावांनी वसंतदादांच्या मागणीला दुजोरा दिला. मतं सांगितली. ''दादा, नुस्तं फॉरेस्टसुद्धा उपयोगी नाही. आपलं पारंपरिक फॉरेस्ट फार झालं. ते फारच भोंगळ व तकलादू दिसतंय सर्वत्र. परदेशातल्या चांगल्या फॉरेस्टचा आराखडा पाहून आपणही नीट आखणी करून आता जंगल उभं केलं पाहिजे. तीच ती दोनचार जातींची झाडं लावणार. त्यातही योजनाबद्ध असं सुंदर काहीच कुठे नसतं. म्हणून काळजी घेऊनच आता करा. मी काही लोकांशी

बोलतो.''

हा विषय पूर्ण करून वसंतदादांना बाजूला घेऊन आणीबाणी, राजकीय स्थिती ह्याबाबत काहीतरी चर्चा चाललेली होती. फार गंभीरपणानं दोघंही बोलण्यातच मग्न होते. जवळपास तासभर. मला निघताना म्हणाले, ''तुम्ही भाऊसाहेब खांडेकर, वि. भि. कोलते अशा पाच-सहा लोकांची विशेष काळजी घ्या. त्यांच्याकडे दुर्लक्ष होता कामा नये. त्यांची राहण्याची थोडी गैरसोय झाली होती असं मी ऐकलं. आता अडचण नाही. तरीही काळजी घ्या.''

मी निघण्यापूर्वी यशवंतरावांना म्हणालो, दोन मिनिटं पाहिजेत. रात्रीचे दोन वाजलेले आहेत. तरीही मी काकुळतीनं गडबडून काही बोललोच : 'लक्तरलेली गोधडी' या मथळ्याखाली दोन प्रदीर्घ लेख मी महाराष्ट्र टाइम्स मधून लिहिले. आणीबाणीची मला जाणीव होती, तरीही मी ते लिहिले. राज्यकर्त्यांच्या नाकर्तेपणावर, सरळसरळ मंत्र्यांवर, मुख्यमंत्र्यांवर नाव घेऊन फार कठोर लिहिलं. पंतप्रधानांचंही नाव त्यात आहे. ते कोणीही सहन करणार नाही, हे मान्य होत; पण मी सत्यतेच न राहवून लिहिलं. परवा-परवा बडे पोलिस अधिकारी घरी येऊन गेले. काही प्रश्न विचारले. पुन्हा येणार आहेत असं ऐकलं. त्यात पुन्हा विनोबा भावे यांच्याकडे पवनारला पंतप्रधान इंदिरा गांधी येणार आहेत. आणीबाणी व मानवी हक्कांच्या रक्षणासंदर्भात कठोर पत्रक काढलंय्. त्यावर पु.ल. देशपांडे, दुर्गा भागवत, गो. नी. दांडेकर, कुरुंदकर व मी अशा सात लोकांच्या स्वाक्षऱ्या आहेत. पंतप्रधान आता पवनारला येणार नाहीत. पण त्या लिहिण्यामुळे त्या फार चिडलेल्या आहेत. काहींना कारागृहात टाकणार आहेत अशीही अफवा आहे.

यशवंतराव म्हणाले, ''तुम्ही आता शांतपणानं झोपा. कशाचीच काळजी करू नका. फार भाबडे आहात. यापैकी कोणीही तुरुंगात जाणार नाही. तुम्ही तर बिल्कुल नाही. तुम्ही काही

चुकीचा लेख लिहिलेला नाही. मनातून सगळं झटकून टाका. पहाटे भेटू.''

श्री. गो.नी. दांडेकरांनी मध्यंतरी 'ललित' मासिकात ह्या आणीबाणीतल्या पत्रकाचा उल्लेख करून लेख लिहिल्याचं मला आठवतं. पण नंतर माझी अशीही माहिती होती की मी व आणखी एक दोघांनीच फक्त त्या पत्रकावर सही केलेली होती. बाकीच्यांनी सह्या केल्याच नव्हत्या. अर्थात तो सगळा इतिहास आठवण्यात काही अर्थ नाही. फक्त माझी भूमिका मी यशवंतरावांना सांगितली त्या वेळी त्यांची जी तात्काळ प्रतिक्रिया होती ती मला मोलाची वाटली होती. ही साहित्यिक, सांस्कृतिक आस्था, आणि आणीबाणीचं समर्थन केल्यामुळे एखाद्या बिनकण्याच्या गोंधळ्याला मोठ्या पदावर बसवणाऱ्या इतर राजकीय नेत्यांची तथाकथित आस्था यांच्यातलं अंतर मला जाणवलं ते असं होतं.

एकदा दिल्लीला साहित्यविषयक कुठल्या कार्यक्रमासाठी सात-आठ राज्यांतले सात-आठ कवी बोलविलेले होते. राष्ट्रपती, पंतप्रधान, यशवंतराव असे समारंभाचे पाहुणे होते. ३० व ३१ मे अशी तारीख कळविलेली होती. यशवंतरावांनी पत्र पाठवून आग्रहाचं निमंत्रण मला पाठविलेलं होतं. व्यक्तिगत सविस्तर पत्र त्यासाठी जोडलेलं होतं. दरम्यान काही महत्त्वाच्या राजकीय घडामोडींच्या निमित्तानं पंतप्रधान इंदिरा गांधी, यशवंतराव, संजय गांधी रशियाच्या दौऱ्यावर निघालेले होते व ७-८ जूनला परतणार होते. यशवंतरावांचं पुन्हा पत्र आलं- ३० व ३१ मेऐवजी समारंभ १४ व १५ जूनला बहुधा होईल. तसं वेगळं सविस्तर पत्र येईल. पुन्हा नीट तारखा, दिवस व वेळ कळवितो. जरूर या.

यशवंतरावांना मी पत्र लिहिलं :

७ जूनच्या जवळपास पावसाळा सुरू होतो. मृग नक्षत्र लागतं. शेतीच्या पेरणीला सुरुवात होते. घरात प्रेत असलं तरी

ते झाकून पेरणी आधी करावी असं पेरणीचं महत्त्व तुकारामानं लिहिलेलं आहे. ते बरोबरच आहे. माझे वडील शिकले-सवरलेले नाहीत. पण खूपच बहुश्रुत संपन्न व विचारशील आहेत. सुरुवातीला ते शेतमजूर होते. नंतर थोडी बरड शेती विकत घेतली. स्वतः आई-वडिलांनी विहीर खोदली. खूप कष्ट केले. आता मुलाबाळांनी जमिनीत कष्ट करून तिचं उत्पन्न वाढवावं व सुखानं दोन घास खावेत. आर्थिक परिस्थिती पुन्हा खालावली तर कोणीच विचारणार नाही. म्हणून शेती व तिच्या उत्पन्नात मी गढून जाणं एवढंच आता नीटपणानं करावं अशी त्यांची प्रामाणिक इच्छा आहे. एवढ्याशा माझ्या खेड्यातल्या लिहिण्याला फार मोठ्या दुनियेत कोण विचारणार? लिहिणं-वाचणं पोटापुरतं झालेलं आहे, ते पुष्कळ झालं. पुन्हा वाण्या बाम्हणासारखं कविता इत्यादी लिहून व्यर्थ वेळ घालवू नये. ह्या-बाम्हणाऊ गोष्टी बाम्हण इत्यादी लोकच करू शकतात. ते आपलं काम नाही. पुन्हा त्या नादी लागून शेतीबाडी पडित पडली तर काय? माझ्या मुलांच्या नशिबी पुन्हा दुःखदारिद्र्य नको. मी फार भोगलंय्.

कवितांना पारितोषिकं मिळाली होती. त्या रकमेचा शेतीसाठी खूप अडचणीत उपयोगही झालेला होता, पण बाबांचं मन बदलत नव्हतं. गावातली व जवळपासची सुशिक्षित मंडळीसुद्धा ह्या कवितेच्या नादानं मी बिघडेल असंच सतत सांगत होती. ७ जूनच्या पेरणीच्या वेळी कुठेही जाऊ नये. पेरणी-प्रपंचाचं आधी पाहावं ह्या बाबांच्या विचाराच्या शिस्तीनं, कठोर आदेशामुळे मी दिल्लीच्या कार्यक्रमास ३०-३१ मे ला आलो असतो पण, १३-१४ जूनच्या जवळपास केव्हाच शक्य नाही.

असं सविस्तर पत्र मी यशवंतरावांना लिहिलं व काही कवितांच्या ओळी लिहून पाठविल्या. तुम्हीसुद्धा तुमच्या कर्तव्यनिष्ठेमुळेच रशियाला जात आहात, मीही कर्तव्यनिष्ठा व उपाय नाहीत म्हणून इथे ह्या दिवसांत शेतीत राहिलं पाहिजे असलं काहीबाही पुष्कळदा लिहिण्याचं तारतम्य व भान नसायचं.

दिल्लीला जायची खूप खूप इच्छा होती. एवढा मोठा समारंभ. मनाची खूप गुंतागुंत होत होती, पण काहीच उपाय नव्हता. मनमोकळं असं पहिल्यांदा त्यांना लिहिलं. नंतर असं लिहिल्याचं मला खूप वाईटही वाटत राहिलं.

महाराष्ट्रातल्या दोन-तीन समारंभांमध्ये यशवंतरावांनी माझा गौरवपूर्ण उल्लेख करताना वरीलप्रमाणे मी लिहिलेल्या काही खाजगी गोष्टींचाही गौरवपूर्ण उल्लेख केला.

'संसार करावा नेटका । मग साधावी परमार्थ घुटिका ।।' अशी तुकारामाची ओळ त्यांनी त्या वेळी पुष्टीसाठी दिली. महानोर दिल्लीला आल्यानं जो आनंद झाला असता, त्यापेक्षा अधिक आनंद न आल्यानं झाला. माझ्या पत्राचा आशय ते कुठेतरी सांगत असत. लोकांची मग पत्रं येत. काही लोक मला वृत्तपत्रांची कात्रणं पाठवीत होते. यशवंतराव व मी असे एकमेकामध्ये गुंतून चाललो होतो. एकाच कुटुंबातले झालेले होतो.

१ जानेवारी १९७७ ला मुंबईला श्रीमती लता मंगेशकर यांच्या घरी यावं अशी लताबाईंची जरुरी तार मला आलेली होती. *'जैत रे जैत'* या त्यांच्या चित्रपटासाठी सोळा गाणी मी लिहावी म्हणून मंगेशकरांनी बोलविलेलं होतं. श्रीपाद डोंगरे यांचा औरंगाबादेला माझ्यासाठी फोन होता. निरोप होता 'यशवंतरावांनी १ जाने. १९७७ ला नाशिकच्या दौऱ्यात भेटीसाठी बोलविलेलं आहे. न चुकता यावं.' मी मुंबईला गेलो नाही. नाशिकला गेलो. सायंकाळी छत्रपती शिवाजीमहाराजांच्या पुतळ्याचं अनावरण व मोठी सभा होती. सकाळपासून निफाड तालुक्यात व जवळपास कार्यक्रम होते. निफाडला श्री. विनायकराव पाटलांच्या घराजवळ जेवण, भेटीगाठी व काही मंडळींशी चर्चा होती. खूप गर्दी होती. प्रतापराव भोसले, गोविंदराव आदिक, के. एम. बापू

पाटील, काही मंत्री, साखर कारखान्यांचे अध्यक्ष, नगरचे नेते असे खूप लोक होते. मी तिथे सगळ्यांनाच अनोळखी. दबकूनच कुठेतरी जवळपास घुटमळत फिरत होतो. विनायकरावांसकट कोणाशीही माझा थोडाही परिचय त्या वेळी नव्हता. फक्त श्री. कवरीलाल बागयार या माझ्या मित्राची आई पळसखेडची. त्यांचा-आमचा जिव्हाळा. त्यांच्या घरच्यांच्या ओळखीनं मी थोडा गर्दीत यशवंतरावांकडे जाऊ शकलो. ज्वारीचं दोन फूट लांबीचं सुंदर टपोऱ्या दाण्यांचं कणीस यशवंतरावांच्या हाती देऊन त्यांना मी नमस्कार केला. सगळेच ते कणीस पाहून चकित झाले. मी सगळ्यांना पुन्हा खुलासा केला की सप्टेंबरमध्ये पहिली ज्वार कापून झाल्यावर तिच्याच खोडव्याचं पाणी देऊन पीक घेतलं. त्याच्या खोडव्याचं हे रटूनचं कणीस आहे. म्हणून दाणे अधिक टपोरे व शुभ्र आहेत. हे एकरी २० + १५ क्विंटल येऊ शकेल. शेत उभं आहे फार तर कोणीही पाहून घ्यावं.

कोणती पुण्ये अशी येती फळाला,
जोंधळ्याला चांदणे लखडून जावे

यशवंतराव सहज ओठांवर ओळ गुणगुणत बोलत राहिले. विनायकरावांच्या बाजूच्याच रेस्ट हाऊसवजा घरात सगळे बसलो. ज्वार रटून, कापूस रटून, तूर अशी थोड्या पाण्यामध्ये आठ महिन्यांत दोन पिकं घेऊन आपण स्थिर होऊ शकतो. ह्याचे प्रयोग प्रत्यक्ष केल्याचं मी सांगत होतो. समोरची मंडळी ऊस, द्राक्ष, कांदा अशा श्रीमंत पिकांचा विचार करणारी होती. मी तिथे उगाच आठमाही पाणी व गरिबांच्या अर्थशास्त्राचं बोलत होतो. यशवंतराव फार खूष झाले व म्हणाले, 'हे लिहून काढा व छापा, शेतकऱ्यांमध्ये बोलत राहा. कृषी विद्यापीठातल्या लोकांशी मी बोलतो. त्यांनी हे पाहिलं पाहिजे. समजून घेतलं पाहिजे.'' माझा दिवस सार्थकी लागल्याचा मला आनंद झाला. शेतीतली निर्मिती ही कवितेइतकीच सुंदर असते. तिचं सौंदर्य यशवंतराव मंत्र्यांना व अधिकाऱ्यांना सांगत होते. पुढे ह्या सांगण्याचा खूप उपयोग

झाला.

विनायकरावांच्या त्या घरात काळ्या चौकडीचा मातकट कोट (जो मला चंद्रकांतनं भेट दिला होता) व टोपी घालून मी यशवंतरावांच्या जवळ बसून होतो. दोघंच शेवटी होतो. बाकी मंडळी बाहेर थांबलेली होती. मी त्यांना पाठविलेल्या खाजगी पत्रातला उदासीन सूर, कुटुंबातली खाजगी विचारपूस, त्यातली अडचणीची गुंतागुंत. नवीन विकत घेतलेल्या शेतात- पाच एकरांत पाच विहिरी खोदूनही पाणी मिळालं नाही. मूळ विहिरीचं पाणी नष्ट होऊन नवे बाग वाळून चाललेले आहेत. मोसंबीचा सहा एकरांचा एकमेव असा मला आर्थिक आधार देणारा बगीचा सुकून चाललेला होता. डायबॅक् रोगानं काही झाडं गेली. उरलेली उन्हाळ्याच्या तीव्र झटक्यानं, नष्ट झालेल्या पाण्यानं. भावंडांची शिक्षणं, बहिणींची लग्नं, हुंडा देता येत नाही म्हणून नकार मिळणं. वडिलांच्या नंतर मी कुटुंबप्रमुख. वय फार नसलं तरी जबाबदारी अंगावर आलेली. पुन्हा कर्जबाज़ारी होणं परवडणारं नाही. पण करणार काय? या सगळ्या प्रश्नांच्या व्यापात मी मोडून पडतो आहे. कविता वगैरे कशासाठी घेऊन बसू? सगळा विच्छिन्न संसार समोर उभा आहे. रिकाम्या पोटानं. यातून बाहेर निघण्याची मी खूप धडपड करतो आहे. आपले आशीर्वाद व आधार मला पाहिजेत.

यशवंतरावांच्या डोळ्यांत पाणी आलं. ते थोडा वेळ काहीच बोलले नाहीत. सुन्न झाले. मला पुन्हा उभारी दिली. आधार दिला. ''हे संसारात चालतच राहणार. मी मदत करीन, काळजी करू नका. सगळ्या कुटुंबाला घेऊन चला. त्यांना विश्वास द्या. कुणालाही अंतर देऊ नका. कितीही कष्ट पडोत, त्यांच्यासाठी जास्ती काम करा. एवढी शेतीची सेवा करता ती तुम्हांला चांगले दिवस देईल. दुःखातल्या परिस्थितीला सामोरं जाण्यातच कर्तृत्व आहे. तुम्ही खूप अस्वस्थ दिसता. दिल्लीला माझ्याकडे आठ दिवसांसाठी या. तुम्हांला बरं वाटेल.''

थोड्या वेळानं मंत्री, पुढारी, कार्यकर्ते आमच्याजवळ

घरात आले. पुन्हा गर्दी झाली. खाजगी सगळं मी बंद केलं. पुन्हा सगळ्यांशी माझा परिचय करून दिला गेला. यशवंतराव संरक्षणमंत्री असताना निफाडजवळचा नांदुर्डी गावाचा मुलगा पाकिस्तानच्या आक्रमणाच्या लढाईत हुतात्मा झालेला होता. त्याच्या नावानं नांदुर्डीला वाचनालय काढायचं ठरलेलं होतं. त्या गावी जाऊन यशवंतरावांनी वाचनालयाचं उद्घाटन केलं. चीन-पाकिस्तानच्या आक्रमणांची आठवण देऊन लोकांच्या काळजाला हात घालणारं सुंदर भाषण त्यांनी केलं. वाचनालयं, ग्रामीण वाचनालयं, खेडी, ती सुसंस्कृत, सुशिक्षित व्हावी म्हणून मनानं समृद्ध व नव्या दुनियेची ओळख त्यांना व्हावी म्हणून वाचनालयाच्या गरजेचं त्यांनी सुरेख प्रतिपादन केलं, मंदिरं उशिरा करा पण वाचनालयाची मंदिरं अगोदर गावोगाव करा, असा आग्रह व्यक्त केला.

सायंकाळी छत्रपती शिवाजीमहाराजांच्या पुतळ्याच्या अनावरण समारंभात श्री. बाबासाहेब पुरंदरे व इतर वक्ते होते. यशवंतरावांनी शिवाजीमहाराजांच्या जीवनावर, राजकीय धुरंधरपणावर व दूरदृष्टीच्या समाजाभिमुख निर्णयांवर पुराव्यानिशी नवा प्रकाश टाकला. प्रत्येक ठिकाणी नव्या विषयावर बोलताना यशवंतरावांचे नवीन मुद्दे होते. संदर्भाशिवाय व अभ्यासाशिवाय ते कधी बोललेच नाहीत.

१९७७ साली एप्रिलच्या शेवटच्या आठवड्यात माझे वडील, धाकटी आई, थोरली आई, माझा सर्वांत लहान भाऊ कृष्णा, माझ्या भावाचे सासरे काशिनाथ पाटील वगैरे बद्रीनारायण हरिद्वारच्या तीर्थयात्रेसाठी गेलेले होते. वडिलांची खूप दिवसांची इच्छा होती. हिमालयातली व बाजूची जवळपासची बरीच तीर्थक्षेत्रं पाहून झाल्यावर दिल्लीला दोन दिवस सगळे थांबले. राष्ट्रपती भवन व दिल्लीतली काही महत्त्वाची ठिकाणं पाहण्याची त्यांची इच्छा

होती. परवानगी मिळेना. कोणीतरी म्हणालं, तुमच्या नामदेवचा यशवंतराव चव्हाणांशी परिचय आहे. यशवंतरावांनी मदत केली व फोन केले तर हे होऊ शकेल.

एक-दोघं यशवंतरावांकडे त्यांच्या बंगल्यावर गेले. माझी ओळख सांगितली व चिठ्ठी मागितली. यशवंतरावांनी माझे आईवडील कोणत्या ठिकाणी आहेत त्याची विचारपूस केली व त्यांना घेऊन येण्याची व्यवस्था केली. यशवंतरावांनी १८ व १९ मे असे दोन दिवस त्यांच्याकडे आईवडिलांना थांबवून घेतलं. मनापासून त्यांचं स्वागत-आदरातिथ्य केलं. खूप पाहुणचार केला व दिल्लीतली महत्त्वाची ठिकाणं दाखविण्याची सगळी व्यवस्था केली. राष्ट्रपती भवन, राजघाट, पार्लमेंट, लाल किल्ला इ. सगळं काही दाखविलं गेलं. इंदिरा गांधी व काही नेत्यांच्या भेटी घालून दिल्या. स्वतःच्या घरी आईवडिलांच्यासोबत त्यांनीच फोटो काढून घेतले. यशवंतरावांचे टोपी न घातलेले समुदायातले क्वचितच फोटो असतील. तसे अगदी घरात समोरच्या बागेत टोपीशिवायचे त्यांचे फोटो आहेत. या सगळ्यापेक्षाही महत्त्वाचं म्हणजे माझ्या वडिलांशी दोन्ही आईंशी खूप खूप बोलले. कुठलाही आडपडदा न ठेवता. माझ्यासंबंधी, माझ्या कवितेसंबंधी यशवंतरावांनी आईवडिलांना काय काय सांगितलं असेल, कसं सांगितलं असेल देव जाणे! त्यानंतर बाबांच्या मतांचं संपूर्ण परिवर्तन झालेलं होतं.

७ जूनला तीर्थयात्रा संपवून आई-बाबा घरी पळसखेडला आले, तेव्हा गावाच्या वेशीवर मंदिराजवळ आम्ही सगळ्या पाचही भावंडांनी व आख्ख्या गावानं त्यांचं खूप मोठं स्वागत केलं. माझे वडील कठोर शिस्तीतले, तापट; पण तेवढेच कोमल हृदयाचे. मऊ अंतःकरणाचे. मंदिराजवळ मी त्यांना नमस्कार केला. तेव्हा त्यांनी मला कडकडून मिठी मारली व न राहवून ते मोठ्यांदा रडू लागले. काही बोलू लागले व 'नामदेव, मी तुला ओळखलं नाही. तू जे काय लिहितो- वाचतो त्याला अडथळे आणले. तो तुझा चव्हाणसाहेब देवापेक्षाही देव भेटला. या आजच्या खूप लाखाड

झालेल्या दुनियेत कोण कोणाला विचारतो? त्यानं आमचं फार काही केलं. तू माझा मुलगा, पण त्यांनी तुझी खरीखुरी ओळख करून दिली. मी यापुढे तुला कधीच कवितेसाठी, पुस्तकांच्यासाठी अडविणार नाही. मी सांगतो म्हणून तू दिल्लीला त्यांच्या घरी जाऊन ये. मी शेतीचं सगळं पाहून घेईन. त्यांनी कितीदा तरी बोलविलं पण तू कधीच दिल्लीला जात नाहीस अशी तक्रार त्यांनी केली. इतक्या आत्मीयतेनं आज कोण बोलवितं? तू जाऊन ये.' ओतप्रोत भरभरून बाबा बोलत होते. डोळ्यांत अश्रू होते. नंतर बाबा, आई सतत भेटणाऱ्यांना तीर्थयात्रेच्या माहितीबरोबर यशवंतरावांच्या दिल्लीतल्या भेटीचं सांगायचे. आमच्या घरी शेतीवर यशवंतराव यायचं म्हणताहेत, ते येतील असं सांगायचे. आपण परिस्थितीनं फार गरीब, पण ते आले तर गावाची दिवाळी साजरी करू. केवढा माणूस. खूप साधा. मनानं आभाळाएवढा. माझ्या खेड्यात, आजूबाजूच्या खेड्यांत अशी माहिती तालुकाभर गेल्यावर हे सगळं खोटं, मूर्खपणाचं आहे, थापा आहेत असंच बहुसंख्य लोक म्हणायचे. त्यांचं आम्हांला कधीच काही वाईट वाटलं नाही. बाबा, दोघी आई, भावंडं व आमचं कुटुंब खूष होतं. नव्या आनंदात दुःख विसरून बडून गेलेलं होतं.

दरवर्षी संत मुक्ताईची पालखी पैठणला जाताना माझ्याकडे मुक्कामाला असते. त्या मुक्ताईचा हा प्रसाद आहे, कृपा आहे, अशी बाबांची दृढ भावना होती. आता एकादशी व द्वादशी असे दोन दिवसांचे मुक्काम भजन-कीर्तन-प्रवचन माझ्या घरी बांधले गेले. टाळ- मृदुंगाच्या गजरात नामसंकीर्तन व सेवा करण्याचं व्रत बाबांनी अधिक उत्साहात अंगीकारलं.

बाबा तीर्थयात्रेला गेल्यावर शेतावरच्या सगळ्या विहिरींचं पाणी खूप कमी झालेलं होतं. केळीचे बाग सुकून गेले होते. केळी अर्धीअधिक तरी हाती यावी म्हणून आम्ही सगळ्या भावंडांनी रात्रंदिवस विहिरीत खोदकाम सुरू ठेवलेलं होतं. सपाटून खोदकाम, बॅस्टिंग बोअर करणं असं विहिरींवर युद्धपातळीवर चाललेलं होतं.

एप्रिल-मेमधली उन्हाची धग, प्रचंड तीव्र उन्हाळा, त्या होरपळीनं बाग व फळझाड सुकून जाणं, थोडा पैसा होता तोही नष्ट होणं, खाजगी बँकेचं कर्ज शोधत फिरणं ह्या सगळ्या गोष्टींमुळे दोन महिन्यांत आम्ही अक्षरशः हतबल झालेलो होतो. कोलमडून गेलो होतो. झोपच लागेना.

कोरडवाहू शेतीची पुन्हा खूप मशागत केली. पाऊस वेळेवर चांगला झाला. पेरणी चांगली उतरली. पुन्हा नवीन अंकुर फुटू लागले. हिरव्या पिकांनी आमच्या आशा पल्लवित होऊ लागल्या. आम्ही यशवंतरावांच्या संबंधांमुळे आणखी अविश्रांत परिश्रमाला लागलो. शेती माऊलीवर विश्वास ठेवला. उन्हाळ्यातलं हे आमचं मोडून टाकणारं दुःख व परिस्थिती फारशी बाबांना कळू दिली नाही. त्यांच्यापासून काही गोष्टी चोरून ठेवल्या. लहान भावांचे तळहात विहिरींमधले लोखंडी पाईप ओढून दगडधोंडे काढून सोलून गेले होते. रक्तबंबाळ झालेले होते. विहीर खोदणाऱ्या एका मजुराचा पाय तुटून खांड पडलं होतं. कसातरी तो आमच्या प्रयत्नानं वाचला. आम्ही फार काही न सांगता मुकाट बसलो पुन्हा मृग नक्षत्रानंतर बाबा घरी आल्यावर नवं पर्व सुरू केलं. खूप जिद्दीनं पिकांची आखणी केली. महिन्या-दीड महिन्यात आयुष्यात कधी नाही इतकं सुंदर, समृद्ध पिकातलं शेत मी पाहत होतो. दुःख विसरत होतो. यशवंतरावांनी बाबांना गुरुमंत्र दिलेला होता. आता मी मनापासून हिरवंगार शेत व हिरव्या बोलीच्या कवितेत गुरफटून गेलो होतो.

यशवंतरावांनी सांगितल्यानंतर बाबांनी स्वतः मला लेखन वाचनासाठी व त्यासाठी फिरण्याला मोकळीक देऊ केली हे माझ्यासाठी चांगलं झालं. पण परिस्थितीनं, व्यवहारानं मला ते शक्य नव्हतं. आता जंबाबदारी म्हणून ते बरोबर वाटत नव्हतं. पुन्हा श्रीमती लता मंगेशकरांचं पत्र घरी आलेलं होतं. 'जैत रे जैत'च्या गाण्यांसाठी श्रीमती भारती मंगेशकरांनी सविस्तर दोन पेजिस् पत्र लिहून मला पुन्हा पुन्हा मुंबईला यायचा आग्रह धरला

होता. बाबा म्हणाले, 'मी म्हणतो म्हणून या कामासाठी ताबडतोब जा.' मी मुंबईला त्यांच्या सांगण्यावरून ताबडतोब गेलो व 'जैत रे जैत' साठी सोळा गाणी लिहून देऊन घरी आलो. आश्चर्य म्हणजे बाबा एकदा मला म्हणाले, 'तू कविता लिहितोस. मला त्यातलं काही समजत नाही. समजलं नाही तरी चालेल, तुझी कविता मला एकदा सांग.' मी सांगितलं, 'यशवंतराव आपल्याकडे निश्चित येणार आहेत ना? त्यांच्याजवळ तुम्ही आपल्या शेतात बसा, तेव्हा मी खूप कविता तुम्हांला ऐकवीन.'

असं छान चाललेलं. दुःखातून सुखाकडे. नव्या बहराकडे. माझा भाऊ नारायण नवीन मोसंबीची रोपं घेऊन नव्यानं नवीन शेतात बाग करायचा म्हणून घेऊन आला. पुन्हा दहा एकर मोसंबी झाडं लावायचं ठरलं होतं. जुनी बाग जळाल्याचं दुःख विसरून जायचं होतं. पहिल्या दुसऱ्या दिवशी पाचशे-सहाशे मोसंबीची रोपं लावून झाली. रात्री बाबांनी बांधलेल्या मोसंबीच्या रोपांच्या गढ्यावर तांब्याभर पाणी टाकलं. मला बोलविलं. मी रात्री एक वाजता खडबडून उठलो. त्यांच्याजवळ गेलो. बाबांनी रुमालानं घाम पुसला. मला त्यांच्या खाटीवर बसवलं व माझ्या खांद्यावर हात टाकला व म्हणाले,

'सगळ्यांना नीट सांभाळ. श्रीराम!' एवढंच.

दुखलं नाही. आजारपण नाही. बाबा आमच्यातून गेले. सगळी देव-दैवतं, भजन-कीर्तन त्यांना आवडणारं सगळं केलं. त्यांनी शब्द टाकला म्हणून तीर्थयात्रेला त्यांना पाठविलं. २० जुलै १९७७ ला आम्ही एकाएकी पोरके झालो. पुन्हा दुःख, कुठेच कोणी खऱ्या अर्थानं जवळ नव्हतं. फार असा कुणाचा आधार नव्हता. शेतीतल्या प्रश्नांची, नष्ट झालेल्या विहिरींची, नव्या कर्जाची गुंतागुंत अवघड होती. त्यापेक्षाही काही घरगुती, कौटुंबिक अडचणी होत्या. अडाणीपण होतं. तो संसाराचा गुंता फक्त

बाबांच्या कठोर शिस्तीनं व धाकानं सुटणारा होता. फक्त आता दूर कुठे तरी यशवंतरावांच्या दिव्याची मंद वात होती. तेवढीच मला प्रकाशाकडे नेणारी आहे अशी आशा वाटायची. पण ती फार फार दूर होती. काहीच सुचत नव्हतं.

थोरल्या आईला मी एकटा मुलगा व एक मुलगी व धाकट्या आईची चार मुलं, दोन मुली. सगळी माझ्यापेक्षा लहान. एक बहीण व दोघं भाऊ लग्नाचे राहिलेले. फारच प्रतिकूल परिस्थितीत बाबांनी थोडी शेती, घरदार-संसार उभा केलेला. मी कॉलेज सोडून अठराव्या वर्षी शेतीत आलो. धाकट्या भावंडांची शिक्षणं, विवाह असा व्याप सांभाळला. शेती माझ्यापरीनं सांभाळली. सगळं कुटुंब गरिबीत पण एकत्र सुखानं नांदत राहिलं. सगळ्यांचं एकमेकांवर खूप प्रेम, श्रद्धा व विश्वास. प्रपंचातले प्रश्न खूप त्रासदायक झाले; तरीही सगळ्यांना सांभाळून मी त्यांच्या पाठीशी उभा राहिलो. कुणाला कधी दुखावलं नाही. अंतर वाटावं असं कधी वागलो नाही. पळसखेड हे माझं लहान गाव. एक हजार-दीड हजार लोकवस्तीचं. पण माणसं फार उपद्व्यापी. त्रास देणारी. अकारणी काहीही संबंध नसताना माझ्यासारख्या काही नवीन करू पाहणाऱ्याला त्यांनी खूप त्रास त्या काळात दिला. त्यांची मानसिक वाढच झालेली नाही असं मला वाटायचं. १९६७-६८ हे केशवसुत जन्मशताब्दीचं वर्ष. मला त्या वर्षाचं महाराष्ट्र राज्याचं खूप मोलाचं केशवसुत पारितोषिक मिळालेलं होतं. 'रानातल्या कविता'चं फार मोठं स्वागत महाराष्ट्रभर झालं. माझ्या गावातल्या पुढाऱ्यांनी माझ्याविरुद्ध सभा घेऊन हे किती सामान्य आहे, शासनाचं कसं चुकलं, त्यांना कविता कशी कळत नाही, तुकाराम-ज्ञानेश्वरा-सारखं लिहिलं पाहिजे इत्यादी भाषणं करून हे पारितोषिक रद्द करावं असं निषेधाचं भाषण इत्यादी करून पारितोषिक स्वीकारायच्या वेळेपर्यंत वाद आणला व स्वतःचं अडाणीपण सिद्ध करीत राहिले. तिथे काय बोलावं? शेतीत नवे प्रयोग केले. उभारणी केली. पाण्याची पाईपलाईन तोडून टाक,

केळीचे घड कापून ओसाड विहिरीत फेकून दे अशा घटना फक्त मानसिक ताप देण्यासाठी व मला नेस्तनाबूत करण्यासाठी चाललेल्या होत्या. या सगळ्या आधीच्या व काही आतल्या बारीक गोष्टी इच्छा नसूनही मी एक-दोनदा यशवंतरावांजवळ बोललो होतो. संकोच ठेवला नव्हता. मला शेती व आर्थिक स्थिती सांभाळण्यापेक्षाही कुटुंबातली लहान-थोर माणसं, त्यांच्या भावना व प्रश्न सांभाळणं जास्त महत्त्वाचं वाटलं. जबाबदारीनं मी आजवर ते नीट सांभाळलं. सगळं कुटुंब सुखात आहे. याचं प्रमुख कारण यशवंतरावच. ते २० ऑगस्ट १९७७ रोजी बाबांच्या मृत्यूनंतर आमचं दुःख हलकं करायला पळसखेडला आले. दिवसभर थांबले. त्यांनी त्या वेळी सांगितलेलं आम्ही सगळ्या कुटुंबातल्या माणसांनी पाळलं. त्यांचा धाक बाळगला.

बाबांच्या मृत्यूचं पत्र यशवंतरावांकडे गेलं. यशवंतरावांनी स्वतःच्या हस्ताक्षरात एकापाठोपाठ एक अशी दोन पत्रं पाठविली. २७-७-१९७७ ला लिहिलेलं पहिलं पत्र.

"प्रिय नामदेवराव यांसी स.न.वि.वि.

बाबा गेल्याचे दुःखदायक वृत्त देणारे तुमचे पत्र आताच हाती आले. बद्रीनारायणाच्या यात्रेस जाताना ते भेटले किती जिव्हाळ्याने! प्रकृतीही उत्तम दिसली. शेवट इतक्या नजीक असावा अशी पुसटही शंका कुणाच्याच मनाला शिवलीही नसेल.

तुमचे दुःख अपरिमित आहे. भावंडांचे व दोन्ही आयांचे सांत्वन शब्दांनी कसे करणार. पत्र वाचल्यापासून मीही अस्वस्थ आहे. १ तारखेला येऊ शकणार नाही. त्यामुळे तर आणखीनच बेचैन आहे. पण पार्लमेंटचे सेशन संपल्यावर तुमचे घरी येऊन भेटेन. तुमच्या या घोर कौटुंबिक दुःखात मी सहभागी आहे. मृतात्म्यास शांती प्रार्थितो."

९ ऑगस्ट १९७७ ला यशवंतरावांचं पुन्हा पत्र आलं.

"प्रिय नामदेवराव,

माझे यापूर्वीचे पत्र तुम्हाला मिळाले असेलच. पळसखेड्याला येण्याचा कार्यक्रम मी नक्की केला आहे. २० ऑगस्ट रोजी मी येथून निघून औरंगाबादला येणार आहे. १० वाजता मी तिथे पोहोचत आहे. त्यानंतर तिथून मोटारीने निघून ११-३०, १२ पर्यंत पळसखेडे येथे पोहोचेन. तुमच्या घरी येऊन तुम्हांला व तुमच्या कुटुंबीयांना भेटणे हाच माझा औरंगाबादला येण्याचा उद्देश आहे. ५ वाजेपर्यंत मी औरंगाबादला परत पोहोचेन. नित्याप्रमाणे ५ नंतर काही कार्यक्रम स्वीकारणे अपरिहार्य आहे. २० तारखेला तुम्ही घरी असावे म्हणून हे पत्र लिहीत आहे."

२० ऑगस्ट ७७ला यशवंतराव पळसखेडला आले. सोबत मुख्यमंत्री वसंतरावदादा पाटील दहावीस मंत्री, प्रदेश काँग्रेस अध्यक्ष व खूपच खूप मोठी पुढारी मंडळी होती. यशवंतराव औरंगाबाद विमानतळावरून सरळ कुठेही न जाता पळसखेडला ११ वाजता वसंतदादांसमवेत आले. सकाळी अकरापासून दुपारी चार वाजेपर्यंत माझ्या घरी थांबले. दोघी आयांना व भावंडांना घरात खूप वेळ घेऊन बसले. त्यांना खूप समजावलं. त्यांच्याशी बोलताना, माझ्याशी बोलताना त्यांना खूप कठीण गेलं. दोनदा त्यांनी स्वतःला सावरूनही त्यांच्या डोळ्यांतून पाणी ओघळलं. मला त्यांच्याशी बोलणंच शक्य नव्हतं. मी फक्त रडत राहिलो होतो. वसंतदादा, यशवंतराव खूप वेळ घरात बोलले. तिथेच आमच्यासोबत साधं जेवण घेतलं. औरंगाबादेला व सर्वत्र यशवंतरावांनी आधीच कळविलेलं होतं. मी व्यक्तिगत दुःखासाठी जाणार आहे. त्या रस्त्यावर व पळसखेडला कुठेही कमानी, हारतुरे, स्वागत, छायाचित्रं मला अजिबात नको आहे. त्याची काळजी घ्या. त्याप्रमाणे सगळ्यांनी पाळलं होतं. तरीही माझ्या घरासमोर हजार-दीड हजार लोक बसलेले यशवंतरावांनी पाहिले. नाइलाजानं सभा झाली. वसंतदादा बोलले, यशवंतराव बोलले. माझ्यासंबंधी व माझ्या कवितेसंबंधी जे बोलायचं ते बोलले. बाबांच्या दिल्लीतल्या

भेटीसंबंधात बोलले. ''तुम्ही नामदेवराव व त्यांची कविता यांची जपणूक करा. त्यांचं नुस्तं कुटुंब नव्हे तर सगळं गाव ते सांभाळतील. बाबा गेल्याचं दुःख विसरणं त्यांना शक्य नाही. पण आपण सगळे मिळून ते हलकं करण्याचा प्रयत्न करू. त्यांना आधार देऊ.'' आखवं खेडं बाया-माणसांसकट समोर होतं. आजूबाजूच्या गावांचे लोक होते. यशवंतराव पंधरावीस मिनिटं आत्मीय भावनेनं खूप खूप बोलून गेले. विश्वास ठेवावा की ठेऊ नये, पण समक्ष सगळे पाहताहेत, ऐकताहेत. एखाद्या कवीसाठी यशवंतराव एवढा जीव टाकू शकतात?

दुपारी दोनच्या सुमारास माझ्या घराच्या गच्चीवर यशवंतराव उभे राहिले व पळसखेडची चौफेर पाहणी करू लागले. त्यांच्या पायांत चप्पल नव्हती, चटके बसत होते. पण ते तसेच थांबले. मोडकळीस आलेली घरं, तुटलेले खांब, भिंती, नवीन बांधकाम नाही. उदासवाणं स्वातंत्र्यातलं खेडं पाहून, त्याची अवकळा पाहून ते खिन्न झाले. काही प्रश्न विचारले, ''हलकी बरड जमीन आहे. कुठे धरणपाट आहेत का?''

''नाही. मंजूर केलेलं छोटं धरण वीस वर्षांत झालेलं नाही.''

''विहिरीचं पाणी, पिण्याचं पाणी कुठून आणता?''

''उन्हाळ्यात फार दूरवर जाऊन शेतातल्या विहिरीतून.''

''शाळा, दवाखाना?''

''मराठी चौथीपर्यंत शाळा आहे. त्या तीन खोल्या दिसताहेत ना, तीच. दवाखाना पंधरा किलोमीटरच्या पलीकडे.''

''विहिरीचं पाणी, पीक कोणतं?''

''इथे काय येऊ शकेल? फारच कठीण आहे. कच्च्या विहिरी ओहत. एका वर्षी पीक येतं, दोन-तीन वर्षं दुष्काळी जातात.''

''कर्ज वेळेवर मिळतं का? त्यात भागतं का? मला तर

ही माणसं फारच गरीब, गांजलेली दिसताहेत.''

''दहावीस एकरावालाही इथे मजुरी करतो. बाहेरगावी जातो. कर्जाची जप्ती व बेअब्रू दरवर्षी चालते. बऱ्यापैकी शेती करणाऱ्या त्या माळीबुवांची पलीकडच्या घरावरली पत्रं भूविकास बँकेनं भर पावसाळ्यात काढून नेली. जप्ती आणली.''

मी ते शेजारचं घर यशवंतरावांना व वसंतदादांना दाखविलं. यशवंतराव, दादा गच्चीवरून गावाचं हे भेसूर वर्णन ऐकताना अवाक् झाले.

कुठला ग्रामीण विकास?

कुठल्या शेतकऱ्यांचं राज्य?

आपण स्वातंत्र्यानंतर कोणासाठी अन् काय केलं?

दादा व यशवंतराव पायाला खाली चटके लागत होते; तरीही उभं राहून पाहत होते. विचारत होते.

दादा, यशवंतराव गच्चीवरून घरात येऊन बसले. समोर बसलेल्या सुंदरराव सोळुंके, नरेंद्र तिडके, बाबुराव काळे आणखी कितीतरी सत्तेच्या नेतेमंडळींना खेड्यातल्या ह्या भेसूर, भयानक उदासवाणेपणासंबंधी गांभीर्यानं बोलू लागले. खिन्न झाले.

बाबांच्या प्रतिमेला यशवंतरावांनी व दादांनी पुष्पहार घातला. बाबांच्या काही अस्थी राखून ठेवल्या होत्या. त्यांची पूजा त्यांनी केली. घरामागच्या पांढरीच्या शेतात त्या ठेवल्या गेल्या. दुपारी जेवणानंतर यशवंतराव घरात चौफेर फिरत राहिले. माझ्या खेडेगावात त्या वेळी एकही संडास नव्हता. नीट बाथरूम नव्हती. टीनच्या पत्र्याच्या घरात त्यांनी जेवण घेतलं होतं. सारवल्या जमिनीवर बसले. फ्रीज, संडास, बाथरूम, पंखा, टेबल-खुर्ची काहीच नव्हतं. सुखाच्या कोणत्याही वस्तू घरात नव्हत्या. तशी माझी परिस्थितीच नव्हती. त्यांनी ते सगळं स्वीकारलं व दिवसभर थांबले. ते तासभर फार तर थांबतील असं सगळ्यांनाच वाटायचं. दुपारी घरभर फिरताना एकाच गोष्टीचा त्यांना खूप आनंद झाला. अनेक ठिकाणी नंतर त्यांनी बाहेर त्या गोष्टीचा गौरवानं उल्लेख

केला. माझ्या घरात बाकी काही सुखसोयी मला करता आल्या नाहीत पण निवडक महत्त्वाच्या मराठी ग्रंथांचं मोठं भांडार त्यांना घरात दिसलं. खूप पुस्तकं त्यांनी चाळून काढली. एवढ्या परिस्थितीत पंचवीस-तीस हजार रुपयांची चांगली ग्रंथसंपदा त्यांना आनंद देऊन गेली. त्याचं त्यांना खूप समाधान वाटलं. आम्हा घरी धन शब्दांची रत्ने. आम्ही सगळी भावंडं मोठे झालो. यशवंतरावांच्या इच्छेप्रमाणे त्यांच्या विचारानं, धाकानं अजून एकत्र नांदतो आहोत. बाबांच्यानंतर शेवटच्या क्षणापर्यंत त्यांनी आम्हांला सर्वतोपरीनं कौटुंबिक आधार दिला. इतरत्रसुद्धा खूप मदत केली. प्रतिष्ठा मिळवून दिली.

यशवंतराव पळसखेडला माझं दुःख हलकं करायला मुख्यमंत्र्यांना घेऊन आले. ज्या पद्धतीनं त्यांनी संपूर्ण दिवस पळसखेडला आमच्या कुटुंबीयांना दिला, कुठेच सापडणार नाही अशी जिव्हाळ्याची आपलेपणाची वागणूक लोकांसमक्ष दिली त्याचा वृत्तांत महाराष्ट्रभर अनेक वृत्तपत्रांनी दिला. अनेकांनी समक्ष पाहिलं. या गोष्टीची आश्चर्यकारक चर्चा त्या वेळी सर्वत्र होती. ते सगळ्यांना नवलाईचं वाटलं. या सगळ्या दिवसांपासून गावातील, तालुक्यातील व इतरत्रसुद्धा काही मोठे लोक, विशेषतः राजकारणाशी संबंध असलेले लोक मला हस्ते-परहस्ते इतका त्रास देऊ लागले की मला जगणं कठीण झालं. मला, माझ्या कुटुंबीयांना खुनाची राजरोस धमकी दिली गेली. मी त्यांचा कोणताही स्पर्धक नाही हे त्यांना खूप समजावून सांगूनही समजत नव्हतं. बाबा वारल्यानंतर त्यांच्या मृत्यूचा दाखला सहीनिशी द्यायचा ग्रामपंचायतीच्या सरपंच व पंचांनी टाळला. माझे सर्व शेतीबाडीचे व कर्जाचे व्यवहार त्यामुळे अलग करता येत नव्हते. गोठवणूक झाली. महिना-दोन महिने मला साधा ग्रामपंचायत दाखला मिळाला नाही. कोणीतरी प्रेसवाल्यानं बहुधा गोपाळ साक्रीकरनंच हे छापल्यावर मला आणखीनच त्रास झाला. यशवंतरावांनी पळसखेडला येण्यामुळे किती शत्रुत्व झालं होतं, हे मलाच माहीत. तेही

अकारणी. काही संबंध नाही. वृत्तपत्रातून मृत्यूच्या दाखल्याचं व त्रास देण्याच्या संदर्भातलं छापून आल्यावर कोणीतरी दादांना व चव्हाणसाहेबांना सांगितलं. आपलीच माणसं मला त्रास देत आहेत हे त्यांना कळलं. यशवंतरावांनी वसंतदादांशी चर्चा केली. पूर्ण माहिती मिळविली. खरंखोटं काय ते मला न समजू देता जिल्हा पोलिसप्रमुखाच्या मार्फत मिळविलं. मला काहीच कळविलं नाही. नंतर मला हे समजलेलं होतं.

जिल्हा पोलिसप्रमुख फारच शिस्तीतले. त्यांचा जिल्हाभर दबदबा व खूप धाक. त्यांनी मला काहीएक समजू न देता उलटसुलट विचारलं. नको ते प्रश्न केले. मी खरं ते सांगितलं. तरीही ते करडे होते. साध्या वेशात त्यांनी काही लोकांना दोन-तीनदा गावात पाठविलं होतं, असं नंतर कळलं. माझी उलटतपासणी करणारे ते पोलिसप्रमुख माझ्या शत्रूंनीच पाठवले असावेत, असंच मला स्पर्शून गेलं. मात्र ते माझ्या पाठीशी भक्कमपणानं उभे राहिले. माझ्याकडून रीतसर अर्ज लिहून घेतला व अशा पद्धतीनं भारी काम केलं की माझे विरोधक व त्रास देणारे पार हबकून मेटाकुटीस आले होते. कायमचा बंदोबस्त होईल असं काही त्यांनी केलं. नंतर हे पोलिसप्रमुख साहित्य कवितेच्या त्यांच्या प्रेमामुळं माझ्या आयुष्यभराच्या ऋणानुबंधात आले. बकबक करणारी मंडळी वठणीवर आणण्याचं काम त्यांनी केलं. नंतर समजलं : यशवंतराव व वसंतदादा सातत्यानं त्यांच्याशी संपर्क साधून होते. माझी काळजी घेत होते.

एवढा प्रचंड व्याप यशवंतरावांच्या जवळ असताना त्यांनी दोन तीन महिने सातत्यानं यात विचारीत राहावं, काळजी घ्यावी ही सामान्य गोष्ट नाही. कुठेही असं आढळत नाही. माझा तसा त्यांना कुठेही फार उपयोग नव्हता. कविता हे एकच माध्यम होतं की ज्यासाठी ते माझ्यात रसिक म्हणून अडकले व नंतरच्या माणूसपणातल्या थोर भावनेनं सगळ्या सुखदुःखांत उभे राहिले. आज कुठेही असल्या गोष्टींचा थोडाही मागमूस सापडत नाही.

यशवंतरावांना एकदा मी एक पत्र पाठविलं. बीडचं बंकटस्वामी महाविद्यालय बंद पडलं होतं. त्या महाविद्यालयातला समाजशास्त्राचा प्राध्यापक असलेला माझा मित्र नरेश परळीकर. पुढे बंकटस्वामी महाविद्यालय सुरू झाल्यानंतर तिथल्या प्राचार्याच्या कृष्णलीलांना कंटाळून निषेध म्हणून राजीनामा देऊन नरेश घरी बसला होता. तो बेकार झाला होता. त्याच्या घरची आर्थिक परिस्थिती फारच हलाखीची होती. केवळ नरेशवर सगळं कुटुंब होतं. काहीतरी करून नरेशच्या नोकरीचं झालं पाहिजे म्हणून मी अस्वस्थ होतो. मी यशवंतरावांना कळविलं. तेव्हाचे शिक्षणमंत्री शरदराव यांची भेट घ्यायला त्यांनी मला सांगितलं. ते बोलणार होते. जवळपास त्याच सुमारास औरंगाबादला शरदराव आलेले होते. मी सुभेदारी विश्रामगृहात त्यांना भेटायला गेलो. रात्रीचे दहा वाजले होते. त्यांची-माझी कधीच समक्ष ओळख झालेली नव्हती.

त्यांचे पी.ए. श्री. दळवी म्हणाले, आता भेटता येणार नाही. मी माझं नाव लिहून देऊन निघालो. गेटपर्यंत गेलो होतो तेवढ्यात दळवी धावत आले व पवारसाहेबांनी तुम्हांला तात्काळ बोलविलं आहे असं सांगितलं.

काळा मातकट चौकडीचा कोट व टोपी अशा वेशात मी आत गेल्यावर त्यांनी माझं स्वागत केलं.

''मोसंबी पिवळी पडून डायबॅकनं बागा नष्ट होत आहेत. तुमची मोसंबी तुम्ही कशी चांगली ठेवलीत?''

- अशी सुरुवात त्यांनी केली. मी माहिती दिली. माझ्या एक-दोन पुस्तकांसंबंधी त्यांनी विचारलं. ती त्यांनी वाचलेली होती. नंतर शेतीचं व खेड्यातलं बोलणं निघालं. माझ्या लक्षात आलं की त्यांना माझी इत्थंभूत अशी बरीच माहिती आहे. बंकटस्वामी महाविद्यालयाचा व नरेशचा विषय मी काढला.

''मी बाहेर एका ठिकाणी जेवायला जाणार आहे. माझ्यासोबत चला. मी तुम्हांला रस्त्यात पाहिजे तिथे सोडतो. गाडीत बोलता येईल.''

"तुम्ही श्री. बापूसाहेब काळदातेंच्या बरोबर जेवणार आहात. कुठे ते मलाही ठाऊक आहे. ते माझेही मित्र आहे." मी म्हणालो. दोघंही यावर मनमोकळं हसलो व निघालो. यशवंतराव माझ्याशी बरंच बोलले आहेत. तुमच्याजवळ शेतीबाडी, खेडं, साहित्य खूप काही आहे. जे प्रश्न तुमचे आहेत ते उभ्या महाराष्ट्राचे आहेत. तुमच्यावर काही काम सोपविता येईल. नंतर कधीतरी बोलू.

यशवंतराव, शरदराव, मुख्यमंत्री वसंतदादांनी जे काही शक्य होतं ते केलं असेल. पण त्यामुळे वसंतदादांनी नरेशला साहित्य-संस्कृती मंडळात श्री. लक्ष्मणशास्त्रींकडे सरळ संपादनासाठी नोकरीत पाठविलं. नंतर यशवंतरावांमुळेच नरेश दिल्लीला नॅशनल बुक ट्रस्टमध्ये संपादक म्हणून गेला. फार काही खुलासा किंवा चर्चा न करता काम करण्याची ही पद्धत मला नवी होती. औरंगाबादेला काही महिन्यांनी शरदराव आले व मला घेऊन बीडच्या जयभवानी कारखान्याचा गळीत हंगाम समारंभ करून आष्टी मार्गे पुण्याला घेऊन गेले. पुण्याला अखिल भारतीय साहित्य संमेलन पु.भा. भावे यांच्या अध्यक्षतेखाली सुरू होणार होतं. पूर्णवेळ शरदराव साहित्याच्या प्रवाहांचं, नव्या पुस्तकांचं समजावून घेत होते व यशवंतरावांच्या साहित्याच्या वाचनाबाबत, संपर्काबाबत फार कुतूहलानं बोलत होते.

मी कुठेही विचलित होऊ नये, खचून जाऊ नये, मला आधार व संरक्षण द्यावं, कुठे प्रतिष्ठाही द्यावी ज्यामुळे मला कोणी त्रास देणार नाही, माझा सर्वत्र उपयोग होईल अशा आशयाचं काही यशवंतरावांनी शरदरावांना नीटपणानं सांगितलेलं असावं. शरदराव यांचा नि माझा जास्त परिचय नव्हता. संबंधच आलेला नव्हता. म्हणून त्यांच्या स्वभावाची नीट ओळख नव्हती. ते कधीच अशा गोष्टी समक्ष बोलत नाहीत. स्पष्ट बोलत नाहीत. काय ते कृतीनंच करतात. हे नंतर सहवासानं लक्षात आलं.

मी परळी वैजिनाथला, त्या महाविद्यालयाच्या गॅदरिंग्साठी पाहुणा म्हणून गेलो होतो. सायंकाळी मी माझ्या भाषणाचा समारोप करीत असतानाच दोन-चार पुढारीमंडळी धावत आली व त्यांनी मला पुष्पहार घातले. मी राज्यपाल नियुक्त आमदार झाल्याची बातमी सायंकाळच्या आकाशवाणीवर होती.

मध्यंतरीच्या काळातली माझी उदासीनता, कौटुंबिक, आर्थिक अडचणी, गावातला व पुढाऱ्यांचा धाकदडपशा व त्यामुळे मी काहीच न लिहिणं हे सगळं यशवंतरावांना बोचत होतं. यशवंतरावांनी शरदराव यांना सांगून, चर्चा करून, एका नव्या जगाच्या दालनात, राज्याच्या राजधानीत मला साहित्यिक कलावंताचा प्रतिनिधी म्हणून पाठवून दिलं गेलं असावं असा माझा अंदाज होता. साहित्यिकांचं व शेतकऱ्यांचं प्रतिनिधित्व मीही तितक्याच विश्वासानं चांगल्या पद्धतीनं मांडण्याचं ठरविलं. मुंबईला माझं जाणं वाढलं.

'रिव्हिएरा' ह्या समुद्रकिनाऱ्याच्या त्यांच्या बंगल्यावर यशवंतराव आलेले होते. मुंबईत मी होतो. त्यांना भेटायला गेलो. त्यांनी बराच वेळ थांबवून घेतलं.

विधिमंडळाच्या कामकाजाच्या संबंधी मला काही सांगितलं. चांगली पुस्तकं स्वस्त किमतीत साहित्य, अकादमी व नॅशनल बुक ट्रस्टच्या धर्तीवर मराठीत आणावी. ग्रंथालय, साहित्य, कला, मराठी चित्रपट, नाटक अशा काही विषयांवर स्वतंत्रपणानं विधान परिषदेत जादा चर्चेसाठी वेळ घ्यावा. प्रश्न मांडताना अभ्यासपूर्ण, माहिती मिळवून व आकडेवारीनं बोलावं. बारक्यासारक्या प्रत्येक प्रश्नात बोलण्याचं काही कारण नाही. शेतीचे व पाण्याचे प्रश्न, ग्रामीण जीवनाच्या विकासाचे प्रश्न, रोजगार हमी व त्याला जोडून कितीतरी प्रश्न तुमच्या जिव्हाळ्याचे व माहितीचे आहेत. म्हणून तुम्ही अग्रक्रमानं त्यात भाग घेतला पाहिजे. तेसुद्धा प्रस्ताव व दीर्घ चर्चा करूनच मांडावेत. शासन तुमच्यासारख्यांची निश्चितच दखल घेईल. त्यामुळे शासनाला चांगले निर्णय घेताना तुमचा

उपयोग होईल. त्यासाठी पाहिजे ती मदत शरदराव व बाकीची मंडळी करतील. विधान परिषदेत ना. ग. नांदे आहेत. त्यांच्याशी मी तुमच्या संबंधात बोललेलो आहे. ते तुम्हांला मदत करतील. सभागृहात उत्तम वक्तृत्वापेक्षा महत्त्वाचे मुद्दे, आकडेवारी व चोख माहिती ह्या गोष्टींची अधिक गरज असते. शहरी प्रश्नांवर तुम्ही फार बोललं नाही तरी चालेल. पहिला पाठ सहज भेटीत त्यांनी दिला. मी तो गिरवला.

आमदार झाल्यावर नागपूरच्या पहिल्याच अधिवेशनात मी साहित्य-संस्कृती मंडळाच्या कामकाजासंबंधी सविस्तर बोललो. साहित्य संस्कृती मंडळाचा वाढलेला व्याप व नवीन खूप योजना स्वीकारल्यानं आदरणीय श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी हे मुरब्बी, जाणते, अभ्यासू अध्यक्ष असूनही कमी काळात सगळ्यांना न्याय देता येणार नाही. म्हणून संशोधन संपादन वेगळं करून नवोदितांच्या योजना व साहित्याबाबत काही नवे निर्णय वेगळ्या दालनात घ्यावेत. म्हणजेच साहित्य-संस्कृती मंडळाचं विभाजन दोन भागांत करावं असं माझं साधं म्हणणं होतं. 'नाव नवोदितला व तेहतीस खिरापतीला' अशा मथळ्याखाली माझं विधिमंडळातलं कामकाज महाराष्ट्र टाइम्समधून छापूनही आलं होतं. यशवंतरावांनी ज्या कारणांसाठी ह्या संस्थेची उभारणी केली. शास्त्रीजींसारखा गाढ्या अभ्यासकांच्या हाती देऊन भरीव कार्य केलं त्यासंबंधी मी उलट कसं बोलीन. पण माझ्यासंबंधी लगेच सर्वत्र गैरसमज पसरविले गेले. मुख्यमंत्री श्री. शरदराव व राज्यमंत्री भाई वैद्य यांनी शेवटी साहित्य-संस्कृती मंडळाच्या विभाजनाचा निर्णय माझ्या चर्चेनंतर व सभापती श्री. रा. सु. गवई यांच्या आग्रहो निर्णयानंतर मान्य केला. माझ्या ह्या पहिल्याच महत्त्वाच्या कामकाजाची नोंद सगळ्यांनी घेतली व मला हुरूप आला.

मी नंतर यशवंतरावांना भेटलो तेव्हा शास्त्रीजीसंबंधी माझ्या इतक्याच आदरानं ते बोलले. माझं कामकाज अतिशय योग्य झालेलं आहे. आता दुप्पट वेगानं या दोन व्यवस्था काम करतील

व साहित्याच्या थोड्या साचल्या कामकाजाला वेग येईल, असं यशवंतराव बोलल्यावर मला धीर आला. त्यापूर्वी तू आता यशवंतराव व शरदराव यांच्या नजरेतून उतरणार. शास्त्रीजी व साहित्य-संस्कृती मंडळ यांच्या विभाजनाचं तू बोलणं व लिहिणं योग्य नव्हतं, असं अनेकांनी मला सांगून भंडावून सोडलं होतं.

कऱ्हाडच्या साहित्य सम्मेलनातून जी शिल्लक रक्कम राहिली होती, तिच्या व्याजातून दरवर्षी एका चांगल्या पुस्तकासाठी 'कऱ्हाड पुरस्कार' द्यावा. त्या पारितोषिक मिळालेल्या पुस्तकाच्या वाङ्मय प्रकारासंबंधी पारितोषिक वितरण समारंभाच्या वेळी दीर्घ चर्चा व्हावी, त्या साहित्यिकाचा सन्मान चांगल्या पद्धतीनं करून मानचिन्ह व पाच हजार रुपये रोख असा आग्रह असावा. त्या वेळी साहित्य अकादमीच्या पुरस्काराची रक्कम तेवढीच होती. असं पारितोषिकाचं स्वरूप खूप मेहनतीनं आखणी करून यशवंतरावांनी केलं. तीन सदस्यांची समिती नेमली व त्या समितीचा निर्णय जो राहील त्यात कोणालाही हस्तक्षेप करता येणार नाही, असा निर्णय घेतला. व्यंकटेश माडगूळकर, म. द. हातकणंगलेकर, गो. मा. पवार अशी पहिली समिती नेमली. त्यांनी पहिल्या वर्षीचं पारितोषिक *'कवितेनंतरच्या कविता'* ह्या दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांच्या काव्यसंग्रहाला दिलेलं होतं. दिलीप चित्रे यांचा हा काव्यसंग्रह भालचंद्र नेमाडे व मित्रमंडळींच्या 'वाचा' प्रकाशनानं प्रकाशित केलेला होता. श्री. दिलीप चित्रे पारितोषिक स्वीकारायला कऱ्हाडला आले. प्रकाशक नेमाडे आला नाही. त्यानं चंद्रकांत पाटीलला 'वाचा' प्रकाशनाचा प्रतिनिधी म्हणून पाठविलं. मला कऱ्हाड साहित्य सम्मेलनासारखंच यशवंतरावांचं व्यक्तिगत आग्रहाचं निमंत्रण होतं म्हणून मी कऱ्हाडला गेलो होतो.

अतिशय आतिथ्यशील यशवंतराव सगळ्यांच्या स्वागताला उभे होते. अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेत पहिल्या 'कऱ्हाड

पुरस्काराचा' अतिशय सुंदर देखणा गौरवसमारंभ झाला. यशवंतराव चव्हाण, दिलीप चित्रे, चंद्रकांत पाटील हे तिघं कवितेवर खूप चांगलं, मोजकं व अभ्यासपूर्ण बोलले. कवितेवरची अशी भाषणं क्वचितच ऐकायला मिळतात. सतत दिल्लीहून महत्त्वाचे फोन येत होते. खूप व्याप व अडचणी दिल्लीत असाव्यात. परंतु कऱ्हाड पुरस्काराला लेखकांच्या स्वागताला काही झालं तरी आपण स्वतः हजर राहावं असं पक्कं ठरवून यशवंतराव आलेले होते. दिलीप चित्रेनं त्याच्या कविता वाचल्या. दिलीपची कविता तशी अवघड, पण दिलीपनं तिथं वाचण्यासाठी ज्या कवितांची निवड केली होती त्या तिथल्या श्रोत्यांना विलक्षण भावल्या. पारितोषिक समितीचे सदस्य बोलले. दिलीप चित्रे ह्यांच्या कवितेवर बोलण्यासाठी मुद्दाम पुण्याहून एका प्राध्यापकाला आणण्यात आलं होतं. समारंभाच्या वेळी हे प्राध्यापक यशवंतरावांसमोर लोकांमध्ये बसलेले होते. रात्री काव्यवाचनानंतर साहित्यावर पुन्हा खूप चर्चा झाली. त्या चर्चेत साहित्याची जाण, त्याचबरोबर पुष्कळच नवीन पुस्तकं यशवंतरावांनी वाचलेली होती हे स्पष्ट दिसत होतं. रात्रीच्या चर्चेत पुण्याच्या प्राध्यापकानं तुकाराम व रामदास अशी तुलना करताना रामदास तुकारामापेक्षा श्रेष्ठ कवी होता असं काहीसं मांडलेलं होतं. चर्चा खूप वेळ चालली. चर्चेत दिलीप चित्रेही होताच. तुकाराम त्याच्या खास अभ्यासाचा विषय होता. त्यावर त्यानं बरंच लिहिलेलं होतं, तुकारामाची इंग्रजी भाषांतरं केलेली होती. रात्री उशिरा चर्चा-गप्पा संपल्यावर मी आणि चंद्रकांत यशवंतरावांच्या घरी थोडा वेळ गेलो होतो. साहित्य चळवळीवर व नव्या लिहिणाऱ्या लेखकांच्या संबंधात यशवंतराव बोलले. वाङ्मयीन मासिक व अनियतकालिकासंबंधी चर्चा केली. चंद्रकांतनं लघुनियतकालिकांचा सगळा मोठा पसारा व कार्य समोर मांडलं तेव्हा यशवंतरावांना आश्चर्य वाटलं. लघुनियतकालिकांमधूनच मोठं साहित्य व साहित्यिक उदयाला आले हे आपल्याला माहीत नाही असं प्रामाणिकपणानं सांगितलं व आणखी त्यासंबंधात विचारपूस केली.

या कार्यक्रमाला मुंबईहून भाऊ पाध्येही आलेला होता. भाऊबद्दलही त्यानं यशवंतरावांना सांगितलं. चंद्रकांतचं इंग्रजी-हिंदी वाचन खूप होतं हे त्यांना जाणवलं. चंद्रकांत सायन्सचा प्राध्यापक, मराठीचे पुष्कळ प्राध्यापक आपल्याला ते वाचण्याची गरज नाही असंच समजून असतात असं यशवंतराव हसून म्हणाले. यशवंतरावांनी पुण्याच्या प्राध्यापकाचं मत, ते आपल्याकडे पाहुणे म्हणून मुद्दाम बोलविलेले आहेत म्हणून, संपूर्ण खोडून काढलं नाही. यशवंतराव म्हणाले, तुकाराम व रामदास ह्यांची तुलनाच चुकीची आहे. रामदास निश्चितच मोठा आहे, परंतु जीवनाच्या सर्वसामान्य अंगाला स्पर्श करून, लोकजीवनातल्या सर्व थरांना कवटाळून तुकाराम त्याच्या साध्या, सोप्या अभंगांनी लोकांना, समाजाला जास्त जवळचा आहे. त्यांना लोकांमध्ये मला दुखवायचं नव्हतं. म्हणून मी तुमचं मतही तसं पुष्कळ बरोबर आहे असं सांगितलं. हे सामंजस्य, न दुखवण्याचं कौशल्य, नीती यशवंतरावांजवळ होती. ते तिचं सर्वच वेळी सर्वांसाठी व्यवस्थित पालन करीत असत.

दुर्दैवानं 'कऱ्हाड पुरस्कारा' बाबत त्यांनी ज्यांच्यावर काम सोपवलेलं होतं त्यांनी ते नीट केलं नाही. पुढे एकदा माझा एक मित्र श्याम मनोहर याला कथेसाठी 'कऱ्हाड पुरस्कार' मिळाला. अनेक महिने लोटले, श्यामला पुरस्कार मिळाल्याच्या एका पत्रानंतर पुढे काही आलंच नाही. समारंभही झाला नाही. श्यामच्या नावाला तशी प्रतिष्ठा त्या वेळी कमीच होती, म्हणून परीक्षकांनीही नंतर त्याकडे दुर्लक्ष केलं असावं. पण जेव्हा ही गोष्ट भालचंद्र नेमाडेला कळली तेव्हा त्यानं तात्काळ यशवंतरावांना हे सगळं लिहिलं. यशवंतरावांना या प्रकाराचं फारच दुःख झाल्याचं त्यांनी अनेकदा बोलून दाखविलं होतं. अर्थात श्यामच्या वाट्याला फक्त चेक आला, समारंभ झालाच नाही, ही गोष्ट यशवंतरांसकट आम्हां सगळ्यांना अस्वस्थ करून गेली होती.

कथा, कादंबरी, ललितगद्य, चरित्र अशा वाङ्मयप्रकारांना पारितोषिकं देता येतील, परंतु नाटक त्यात घेऊ नये असं

यशवंतरावांचं पारितोषिक समिती व साहित्यिकांमध्ये चर्चेतलं मत होतं. त्याविषयी त्यांची मतं त्यांनी जाणत्या साहित्यिकात मांडली. नाटकप्रयोगाच्या रूपानं किंवा अनेक माध्यमांतून येतं तेव्हा ते प्रभावी ठरतं किंवा खऱ्या अर्थानं त्याचं रूप प्रगट होत असतं. नाटकाच्या पुस्तकाच्या छापील संहितेत ते कधीच पूर्णपणानं दिसणार नाही. त्यामुळे खऱ्या अर्थानं कलाकृतीला न्याय दिलेला नसणार. एखादं नाटक लिखित संहितेत चांगलं असू शकतं, परंतु प्रयोगात ते फारच सामान्यसुद्धा झाल्याची उदाहरणं आहेत म्हणून नाटक हा वाङ्मयप्रकार पारितोषिकासाठी घेऊ नये असं त्यांचं मत होतं. चंद्रकांतशी मुद्दाम या विषयावर चर्चा करूनच त्यांनी 'कऱ्हाड पुरस्कारा'तून नाटक हा वाङ्मयप्रकार गाळून टाकण्याचा निर्णय घेतला होता.

दिल्लीला अनेकदा बोलावूनही मी दिल्लीला गेलो नाही. यशवंतरावांना ते मुंबईत आल्यावर आता भेटता येत होतं. एकदा त्यांनी निरोप देऊन मला बोलविलं होतं. 'रिव्हिएरा'वर ते थांबले होते. मुंबईत अधिवेशन चाललेलं होतं, तेव्हा मी मुंबईत अधिवेशनासाठी नव्हतो. त्यांचा निरोप मिळाल्यावरही कित्येक दिवस त्यांना भेटलो नाही. यशवंतरावांचं पत्र आलं :

" '...विरंगुळा' हे लहानसं घर मी कऱ्हाडला बांधलं आहे. वेणूताई -मी पाच दिवस कऱ्हाडला तिथे आहोत. ५ ते १० सप्टेंबर. तुम्ही या नव्या घरी यावं अशी आमची इच्छा आहे. मनमोकळं बोलता येईल...."

मी सहा सप्टेंबरला कऱ्हाडला गेलो. बस-स्टँडसमोरच्या हॉटेलात बॅग टाकली. सातारचे कार्यक्रम आटोपून यशवंतराव सायंकाळी 'विरंगुळा'वर आले. यशवंतराव, वेणूताई व मी रात्री दहा वाजेपर्यंत बोलत बसलो. ते म्हणाले, "आता काय नवीन अडचणी आहेत? तुम्ही मुंबईत अधिवेशनात आलाच नाहीत असं

कळलं. सहसा अधिवेशन टाळू नये असं माझं मत आहे.'' तसे शरदराव मला वयानं जवळचे होते. तशी जवळीकही नंतर वाढलेली होती. अनेक विषयांवर मी शरदरावांजवळ आडपडदा न ठेवता मोकळेपणी बोलत असायचो. पण मी काही फार व्यक्तिगत प्रश्न त्यांच्याकडे मांडलेच नाहीत. संकोच व अंतर राहिलेलं होतं. यशवंतरावांचं-माझं वयाचं अंतर, त्यांचं मोठेपण व माझ्या मर्यादा सगळं लक्षात घेऊनही सगळे घरगुती व्यक्तिगत प्रश्न मी त्या काळात त्यांच्याजवळ मोकळेपणानं सांगत होतो. दोघांतलं असं जे अंतर असावं ते मिटूनच गेलेलं होतं. बाबांच्याच जागी मला यशवंतराव सदैव वाटत राहिले.

''धाकट्या बहिणीचं लग्न झालं. दोघा भावांचे विवाह राहिलेले होते तेही गेल्या वर्षी झाले. खूप आर्थिक अडचणी असल्या तरी पैसे वाचवून काही बँकेचं कर्ज काढून नवीन मिळेल अशी थोडी बऱ्यापैकी जमीन विकत घेतली. नवीन विहीर, झाडं. परिश्रमानं सगळे करताहेत. मी कोणासाठीही काही कमी केलेलं नाही. सगळे खूप कष्ट करतात. दोन्ही आयांचं चांगलं चाललेलं आहे. तसं चांगलं आहे.'' माझ्या डोळ्यांतून पाणी ओघळत होतं. वेणूताई, यशवंतराव माझ्याशी बोलत राहिले. हळूहळू मी पुन्हा बोलत गेलो, ''साहेब, मी आता सांगितलं तसं सगळं चांगलं आहे. भावंडांची लग्नं केली. चांगल्या सुंदर गुणी मुली. माणसंही संबंधातली चांगली आहेत. एक भाऊ जुगार पत्त्याच्या नादी लागला. घरातलं पुष्कळ काही त्यानं विकलं. त्याच्या बायकोचे दागिने सगळे मोडून टाकले. तिला त्रास दिला. गावातूनही कुठून उसने पैसे घेतले. फारच वेड्यासारखं वागतो. त्याला बोललो, दटावलं तेव्हा तो घरातून कुठेतरी दूर निघून गेला. खूप धुंडत फिरलो. लाज वाटते. धाकटी आई अंथरुणावर त्याच्यासाठी रोज रडते. सगळी धडपड उभं राहणं चाललं आहे. मुख्यतः त्यांच्यासाठी. त्याच्या ह्या सगळ्या वागणुकीनं आम्ही सगळे करपून चाललो आहोत. फारच बेअब्रू होते आहे. हा कायमचा बिघडला व दुसराही त्याच वाटेनं किंवा आणखी

वेगळ्या वाममार्गानं गेला तर कुणाकुणाला सावरू? आणखी एक भाऊ त्याच्या चुकीच्या मतांवर चालत असतो. त्याला समजत नाही, आकलन नाही, हे कितीदा व कसं सांगावं? त्याला ते अपमानास्पद वाटतं. पण पुन्हा शेती व संसार ओस पडणार व मलाच सगळे दोष देणार. मला सोसायला माणूस म्हणून मर्यादा आहे. तुम्हीसुद्धा काहीच मला मदत करू शकणार नाहीत इतके माझे प्रश्न चक्रम करणारे आहेत. कुणालाच काही गांभीर्य नाही. घरी हे सगळं असताना मुंबईत मी काय करू? माझा थोडासुद्धा दोष नाही. मी जन्मभर असाच ह्यांच्या गुंतागुंतीत किती काळ राहणार? त्यांना आता समज आली. उभं करून दिलं. जबाबदारी स्वीकारली पाहिजे ती नीट स्वीकारत तर नाहीतच पण रोज मला पैसा मागतात व हे असलं नामुष्कीचं समोर आणतात. मी मनानं फार अस्वस्थ आहे. तुम्हांला काय, कुणालाच मला आता हे सांगायचं नाही. तो मला माझा मूर्खपणा वाटतो. त्यांची समज वाढत नाही व मला ते समजून घेत नाहीत हे दुर्दैव आहे. संसार कुटुंब असं विस्कळीत झाल्यावर, पैसा नसल्यावर कोणी कुत्रंसुद्धा विचारणार नाही. कर्ता पुरुष म्हणून दोष तेवढा सर्व करूनही माझ्याच वाट्याला येणार. मला काहीच सुचत नाहीय्....''

यशवंतरावांनी दीर्घ सुस्कारा सोडला. वेणूताई शब्दही बोलल्या नाहीत. ''नामदेवराव, तुम्ही आत्ता इथेच बाजूच्या खोलीत झोपा. आपण सकाळी भेटू'' - यशवंतराव.

आता मलाही या गोष्टी बाहेर सांगणं विशेषतः यशवंतरावांच्या सारख्यांना सांगणं चुकीचं वाटत होतं. जवळपास नंतर चुकूनही असा विषय मी काढला नाही. त्यावर कुठे भाष्य केलं नाही. घरच्या या लोकांचेही लाड फार चालले आहेत. त्यांच्यासाठी आपण उगाच अधिक करतो व ते उलट बेजबाबदार होताहेत दिवसेंदिवस. हे बरोबर नव्हतं. यशवंतराव, शरदराव यांनी आमच्यासाठी किती करावं? प्रत्येक संकटात ते उभे आहेत पण साहित्याची, लिखाणाची, सभागृहातल्या कामकाजाची,

बाहेरच्या समाजात त्यांच्यासाठी व समाजासाठी फिरून आमदार म्हणून विशेष काही करण्याची जबाबदारी माझी आहे किंवा नाही- घरच्या सगळ्यांना याची बिल्कुल जाणीव नव्हती. आता मी बाहेर वेळ द्यावा, त्यांनी घरचं शेतीचं नीट पाहावं, त्यातली सगळी काही जबाबदारी स्वीकारावी असं बिल्कुल कुणाला वाटत नव्हतं. उलट ते फार निष्काळजीपणे माझ्यावरच अवलंबून राहू लागले हे एकार्थी फारच निष्क्रियतेचं लक्षण होतं. पण फार बोलता येत नाही. असं कौटुंबिक दुखणं मी उगाच घेऊन बसलो व सातत्यानं यशवंतरावांसारख्या माणसांजवळ नको ते प्रश्न अधिक सांगत गेलो. जाणीवपूर्वक यात दुरुस्ती करायचा मी प्रयत्न केला. यशवंतराव या प्रश्नांवर खिन्न होऊन काहीच बोलले नाहीत. हे अगदीच बरोबर होतं. त्यांच्या घरी मला रात्रभर झोप आली नाही. त्यांनी सुखाच्या गोष्टीसाठी नव्या घरी विरंगुळा म्हणून प्रेमानं बोलविलं होतं.

यशवंतराव दिल्लीच्या राजकारणानं त्रस्त होते. फारच दुःखी होते. सकाळी भेटायला आलेल्या नेतेमंडळींच्या संवादांतून ते स्पष्ट होत होतं. महाराष्ट्रातील राजकीय परिस्थिती यशवंतरावांच्या खूपच विरोधात गेली होती. शरदराव हे पुलोदचे मुख्यमंत्री. यशवंतरावांच्याच आशीर्वादानं झालेले आहेत असं आता जाहीरपणानं सभांमधून लोक बोलत व त्यांच्यावर तीव्र टीका करीत होते. वसंतदादा, मधुकरराव चौधरी, यशवंतराव मोहिते आणि कित्येक बडी मंडळी राजरोस यशवंतरावांसाठी व्यूहरचना करीत. शरदरावांसाठीही करीत. यशवंतरावांच्या कऱ्हाडच्या दुसऱ्या दिवसाच्या सातारा जिल्ह्याच्या कार्यक्रमांमध्ये, सामान्य माणसांमध्ये दुसरा विषय नव्हता. समर्थक व विरोधक असा जोराचा खेळ महाराष्ट्रात व दिल्लीत चाललेला होता. यशवंतराव कार्यक्रमांमध्ये फारच मलूल दिसले. भाषणांमधूनही त्यांचा तुटकपणा जाणवत होता. राजकारणावर त्यांना मर्यादित बोलायचं होतं व माझ्यासारख्या राजकारणाशिवायच्या कोणाशी तरी ते विसरण्यासाठी अधिक

जवळ यायचं होतं, असं मला जाणवलं.

'विरंगुळा'वर रात्री नऊ वाजेपर्यंत ते सगळ्यांशी बोलले. नंतर भेटी बंद केल्या. यशवंतराव, वेणूताई, त्यांचा आवडता डॉक्टर पुतण्या (जो नंतर अपघातात वारला) व सूनबाई असे रात्री जेवणाच्या टेबलावर बसलो. पुन्हा इथे राजकारणातले दिवसभरातले यशवंतराव कुठेच नव्हते. अगदी कौटुंबिक घरातले यशवंतराव. वेणूताई टेबलावर आम्हांला वाढत होत्या.

''आज वेणूताईंनी तुमच्यासाठी खास पाहूणचार केला आहे.'' डॉक्टर व मी टेबलावर गप्पा मारीत बसलो होतो. जेवण वाढून झाल्यावर माझी चाळवाचाळव सुरू झाली. ''मी भात, चटणी व थोडी चपाती घेतो. हे बाकी चिकन वगैरे काढून घ्या.''

वेणूताईंनी खूप मेहनत घेऊन नॉनव्हेज केलेलं होतं. पण मी कधीच ते खाल्लेलं नव्हतं. मला चालत नव्हतं. सगळेच थोडे नाराज झाले. यशवंतरावांनी जेवणापूर्वी औषधी, गोळ्या घेतल्या होत्या. ते जेवायचे थांबले. डॉक्टर व सूनबाई थांबले. वेणूताईंनी ताबडतोब हिरव्या वाटाण्याची भाजी व एकदोन पालेभाज्या तयार केल्या. मग आम्ही सगळे बरोबर जेवलो. यशवंतरावांना खूप विनंती करूनही ते जेवले नाहीत. वीस मिनिटं थांबले. आमच्यासोबत जेवले. थोडंसंच नॉनव्हेज घेतलं. मग मटार व हिरव्या भाज्या चवीनं त्यांच्या ताटात घेतल्या व जेवले. मग सगळेच आम्ही या प्रकाराला खूप मनापासून हसलो. व्हिजिटेरियन कवीसुद्धा कसा त्रास देतो पहा असं ते सहज बोलून गेले. आमचं हे सगळं मनसोक्त गप्पागोष्टींमध्ये चाललेलं होतं. खूप नवे विषय डॉक्टर व मी त्यांच्यासोबत बोलत राहिलो. त्यांनाही दिवसभराचा थकवा असून तजेला वाटला. यशवंतरावांच्या मनाच्या तळात किती गूढ कसरती व त्रासाचं सगळं चाललेलं होतं हे मी जवळून पाहिलं. त्यांच्या कसरतींच्या, वेदनांच्या संदर्भात आपलं कुठेच काही नाही तरीही आपण खूप स्वतःला मोडून टाकतो व कोंडूनही घेतो. एवढ्या अडी-अडचणीत, राजकीय गुंतागुंतीच्या त्यांच्या

वाईट काळात ते खिन्न होतात पण पुन्हा मनाची नवी उभारणी करतात, लोकांशी बोलतात व नवा विचार मांडतात. मी तीन-चार दिवस जवळून सगळं पाहत होतो. 'विरंगुळा' तल्या या दीर्घ मुक्कामात यशवंतरावांबद्दल खूप नवी माहिती मला मिळाली. त्या प्रदेशातल्या त्यांच्या जवळच्या मंडळींकडून भेटीत अनेक खाजगी घटना मी ऐकल्या. त्या मला नवीन होत्या. श्री. कोतवाल, श्री. बाबूराव काळे, श्री. संभाजी बाबा थोरात अशी कितीतरी मंडळी जिव्हाळ्यानं सगळं सांगत होती. देवराष्ट्र-सागरेश्वरापासून विठाईच्या व यशवंतरावांच्या वडिलांच्या
दारुण दुःखांचं, भावंडांच्या अकाली मृत्यूचं, स्वातंत्र्य-चळवळीत झोकून दिलेल्या तारुण्याचं सगळं काही ऐकत होतो. तिथले माझे तीन-चार दिवस मला खूप काही देऊन गेले.

शेतीव्यवसायात पाऊसपाणी व अनिश्चित उत्पन्न दिवसेंदिवस वाढत चाललेलं आहे. उत्पन्नाच्या मानानं खर्च वाढत चाललेला आहे. बहुसंख्य लोक शेतीपासून दूर चाललेले आहेत. मी या काळात उलटा अधिक शेतीकडे झुकलो आहे. विहिरी केल्या, पाणी संपलं. पुन्हा खोदल्या. रुंद केल्या. पाईपलाईन, नवीन यंत्रसामुग्री करताना कर्ज वाढलं; पण त्याशिवाय मार्ग नव्हता. पीकपद्धतीत परिवर्तन केलं. श्री. शरदराव पवार, त्यांचं कृषी प्रतिष्ठान, त्यांच्यासोबत देशात फिरताना नवी दृष्टी आली व शेतीत नवीन योजना घेऊन मी पुन्हा उभा राहण्यासाठी तयार झालो. सभागृहात स्वतःपुरतं न बोलता महाराष्ट्रातल्या पाणी-योजना, शेती, अर्थव्यवस्था, त्यासाठीचे निर्णय शासनानं घ्यावेत म्हणून सतत बोलत राहिलो. ठराव मांडत राहिलो. वृत्तपत्रातून सतत त्यावर लिहीत गेलो. या सगळ्या गोष्टींच्या मागे यशवंतरावांची मुख्य प्रेरणा होती. त्यांचा व्याप कितीही असो, ते मला आठवणीनं वेगवेगळ्या पद्धतीनं शक्ती देत राहिले.

एकदा सहज बोलले :

"माझे बंधू अकाली गेले. त्यांच्या मुलांचं, कुटुंबाचं मीही शक्य ते केलं. त्यांच्या अडचणी होत्या. त्यांना मदत केली. वेणूताईंनीही त्यांच्यासाठी जीव टाकला. त्यांच्या संसाराचा आम्हांलाही ध्यास होता. घरचं हे असं चालतच राहणार. ते व्यवस्थित ठिकाणावर येत राहतं. त्यात तुम्ही अधिक गुंतल्यानं साहित्याकडे खूप दुर्लक्ष करीत आहात. विशेषतः विधान परिषदेतल्या कामकाजात थोडीही कुचराई नको. खूप काम करायला त्या ठिकाणी वाव आहे. महाराष्ट्रात, देशात त्यासाठी फिरायला, काम करायला तुम्हांला वाव आहे. तुमच्यासारख्याला खूप नवीन पाहता येईल, ऐकता येईल. या दालनात तुम्ही अधिक बहुश्रुत होता. समृद्ध होता. नवीन प्रदेश पाहण्याची संधी आमदाराला खूप असते. तुमच्यासारख्यानं हे खूप पाहावं, पचवावं. त्यात सतत सहभागी असावं. भैरवीचे सूर कमी करा. आता आनंदभैरवीचे सूर पाहिजेत."

७ डिसेंबर १९८०चा दिवस. श्री. शरदराव पवार यांच्या नेतृत्वाखाली जळगाव ते नागपूर शेतकरी दिंडी निघाली होती. त्या वेळी शेतीचे प्रश्न एकाएक खूप अंगावर आले होते. दररोज जवळपास पंधरा किलोमीटर चालत जायचं. पुढे मुक्काम करायचा. खेड्यातल्या लोकांशी चर्चा करून, सभासंमेलनं करून शेतीचे प्रश्न सांगत राहायचे. सुरुवातीला पाच-दहा हजार लोक शेतकरी दिंडीत असायचे. अकोला, अमरावतीपर्यंत सभेच्या ठिकाणी लाखाच्या पुढे लोक एकत्र येत. प्रचंड स्वागत करीत असत. दिल्लीत भजनं, भारुडं , गीतरचना, प्रास्ताविक इत्यादी सभेच्या सुरवातीला करून सभा यशस्वी करण्याचं माझ्याकडे सोपविलेलं होतं. माझ्या खेड्यातली चौतीस मुलं माझ्यासोबत शेतकरी कलापथकात होती. शेतकरी समाज पार मोडून गेलेला होता. विस्कटलेला होता. शेतीत दुष्काळ,

त्यातच एका रात्रीत खतांच्या खूप किमती वाढवलेल्या होत्या. बियाणं चांगलं मिळत नव्हतं. त्यामुळे शेतकरी दिंडीचं शेतकऱ्यांनी उत्स्फूर्त स्वागत केलं. एस. एम. जोशी, नानासाहेब गोरे, बापू काळदाते, देवीलाल, कर्पूरी ठाकूर, जॉर्ज फर्नांडिस, यशवंतराव चव्हाण, ए. पी. वर्धन असे देशातले कितीतरी ज्येष्ठ नेते, शेतकरी दिंडीत असायचे. अमरावतीला दिंडी आली तेव्हा स्वागताला दीड लाखापेक्षा अधिक लोक होते. दुसऱ्या दिवशी जॉर्ज फर्नांडिस पायी चालले व त्यांनी मार्गदर्शन केलं. सायंकाळी यशवंतराव चव्हाण मुक्कामाला अमरावतीला येणार होते व दिंडीत सामील होणार होते. आदल्या दिवशी रात्री पुन्हा नागपूरला रातोरात मला बोलावण्यात आलं म्हणून मी शरदरावांकडे जाऊन आलो. कुठे अटक झाली व दिंडी अडविली तरी विधान भवनावर खलिता घेऊन दिंडीकरी पोहोचले पाहिजेत. श्री. अरुण मेहता व मी त्याची आखणी करण्यासाठी लोकमत कचेरीजवळ डॉ. कोलवाडकरांच्या घरात गुप्तपणे योजना आखीत होतो. भल्या पहाटे पुन्हा शरदराव, कॉ. सुदाम देशमुख व ग. प्र. प्रधान असे घाईघाईत नागपूरहून एका गाडीत निघून अमरावतीला दिल्लीकडे सामील व्हायला निघालो. रस्त्यात बरीच व्यूहरचना केली गेली. शरदरावांवर खूप पाळत होती. परंतु त्यांनी आपली मुख्य गाडी रेस्ट हाऊसच्या समोर ठेवून मागच्या बाजूनं अंधारात जीप घेऊन स्वतः चालवून तिसऱ्याच ठिकाणावरून देशभर फोनाफोनी करून व आडाखे आखून शरदराव पोलिस अधिकारी व मुख्यमंत्र्यांची प्रचंड फिरवाफिरव करीत नाकीनऊ आणत होते. इतर कोणालाही इतकं शक्यच नाही. पोहराबंदी जोगलं ते चांदूर रेल्वे अशा दिंडीच्या दिवशी यशवंतराव दिंडीत सामील झाले. धसकटांच्या शेतामधून शेतकऱ्यांचा जयघोष करीत अमर शेखचं क्रांतीचं गाणं गात शेतकरी दिंडी निघाली. आदिवासी बंजारा समाजानं नृत्य, गाणं म्हणून उत्स्फूर्त स्वागत केलं. सगळं पाहून यशवंतराव उल्हासित झाले. आम्ही त्यांना चालताना दिंडीतल्या मागच्या दिवसांचा वृत्तांत देऊ लागलो.

सर्वश्री. एन. डी. पाटील, गणपतराव देशमुख, अरुण मेहता, राजारामबापू पाटील असे आम्ही दिंडीतले कायमचे रोजचे वारकरी त्यांच्यासोबत होतो. नागपूर विधिमंडळाचं अधिवेशन चाललेलं होतं. शरदराव कुठेतरी नागपूरला जाऊन येऊन आमच्यात दररोज सामील होत होते. दिंडी निघाली तेव्हा तेही पोहराबंदीच्या जंगलात आमच्यात सामील झाले. दोन-तीन किलोमीटर दिंडीत चालत गेल्यावर पंचवीस-तीस पोलिस अधिकाऱ्यांच्या गाड्या, राखीव पोलिसांचा तळ शेतकरी दिंडीला आडवा झाला. दिंडी अडविली गेली. सगळे जंगलात रस्त्यावर थांबले. यशवंतरावांच्या हातात अटकेचं वॉरंट देताना पोलिस अधिकारी अल्मेडा व देव यांच्या डोळ्यांत पाणी होतं. दिंडीकरी शेतकरी प्रचंड घोषणा देऊ लागले. खूपच गडबड सुरू झाली. यशवंतरावांनी सगळ्यांना शांत केलं. शरदराव, एन.डी. पाटील, राजारामबापू पाटील यांच्याशी त्यांनी चर्चा केली. अटक केल्याच्या कागदपत्रांवर सर्वांचे, दिंडीकऱ्यांचे सही-अंगठे झाले. त्यात पाच-सहा तास गेले. एस.टी. महामंडळाच्या बसमध्ये दिंडीतले सगळे अटक केलेले लोक बसविण्यात आले. या वेळेपर्यंत अमरावतीचे व दुसरीकडचेही बरेच पत्रकार-फोटोग्राफर त्या ठिकाणी हजर झाले होते. पहिल्या बसच्या पहिल्या सीटवर यशवंतराव बसलेले होते. पत्रकारांनी त्यांना प्रश्न सुरू केले :

"एस.टी.त किती दिवसांनी बसलात?"

"एस.टी. महामंडळाच्या उद्घाटनाच्या दिवशी पहिल्यांदा, आणि त्यानंतर आत्ता दुसऱ्यांदा बसलो."

नंतर शरदरावच मुलाखती घेणाऱ्या पत्रकारांशी बोलले.

आम्हांला कुठे घेऊन जाणार हे पोलिस अधिकाऱ्यांनाही नीट माहीत नव्हतं. नागपूरची दिशा दिली. बाहेरून नागपूर पास करायला सांगितलं. मध्ये अमरावतीजवळ सगळ्या गाड्या थांबविल्या. यशवंतराव चव्हाणांना पोलिस अधिकाऱ्यांनी लाल दिव्याच्या ॲम्बेसिडर गाडीत बसायचा आग्रह धरला. यशवंतराव

म्हणाले, ''अटक केलेले गुन्हेगार लाल दिव्याच्या गाडीत घेऊन जाणं तुम्हांला हास्यास्पद होईल. मी इथेच ठीक आहे. शरदरावांनी आग्रह धरला. यशवंतराव व बापू त्या ॲम्बेसिडर गाडीत बसले. मला त्यांच्यासोबत त्यांच्या गाडीत बसण्याचा आग्रह धरला. यशवंतरावही म्हणाले म्हणून त्यांच्या गाडीत मी त्यांच्या सोबत राहिलो. अमरावती-नागपूर-भंडारा खूप धुळीच्या रस्त्यानं गाड्या हळूहळू चाललेल्या होत्या. रस्त्यांवर प्रचंड घोषणा, जल्लोष. अचानक पोलिसांवर दगडफेक सुरू झाली. शरदरावांनी सगळं शांतपणानं काबूत ठेवलं. मी रस्त्यानं यशवंतरावांचं औषध, पाणी, गोळ्या असं सगळं काळजीनं करीत होतो. भंडाऱ्याच्या मार्केट कमिटीच्या उघड्या मैदानात दिंडीचे अटक केलेले लोक अडकविले गेले. तिथल्या भिंतीवर *'ही जेल आहे'* असं लिहिलं. शासनाच्या आदेशानं त्या ठिकाणी कोर्ट हजर झालं. श्री. गणपतराव देशमुख व श्री. बी. एन. देशमुख या आमच्या निष्णात वकिलांनी कायदेशीर बहस सुरू केली. पाच पुऱ्या व बटाट्याची कोरडी भाजी अशी पाकिटं आली ती आम्ही पटापटा पोटात घातली. मी यशवंतरावांना तोंड धुण्यासाठी व बाथरूम, संडाससाठी भंडाऱ्याच्या विश्रामगृहात घेऊन गेलो. पोलिस अधिकाऱ्यांनी तशी परवानगी दिली. तेही आमच्यासोबत आले. मी कुठून तरी चहा-बिस्किट मागवायला सांगितली. यशवंतराव संडास-बाथरूमला गेलेले होते.

त्याच वेळी त्या ठिकाणी लाल दिव्याच्या गाडीतून आरोग्यमंत्री डॉ. बळीराम हिरे आले. सोबत त्यांच्या पत्नी होत्या. मी त्यांना नमस्कार केला. ते बाथरूमकडे जाणार तसं मी त्यांना थांबविलं. यशवंतराव चव्हाण आत आहेत असं मी त्यांना सांगितलं.

ते म्हणाले, ''यशवंतराव चव्हाण इथे कसे काय?''

''त्यांना शेतकरी दिंडीत अटक झाली आहे. इथे आणण्यात आलं आहे. इथून गोंदियाला घेऊन जाणार असं मी ऐकतो. ते अर्धा तास इथे थांबणार एवढंच.''

त्यांना दिल्लीच्या अटकेचं, नागपूरच्या घडामोडीचं काहीही माहीत नव्हतं. अधिवेशन चाललेलं होतं. पण ते इकडेच कुठे फॉरेस्टमध्ये होते असं दिसत होतं.

यशवंतराव बाथरूमबाहेर आले तेव्हा सौ. हिरे यांनी त्यांना नम्रपणानं नमस्कार केला. यशवंतराव डॉ. हिरे यांना म्हणाले, ''कसं काय चाललंय्? तुमच्याकडे शिक्षण व आरोग्य अशी दोन खाती आहेत तर तुम्हांला कुठलं खातं अधिक आवडतं?'' डॉक्टर म्हणाले, ''आरोग्य!''

यशवंतराव म्हणाले, ''तुम्ही इथे थांबा. सहकुटुंब आहात. आम्ही निघतो.''

त्याच वेळी भंडाऱ्याचे कलेक्टर व पोलिस अधिकारी धावाधाव करीत आले. त्यांच्यासोबत शरदराव होते. नागपूर भंडाऱ्याहून बरेच लोक गर्दी करून झुंबडीनं आलेले होते. सगळ्यांना थोपविणं कठीण होत होतं. कलेक्टर काहीतरी कळवळून सांगत होते. पण त्यांचं म्हणणं आम्हाला नीट समजत नव्हतं.

''साहेब, आम्ही तुम्हांला अटक केलेलीच नाही.'' कलेक्टर कळवळून बोलले. यशवंतराव म्हणाले :

'' असं कसं? कागदपत्रांवर सह्या घेतल्यात. आम्ही लिहून दिलं. मला इथे आणलं. वृत्तपत्र व प्रसारमाध्यमांनी सगळं अटकसत्राचं प्रसिद्धीला दिलं. तुम्हांला नेमकं काय म्हणायचं आहे तेच कळत नाही.''

''साहेब, सगळ्यांना अटक केली हे खरं आहे, पण चांदूर रेल्वेला तुम्हाला आम्ही अटक केलीच नाही.'' - पुन्हा कलेक्टर. मग शरदरावांनी खुलासा केला.

''पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी दिल्लीला पार्लमेंटमध्ये व प्रेसला खासदार यशवंतराव चव्हाण यांना अटक केलीच नाही असं स्पष्टपणे सांगितलं आहे. तसं नागपूरला मुख्यमंत्री व संबंधितांना कळविलं आहे. लगेच नागपूरला जाऊन तुम्हांला दिल्लीला त्वरित विमानानं बोलविलं आहे.''

यशवंतरावांना नागपूरला घेऊन जाबला गाडी आलेली होती. ते गाडीत बसायला लागले तेव्हा, त्यांच्या औषधी-गोळ्या मी त्यांच्याजवळ दिल्या. 'रस्ता फार खराब आहे, मी नागपूरपर्यंत येऊ का' असं त्यांना म्हणालो. तेव्हा यशवंतराव माझ्याकडे पाहून मंद हसले, ''मला अटक केलेली नाही असं ते म्हणताहेत. तुमच्यासाठी इथून हलायला मोकळीक नाही. तर मी एकटाच निघतो.''

त्या दोन दिवसांत यशवंतरावांसाठी मला व्यक्तिगत खूप करता आलं याचं समाधान वाटलं. नंतर अटक केलेल्या दिंडीतल्या सगळ्यांना बोंबलत चांदूर रेल्वे या मूळ अटक केलेल्या प्रदेशात घेऊन जाण्यात आलं. दिंडीच्या बाजूनं कोर्टात निकाल लागला होता.

एस. एम. जोशी यांच्या हातून शेतकऱ्यांच्या मागण्यांचा खलिता दिंडीतल्या शेतकऱ्यांनी, शरदरावांनी नागपूरला विधान भवनावर लावला. दिंडीची सांगता झाली.

शरदराव मुख्यमंत्री असलेलं पुलोदचं सरकार केंद्रानं रद्दबातल केलं. लगेचच सत्ता ज्याच्या हाती आहे तिकडे लोक नेहमीप्रमाणे भराभर गेले. विधानसभेत विधान परिषदेचे आमदार हळूहळू दुसरीकडे गेले. यात नवीन काहीच नव्हतं. राजकारणातले अलीकडले दिवसच तसे आहेत. त्यावर वेगळं बोलायचं कारण नाही. शरदराव यांची होईल तेवढी कुतरओढ करण्याची संधी अनेकांनी घेतली. शरदरावांना सोडून जाताना पुष्कळदा 'यशवंतराव आता स्वगृही जातात म्हणून आम्ही जात आहोत, यशवंतरावांचं मोठेपण आपण टिकवलं पाहिजे व त्यांना भक्कम पाठिंबा पाहिजे म्हणून जात आहोत' अशी भाषणं सुरू झाली होती. शरदरावांचे अत्यंत जवळचे, विश्वासातले सगळे ते पुन्हा सत्ता येताच 'काँग्रेस आय'मध्ये गेले. फक्त आठ आमदार त्यांच्या जवळ राहिले.

सातारला त्या वेळी फार मोठी मीटिंग् करून आले तेव्हा मी बारामती कृषी प्रतिष्ठानवर माझ्या खाजगी कामासाठी आलो होतो. त्यांना कळल्यावर ते तिथे आले. श्री. प्रतापराव भोसले त्यांच्यासोबत होते. तेसुद्धा लगेच निघून गेले. श्री. आप्पासाहेब पवार, शरदराव व आम्ही दोघं-तिघं तेवढे तिथं दोन-तीन तास थांबलो. पाच वाजता शरदराव मला घेऊन पुण्याला आले. यशवंतरावांचे पुतणे पुण्याला राहतात त्या टेकडीजवळच्या बंगल्यावर यशवंतरावांना शरदराव व मी भेटलो. बाहेर दोन-तीनशे कार्यकर्ते उगाचच फार गंभीर होते. शरदराव, प्रतापराव, यशवंतराव खूप वेळ आत बोलत बसलेले होते. मी बाहेर थांबलो होतो.

श्री. ना. ग. नांदे हे विधान परिषदेचे सदस्य होते व माझी-त्यांची खूपच चांगली मैत्री होती. आम्ही तसे खूप जवळ होतो. शरदराव व यशवंतरावांच्या ते अतिशय विश्वासातले होते. घनिष्ट संबंध होते. नांदे यांनी मला गाडीतून बाहेर नेलं, माझ्याशी बोलले व पुन्हा आम्ही दोघं त्या बंगल्यावर आलो.

मी शरदरावांना सोडून आय् काँग्रेसमध्ये यावं, यशवंतरावांना बरं वाटेल. जवळपास सगळे आलेले आहेत. उशिरा येऊन उपयोग नाही, तुम्ही फार विचार करू नका या कागदावर सही करा, उद्या मी जाहीर करतो. ना. ग. नांदे यांनी खूप काही मला सांगितलं त्यातला आशय असा होता. मी यशवंतरावांना भेटतो व मग सांगतो, एवढंच मी बोललो.

मी आत यशवंतरावांना भेटायला गेलो. ते म्हणाले, "नामदेवराव, आज भेटू नका. मी फार गडबडीत आहे."

"आजच मला तुम्हांला भेटायचं आहे." मी आग्रह धरला. दोघं-तिघं तिथे होते ते बाहेर गेले.

"तुमच्यासाठी मी आय् काँग्रेसमध्ये यावं असं लोक म्हणताहेत, ना. ग. नांदेसुद्धा बोलले. मी शरदरावांसोबतच राहावं असं मला वाटतं. यशवंतराव फारच अबोल व सुन्नपणानं बसले

होते त्यांचा थोडाही बऱ्यापैकी मूड नव्हता. तरीही ते माझ्याशी बोलले :

"बाकीच्यांचं ठीक आहे. रोज आमदार, खासदार, कार्यकर्ते येताहेत. काहीतरी भूमिका मांडताहेत. शरदराव, शरदरावांचं पाहून घेतील. त्यांचीही अवस्था फार वाईट आहे. माझी थोडीही काळजी करण्याचं कारण नाही. निदान तुम्ही तरी करू नये. आयुष्यात मला खूप काही मिळालं. मी खूप काही पाहिलं, भोगलं. आता कशासाठी काय करायचं याचा हिशेब व गणित लावू नये. ते व्यर्थ आहे. माझ्या मनाच्या अडचणी फार भिन्न आहेत. सगळं सांगणं कठीण आहे व कारणही नाही. आयुष्यभर मी काँग्रेसमध्ये राहिलो. यापुढेही मुख्य प्रवाहात राहावं. बाहेरचे कोणीही काही करून देश व राज्य नीट चालवू शकत नाहीत. त्यांना खूप मर्यादा आहेत. मी इतरांमध्ये कोंडल्यासारखा होण्यापेक्षा इथे कसाही चांगला आहे. मला आता काही एक मिळवायचं राहिलेलं नाही.

तुम्ही शरदरावांना सोडून इकडे आलात तर काही राजकीय स्वार्थासाठी, मतलबासाठी आलात असा अर्थ होईल. तुमच्याबाबत असं मत होऊ नये. तुमच्यावर तसं कोणी लिहू नये. तुम्ही आहात त्याच ठिकाणी चांगल्या पद्धतीनं राहा. काम करा. तुम्हांला फरक पडणार नाही. कविता ही तुमची खरी शक्ती आहे, राजकारण नव्हे. एका मर्यादेपलीकडे तुम्हांला ते मानवणारंही नाही. मला उलट तुम्ही तिथे राहण्यातच आनंद वाटेल. शरदरावांनाही तुम्ही एकटेपणी त्यांच्यासोबत असल्यानं बरं वाटेल. कुणाचं ऐकू नका. मी सांगतो तसं करा."

मी यशवंतरावांचं हे खरखुरं प्रामाणिक मत ऐकून चकित झालो. मला त्याआधी त्यांच्या नावावर माझ्या विश्वासातल्या व जवळच्या आमदार-खासदारांनी, कार्यकर्त्यांनी मी यशवंतराव चव्हाण काँग्रेस आय-'मध्ये आल्यावर त्यांच्यासोबत त्यांची शक्ती वाढवायला न येता शरदरावांबरोबरच राहतो आहे, यामुळे

यशवंतराव माझ्यावर खूप नाराज आहेत, असं ठासून ठोकलेलं होतं. ते संपूर्ण खोटं होतं.

शरदरावांची सत्ता गेल्यावर रोज सगळे त्यांना सोडून चालल्यावर मी त्यांना एक सविस्तर आंतरदेशीय पत्र लिहिलं होतं. आताचे आठ आमदारही गेले तरी फक्त मी व प्रतिभावहिनी तुमच्यासोबत असू. कार्यकर्त्यांच्या मीटिंगमध्ये त्या पत्राचं वाचन झालं होतं. असं मला कोणी तरी नंतर सांगितलं.

शरदरावांसोबत पक्कं राहायचं या माझ्या मनात मी कधीच बदल केला नव्हता. एका माजी मुख्यमंत्र्यांनं बरंच सत्तेचं आमिषही मला हस्ते-परहस्ते व स्वतःही दाखविलेलं होतं. तरीही मी माझ्या भूमिकेशी अगोदरपासूनच पक्का होतो. यशवंतरावांनी जेव्हा मला खरं ते सांगितलं तेव्हा माझ्या पक्क्या विचारांचंच मला खूप बरं वाटलं. समाधान वाटलं.

यशवंतरावांना नेहमी नवीन पुस्तकं वाचण्याचं वेड होतं. प्रकाशित झालेली नवी चांगली पुस्तकं ते मागवून घेत. एवढ्या व्यापात ते केव्हा, कसे, कधी वाचत असत याचं कोडं मला अजूनही सुटलेलं नाही. वर्षभरातली मराठीतली पंचवीस-पन्नास तरी त्या वर्षाची निवडक चांगली पुस्तकं त्यांनी वाचलेली असायची.भेटीत ते त्या पुस्तकांच्या चर्चा करीत. आपली मतं तपासून घेत. खूप लेखक व प्रकाशक त्यांच्याकडे नियमित पुस्तकं पाठवीत असत. इंग्रजी व इतर भाषांतल्या पुस्तकांशी संदर्भ ती पुस्तकं वाचून झाल्यावर ते मित्रांसोबत बोलण्यातून देत. मिळतील ती चांगली पुस्तकं वर्षातून एक-दोनदा तरी त्यांना भेट म्हणून मी घेऊन जात होतो. ''रिव्हिएरा'वर पुस्तकं दिल्यावर ते फार प्रसन्न असायचे. त्या लेखकांची, त्यांच्या नव्या लेखनाची चौकशी करायचे. खूप आडवळणाच्या गावांचे, थेट विदर्भ-मराठवाडा-कोकणातले नवीन लेखक चांगलं लिहिताहेत या गोष्टीचा त्यांना अभिमान वाटायचा.

त्या समृद्ध लेखकांचा, नव्या लेखकांचा, दलित-ग्रामीण नव्या प्रवाहांचा त्यांच्या भाषणांमधून ते आवर्जून उल्लेख करीत असत. त्यांच्या भेटींसाठी खूप उत्सुक असत. जी. ए. कुळकर्णी यांची 'इस्किलार' ही दीर्घ कथा त्यांना वाचायची होती. त्यांनी मला सांगितलं तेव्हा मी जी.एं. चीदोन दीर्घ कथांची पुस्तकं त्यांच्याकडे घेऊन गेलो. तेव्हा ते भालचंद्र नेमाडे या लेखकाला भेटायचं आहे असं म्हणाले. केव्हातरी भेटीचं ठरवा असं मला पुन्हा एक-दोनदा म्हणाले. चांगली वाङ्मयीन मासिकं बंद पडताहेत, याचं त्यांनी दुःख व्यक्त केलं. मी त्यांना 'अनुष्टुभ' या वाङ्मयीन मासिकाबद्दल सांगितलं, काही अंक दिले तेव्हा त्यांना ते आवडले. त्या मासिकाच्या संपादकांना त्यांनी समालोचन करून दीर्घ पत्रं लिहिली. त्यांनी स्वतःची तहहयात वर्गणी पाठविली व त्यांना इतरही मदत व्हावी म्हणून प्रयत्न केले. मंनमाड, धुळे या ठिकाणांहून या वाङ्मयीन घडामोडी आता होताहेत याचा त्यांना फार आनंद वाटला.

काँग्रेस एस्.च्या तिकिटावर श्री. शरदराव पवार यांना वीस-पंचवीस खासदार उभे करायचे होते. स्वतः शरदराव बारामती मतदारसंघातून लोकसभेसाठी उभं राहायचं पक्कं झालेलं होतं. बारामती, पुणे या दोन तासांच्या मोटार-प्रवासात शरदराव, मी व बारामतीचे त्यांचे विश्वासू कार्यकर्ते श्री. भीमदेव गोफणे असे होतो. औरंगाबाद मतदारसंघातून मी लोकसभेसाठी उभं राहावं असा शरदरावांचा आग्रह होता. औरंगाबादेच्या त्या जवळपासच्या एक-दोन सभा-संमेलनांतून हे उद्याचे औरंगाबादचे खासदार अशा शब्दांत त्यांनी घोषणाही केलेली होती. कार्यकर्त्यांनाही सांगितलं होतं. खाजगीतही त्या वेळी 'काय खासदार?' असंच ते म्हणायचे. मी त्यांना माझ्या खूप अडचणी सांगितल्या. पण ते बिल्कुल ऐकेनात. तुम्ही फक्त फॉर्म भरा. प्रचारसभा, पैसा,

निवडून आणणं सगळं आम्ही करू. तुम्हांला थोडाही त्रास होणार नाही. शेतकऱ्यांच्या योजना आता दिल्लीत बोलत्या करा. मी काही एक ऐकणार नाही.

श्री. भीमदेव गोफणे व शरदराव बारामती-पुणे प्रवासात फारच आग्रह धरून माझ्या पाठीमागे लागले. त्यापूर्वी पाच वर्षांआधी मराठवाड्यातल्या नेत्यांनी मला खासदार म्हणून उभा राहण्याचा आग्रह धरलेला होता. तसं वृत्तपत्रातून ठळकपणानं माझं नाव त्या वेळीही आलेलं होतं, पण ते मला नकोच होतं. फार तरुण नव्या कार्यकर्त्याला तिकीट देताहात हे बरोबर नाही असं बाकीचे म्हणत होते. पण मीच तयारी दर्शविली नव्हती ही त्या वेळची खरी वस्तुस्थिती होती.

शरदराव नुसते आग्रही नव्हते तर थोडे रागावलेलेही होते. मी यशवंतरावांना भेटलो. त्यांच्या कानावर ही गोष्ट घातली.

''शरदरावांचं तुम्ही खूप ऐकलं. आणखीही ते सांगतील ते ऐका. त्याप्रमाणे करा; पण लोकसभेसाठी उभं राहण्याचं बिल्कुल ऐकू नका. ते होऊ द्यायचं नाही. तुम्ही निवडूनही येऊ शकता; पण राज्यपाल, राष्ट्रपती यांच्याकडूनच तुम्ही बिगरनिवडणुकीनं सन्मानानं सभागृहात जावं असं मला वाटतं. तुम्ही चांगले लेखक-कवी आहात. तरुण आहात. तुमच्याकडून महाराष्ट्राच्या खूप अपेक्षा आहेत. चांगली निसर्गकविता तुम्ही मराठीला दिलीय्. इतका सुंदर निसर्ग व शेती देशात आहे. सर्वदूर त्याचं सौंदर्य दिसतं. त्याचं आव्हान स्वीकारून तुम्ही लिहावं. ते आम्हांला पाहिजे. निवडणुकीच्या जंजाळात तुमच्यावर फार बंधनं पडतील. ते जग फार निराळं आहे. आता तुमच्यावर तशी बंधनं नाहीत. आमदार, मंत्री, खासदार आम्हांला खूप मिळतील. चांगला कवी मिळणं कठीण आहे. त्या कवीला त्याच्या कवितेसकट जपायचं असेल तर उभं करून उपयोगी नाही. तुमची कविता महत्त्वाची. ती नसती तर माझं तुमच्याशी, तुमच्या पळसखेड्याशी नातं जुळलं नसतं. महाराष्ट्रातले जे कुठेच कधी स्वतःहून जात नाहीत ते श्रेष्ठ

साहित्यिक कलावंत तुमच्या सुन्या खेड्यात तुमच्यासाठी आले नसते. तुमची शक्ती व काम वेगळं आहे हे आम्ही समजून घ्यावं.

पुन्हा शरदराव यांनी तुम्हांला कितीही निवडून आणायचं ठरविलं तरी ते संपूर्ण त्यांच्या हातचं नाही. विरोधी पक्ष तुम्हांला मदत करील, सामान्य शेतकरी समाज तुम्हांला मदत करील. शरदराव सगळं काही करतील परंतु आपल्याच कुठल्याही काँग्रेस नेत्यांनी ठरविल्यावर तुमच्यासोबत राहूनही ते बरोबर आतून तुम्हांला पाडतील. आम्ही फार पाहतो. रोज अनुभवतो. तुमचे वडील वारल्यावर साधा मृत्यूचा दाखला दोन महिने तुम्हांला मिळाला नाही. तुम्हांला खूनखराबीची भाषा करून खूप त्रास दिला. तुम्ही तर लोकप्रिय कवी होता. काय कुणाचं बिघडवलेलं होतं. मी स्वतः खूप संपर्क साधून तेव्हा तुमच्या पाठीशी होतो. तुमच्या परिसरातल्या नेत्यांना निक्षून सांगूनही तुमच्याविषयी विशेष अशी आस्था कोणी दाखविली नव्हती. फक्त तोंडी होकार द्यायचे. मी खूप बारकाईनं पाहिलं. वसंतदादा, शरदराव आम्ही तुमच्या पाठीशी नसतो तर काय झालं असतं? तुमची त्यांना ओळख होऊच शकत नाही.

अगोदरच तुमची आर्थिक स्थिती नाजूक, कौटुंबिक प्रश्न गुंतागुंतीचे. पुन्हा त्यात तुम्ही आजही फार भावनाशील राहून मनाला लावून घेता. तुम्ही घरच्यांसाठी किती उभारलेलं असलं, प्रेम दिलेलं असलं तरी एखाद्या दिवशी ते तुम्ही तुमच्या स्वार्थासाठी, मोठेपणासाठी करता असंही म्हणतील व तुमच्या त्यागाचं विस्मरण होईल. हा निवडणुकीचा छंद फार वाईट आहे. हा छंद वेडा व कठीण आहे. तो तुमचा नाही एवढंच आज तरी मला ठाऊक आहे. मी फार जवळून तुमच्यामध्ये गुंतून आहे. निदान आज तरी हे संपूर्ण टाळावं. शरदरावांशी शक्य झाल्यास मी बोलेन. पोटापाण्याचं आधी व्यवस्थित झालं पाहिजे. या बाकीच्या गोष्टी नंतर.'' यशवंतराव तेव्हा असं बरंच काही बोलले. शरदरावांची खूप नाराजी पत्करून मी नकार कळविला.

प्रत्येक मनमोकळ्या भेटीत, चर्चेत मला यशवंतरावांच्या स्वभावातलं नवीन रूप दिसायचं. त्यांचे राजकारणातले खूप उंचीवरचे ऐश्वर्यसंपन्न दिवस व गर्दी मी पाहिली. ज्यांच्यावर आयुष्यभराचे असाधारण उपकार केले तेही फिरकत नाहीत असे माणसांशिवायचे, त्यांच्यावर घनाघाती खोटे आरोप करणारे, न समजून घेणारे वैफल्यग्रस्त वाळवंटातले दिवस मी शेवटी जवळून पाहिले. महाराष्ट्रातल्या सर्वसामान्य माणसांचं निस्सीम प्रेम व त्यांच्या विचारांवरली श्रद्धा घेऊन पुढे जाणारी सर्व क्षेत्रांतली मोठी माणसं पाहिली. ती आजही यशवंतरावांना दैवत मानतात. अकारणी कधी वृत्तपत्रांनी, राजकारण्यांनी, साहित्यिकांनी त्यांना सामान्य पातळीवरूनही शेवटी वैताग दिला व आजही तेच लोक त्यांच्या मृत्यूनंतरच्या कोरड्या महाराष्ट्रात राजकारण, समाजकारण, साहित्य-कला-संस्कृती, सभ्यपणा व माणूसपण याच्यासंबंधी लिहितांना ओतप्रोत भरभरून लिहिताहेत. पण यशवंतरावांसारखा इतका नम्र, जाणता, सुसंस्कृत, सर्व क्षेत्रांतली जाण असलेला नेता कित्येक वर्षांत झालेला नाही. त्यांच्या सर्वज्ञपणाची, जाणतेपणाची, सुज्ञपणानं सर्वांना घेऊन केलेल्या राजकारणाची आज तीव्र आठवण ठायी ठायी येते. माणूस कितीही मोठा असला तरी कुठेतरी नकळत चुका होणार किंवा गैरसमजानं लोक ते चुकीचं आहे असं म्हणणार. यशवंतरावांनी आपल्या आयुष्यात एक-दोन चुका केल्या. चुका झाल्या तरी त्याचे दुष्परिणामही भोगले पाहिजेत त्यात चुकीचं काय, असं त्यांच्या खास जवळच्या माणसांजवळ बोलल्याचं, नम्रपणानं ते कबूल केल्याचं मला माहीत आहे. पुष्कळदा त्यांच्यावरल्या नितांत प्रेमापोटी मी राजकारणी पवित्रे समजत नसल्यानं पत्र वगैरे लिहून टाकायचो. त्यात मनमोकळेपणी स्थिती कळवायचो. पण माझी मतंसुद्धा सांगायचो. हे बरोबर नव्हतं असं नंतर माझ्या लक्षात यायचं किंवा इतर मंडळी मला नंतर त्याबद्दल शिव्या देऊन गाढव म्हणत. यशवंतरावांना इतर राजकारण्यांसारखा माझ्या हा उपद्रवाचा कधी राग आला नाही. उलट पुष्कळदा

कळविलेल्या काही राजकीय घटनांची मी केलेली मल्लीनाथी त्यांनी गंभीरपणानं घेतली. राजकीय जाणते लोक सहसा पत्रातून लेखी त्यासंबंधी लिहीत नसतात. ते मला क्वचित तसंही संदर्भासह लिहायचे.

यशवंतरावांनी उपपंतप्रधानपद राजकीय जाणकार मित्रांच्या, सल्लागार कार्यकर्त्यांच्या आग्रहानं स्वीकारलं होतं. जे काय गणित त्या वेळी मांडलं गेलं ते यशस्वी होणार हे गृहीत धरूनच पुढच्या दृष्टीनं केलेलं होतं. मी महाराष्ट्रभर सर्व क्षेत्रांतल्या लोकांमध्ये विशेषतः बड्या लोकांमध्ये जवळून हिंडत होतो, याचा गोषवारा करून यशवंतरावांना उपपंतप्रधान असताना वाईट अशा राजकीय स्थितीचं व त्याच्या भवितव्याचं आपुलकीनं पत्र लिहिलं. हे फार काळ टिकणार नाही परंतु तुमच्या भवितव्याच्या दृष्टीनं आणखीनच वाईट आहे असं काहीतरी सविस्तर मी लिहिलेलं होतं. यासंबंधी खूप काही मला समक्ष बोलायचं आहे असंही लिहिलं होतं.

ते उपपंतप्रधान असताना या दीर्घ पत्रानंतर दिल्लीहून मला ६ ऑगस्ट १९७९ ला त्यांनी पत्र लिहिलं.

''स.न.वि.वि.

तुमचे पत्र मला मिळाले. माझं पत्र तुम्ही दिल्लीला येण्यास निघण्यापूर्वी मिळेल की नाही याबद्दल शंका आहे. परंतु तुमचे आभार मानले पाहिजे. तुमच्या इच्छेप्रमाणे कोणत्याही दिवशी माझ्याकडे राहायला या. राजकीय परिस्थितीबाबत तुम्ही कळविलेले चित्र वस्तुनिष्ठ आहे, अनिश्चित भविष्यकाळ तत्त्वाच्या कसोटीवर काढावा लागेल.

कळावे ''

कुठल्या तरी चुकल्या क्षणाला किरकोळ काही होऊन जातं व विपरीत घडून येतं. एखादा चुकलेला भाग आयुष्यभर खिळा घेऊन बसतो. नको ते गैरसमज वाढत जातात. ते वाढीस लावण्याचं

काम करणारी स्वतंत्र खास माणसं असतात. हे चालत राहणार. गोविंदराव तळवलकर-यशवंतराव; पु.ल. देशपांडे-यशवंतराव; वसंतदादा पाटील-यशवंतराव; मंगेशकर-यशवंतराव-असे आणखी पुष्कळ. या सगळ्यांशी माझे घनिष्ट कौटुंबिक संबंध आहेत. दोघा-दोघांमध्ये कुठे कधीतरी अढी आलेली असेल. तुटलेपण आलेलं असेल पण कोणीही एक दुसऱ्यांविषयी वाईट बोललं नाही. वाईटपण वाटू दिलं नाही. उलट एकमेकांच्या त्या त्या क्षेत्रातल्या मोठेपणासंबंधी आदर व्यक्त करताना त्यांना मी पाहिलंय्. यशवंतरावांकडे या मंडळींच्या संबंधी कधी विषय निघालाच तर ते चांगलंच बोलले. थोडी कधी कुठे कटुता आली असेल ती गंगेत सोडली. मनातली अढी काढून टाकली. संयम राखून शांतपणानं यशवंतरावांनी माणसं, त्यांचं मोठेपण जतन करण्याचा प्रयत्न केला. उथळपणा कुठेच येऊ दिला नाही. यशवंतरावांच्या सुजाण संपन्न व्यक्तिमत्त्वात ते कधी नव्हतंच. मी लिहिलेली *'जैत रे जैत'*ची सोळा गाणी व एच्. एम्. व्ही.नं नव्यानं केलेली *'आजोळची गाणी'* श्रीमती लता मंगेशकरांनी गायिलेली होती. त्यांच्या कॅसेट्स व रेकॉर्ड्स, नवीन कवितांच्या कॅसेट्स मी यशवंतरावांकडे मुंबईला भेटीत देण्यासाठी घेऊन गेलो. यशवंतराव म्हणाले, तुमच्यावर मंगेशकर मंडळींचं खास प्रेम दिसतंय्. चांगली गोष्ट आहे.

त्यांच्याच एका कामाच्या संबंधी तुमच्याशी बोलायला मी आलोय् असं सांगितलं व मुख्य विषय सविस्तर सांगितला. संगीत, शास्त्रीय संगीत, नाट्यसंगीत, लोकसंगीत, गीत, भावगीत व गायकीतल्या इतिहासातले अनेकविध प्रयोग, घटना, गाणारी माणसं, त्यांचा इतिहास, रेकॉर्डिंग वगैरे जतन करून त्याची मोठ्यात मोठी लायब्ररी करावी. संगीताचं सगळं शिक्षण दिलं जावं. रेकॉर्डिंगचं अद्ययावत तंत्र व यंत्रसामुग्री व कमी किमतीत ते कलावंतांना मिळवून देण्यासाठी त्याला जोडून संगीताचं शिक्षण इत्यादी, त्याला जोडून कला-ललित कला ह्यासाठी एक 'कला प्रकल्प' मुंबईत करावा व त्यासाठी शक्य ते सर्व करावं अशी

श्रीमती लता मंगेशकर ह्यांची इच्छा आहे. त्यांना लीजवर जागा पाहिजे. त्यासाठी चर्चा करायला मी तुमच्याकडे आलो आहे. संगीत ही प्रधान गोष्ट ठरवून 'कला प्रकल्प' मुंबईत वांद्र्याला कुठेतरी अर्धा एकर जागा घेऊन करायची त्यांची इच्छा आहे. नाममात्र किमतीत शासनानं जागा लवकर द्यावी. मी मुख्यमंत्री वसंतदादांशी बोललो आहे. आपण मदत करावी. लतादीदी स्वतः आठ-दहा कोटी या प्रकल्पासाठी टाकणार आहेत.

यशवंतराव म्हणाले : एकतर अद्याप महाराष्ट्रासारख्या राज्याकडून साध्या कला अकादमीला मान्यता तुम्ही अनेकदा सभागृहात मांडूनही मिळालेली नाही. त्यांना असलं काही नको असतं. एवढ्या मोठ्या रकमेची तरतूद करू, किंवा ही कल्पना प्रत्यक्षात घेऊन श्रीमती लता मंगेशकर 'कला प्रकल्पा'ची योजना पूर्णत्वास नेणार असतील तर त्याच्याइतकी चांगली गोष्ट नाही. पण खरोखरच त्या हे करणार आहेत का? इतर लक्षावधी माणसांनी हे काम करण्यापेक्षा लताबाईंनी करण्यात फारच महत्त्व आहे. त्याला वेगळं मोल द्यावं लागेल. एवढ्या धकाधकीत लताबाईंचं आयुष्य गेलं. आता त्यांना व्याप नको असणार. तरीही त्या करताहेत असं तुम्ही म्हणता. तुम्ही सरळ, साधे कवी. त्यांच्या सहीचे कागद आधी घ्या.

मी श्रीमती लता मंगेशकरांच्या लेटर पॅडवर दोन पेजिसमध्ये 'कला प्रकल्पा'चा आराखडा, उद्देश सांगणारा व विनंतीवजा असलेला अर्ज लता मंगेशकरांच्या सहीचा होता तो यशवंतरावांच्या समोर ठेवला. ते वाचत असतानाच त्यांच्या चेहऱ्यावर निर्मळ आनंद स्पष्ट दिसत होता.

मुख्यमंत्री वसंतदादांकडे तुम्ही त्यांना समक्ष घेऊन जा, दादा ह्यात कोणत्याही अडचणी येऊ देणार नाहीत. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाच्या दृष्टीनं ही महत्त्वाची बातमी आहे. यशवंतरावांनी मुख्य सचिव श्री. राम प्रधान ह्यांना फोन केला, ते वसंतदादांशी बोलले.

यशवंतराव म्हणाले : मी मुख्यमंत्री होतो तेव्हा १९६० ला राम प्रधान मुख्य सचिव होते. रवींद्र नाट्य मंदिराची जागा तेव्हा मोठी वाटायची. आज बघा ती किती अपूर्ण व लहान वाटते. म्हणून हा 'कला प्रकल्प' करताना रवींद्रनाथ टागोरांच्या शांतिनिकेतनच्या पडतीनं सर्वांगसुंदर व्हावं ही इच्छा आहे. तो चांगला व्हावा म्हणून वांद्र्याजवळ जी जागा मागितली ती अठरा एकर आहे. त्यातली तीन-चारच एका ठिकाणी अडकून आहे. तुम्ही कला प्रकल्पासाठी अर्ध्या एकराऐवजी अडीच एकर (एक हेक्टर) जागा मागावी. मी सगळ्यांशी बोलतो. लताबाईंच्या अर्जावर वीस हजार फूट असं लिहिलेलं होतं. त्याच ठिकाणी यशवंतरावांनी माझ्याकडून १ लाख असा आकडा टाकून घेऊन १ लाख वीस हजार फूट असं करून घेतलं.

४ ऑगस्ट १९८३ रोजी सकाळी 'वर्षा'वर मुख्यमंत्री वसंतदादांनी बोलावलेल होतं. तिथे श्रीमती लता मंगेशकर, श्री. हृदयनाथ मंगेशकर व मी असे तिघे मिळून सकाळी गेलो. मुख्य सचिव, दोन्ही महसूलमंत्री व कागदपत्र-नकाशे त्या ठिकाणी मागविलेले होते. वसंतदादांनी मुख्यमंत्री या नात्यानं स्वतःच्या हस्ताक्षरात लिहून अडीच एकराच्या कला प्रकल्पाच्या अर्जावर सही करून तसे स्पष्ट आदेश सगळ्यांना दिले. यशवंतरावांचा फोन होता हा संदर्भही आम्हांला दिला.

वसंतदादांच्या नंतर आलेल्या मुख्यमंत्र्यांनी व खास करून त्यांच्या महसूलमंत्र्यांनी ही वांद्र्याची जमीन किंवा कोणतीही अन्य जमीन लता मंगेशकरांना देता येणार नाही असं खास पत्र मला व श्रीमती लता मंगेशकराना पाठविलं. श्रीमती लता मंगेशकरांनीसुद्धा पुन्हा असं काहीच करायचं नाही हे ठाम ठरविलं व कुठे शब्दही न बोलता ते स्वप्न गाडून टाकल. अपमान सहन केला.

एका बाजूला साहित्य-कला-संस्कृतीचा प्रकल्प महाराष्ट्रात होतो आहे म्हणून त्याच्या उभारणीसाठी जिवाचा आटापिटा

करणारे यशवंतराव व दुसरीकडे त्याच ठिकाणी हे दुसरे राव!

एकदा औरंगाबादेला यशवंतराव येणार होते. ती तारीख त्यांनी मला पत्रानं कळविली. संध्याकाळी आठ वाजल्यानंतर मी इतर कोणालाही भेटणार नाही. भालचंद्र नेमाडेंची ह्या वेळी भेट व्हावी. कसं ते तुम्ही ठरवा. मी सुभेदारी विश्रामगृहात आहे, असंही लिहिलं. मी त्याप्रमाणे आखणी केली. भालचंद्र नेमाडे व यशवंतराव ह्यांचा खूप पत्रव्यवहार झालेला होता. मनानं, विचारानं ते एकमेकांच्या खूप जवळ होते पण भेट कधीच झालेली नव्हती. यशवंतरावांनी आता आत्मचरित्र लिहावं अशी नेमाडेंची फार इच्छा होती. चंद्रकांत पाटील व मी भालचंद्र नेमाडेला घेऊन सायंकाळी आठ वाजता सुभेदारी रेस्ट हाऊसवर आलो. बाहेरच्या व्हरांड्यात प्रवेशदाराशी थांबलो. औरंगाबाद, जालना, नगर अशा अनेक ठिकाणचे आमदार, खासदार, पुढारी गर्दी करून होते. मी त्यांच्याकडे खोलीत गेलो. मला पाहताच त्यांनी 'नेमाडे आले का?' असं विचारलं. बाहेर थांबले आहेत असं मी सांगितलं. ताबडतोब यशवंतराव उठले व बाहेर आले. नेमाडेंची ओळख करून दिली.

यशवंतराव नेमाडेला मनापासून भेटले व त्याचं स्वागत केलं. नेमाडेना त्यांच्या खोलीत घेऊन गेले. दोघांची खूप दिवसांची घनिष्ट मैत्री असावी असं छानपैकी भेटणं झालं. नगरचे त्या वेळचे खासदार आठल्ये पाटील; श्रीरामपूरचे, औरंगाबादचे नेते व आमदार नेहमीचं सांगू लागले. यशवंतरावांनी हात जोडून नम्रपणानं त्यांना सांगितलं, मला आता तुमच्याशी कोणाशीही बोलता येणार नाही. सकाळी भेटू व बोलू. यांच्याशी मला आता भेटू द्या. अनेक भेटी व चर्चा झालेल्या असाव्यात असं दोघांच्या भेटीचं व चर्चेचं स्वरूप होतं. इतर गप्पा झाल्यावर नेमाडेनं यशवंतरावांनी आत्मचरित्र लिहावं असा आग्रह धरला.

यशवंतराव म्हणाले, मलाही तसं वाटतं, पण लिहिणं फार

कठीण आहे. पट फार मोठा आहे. महत्त्वाच्या घटनांनासुद्धा न्याय देणं कठीण वाटतं. त्यापेक्षाही अवघड म्हणजे लिहिण्याची पद्धतच मला अजून सापडत नाही.

नेमाडे म्हणाला, ते काहीच कठीण नाही. ह्या ह्या पद्धतीनं लिहिणं सोपं. त्यापूर्वी अशी अशी काळजी घ्यावी लागेल. वर्षभरात टिपणं, कालक्रम व मुख्य घटनांचा आलेख नीट झाला तरच नंतर दोन-तीन वर्षांत दोन भागांत आत्मचरित्र व्यवस्थित होऊ शकतं. आता पुन्हा तेच ते राजकारण नको. कुठे मोठी जागा दिली तरी घेऊ नका. स्वीकारूच नका. तुम्ही लिहिणं हे त्यापेक्षा फार फार महत्त्वाचं आज तरी आहे.

यशवंतरावांनी राजकारण, समाजकारण, स्वातंत्र्यपूर्व इतिहास, साहित्य-कला, देश-परदेश ह्या सगळ्यांची बांधणी करण्याचं सूत्र सांगितलं. तशी मांडणी करून दाखविली.

नेमाडेंचं म्हणणं असं की हे सगळं डोक्यातून काढून टाकावं. सगळंच येणं शक्य नाही. म्हणून लहानपण, देवराष्ट्र, कऱ्हाड असंच सरळ सुरू करावं. पुढे आपोआप सुचत जाईल तसं लिहावं. पण ताबडतोबीनं टिपणं व आराखडा तुमच्या तुम्ही तयार करा. पुन्हा सहा महिन्यांनी आपण एकत्र बसू. पण हे तुम्ही लवकर मनावर घ्यावं व सुरू करावं. 'कृष्णा काठ', 'सागर काठ', 'यमुना काठ' अशा तीन भागांत लिहून होणाऱ्या त्यांच्या आत्मचरित्राची अशी पक्की मुहूर्तमेढ औरंगाबादेला नेमाडेच्या भेटीत झाली होती. इतरही खूप लोकांचा तसा आग्रह होताच.

कोसला व कादंबरी चतुष्टय वाचून नेमाडे या लेखकावर यशवंतरावांनी प्रेम केलं. कधी भेटी नाहीत. नेमाडे यांच्या समीक्षेच्या बंडखोर लेखांमुळेही त्यांना आकर्षण होतं. 'लेखकाचा लेखकराव होतो तो का?' व भाषा व शैलीच्या संबंधी लिहिलेले एक-दोन लेख, त्यातला स्पष्टपणा, रोखठोक मतं, भाषेतलं देशीपण व खेड्यातल्या संस्कारांचा, गावपणाचा उमटत राहिलेला लेखनातला चेहरा यशवंतरावांना महत्त्वाचा वाटत होता. वेळोवेळी

नियतकालिकं, अनियतकालिकं व नेमाडेंची पुस्तकं मी व इतरांनी यशवंतरावांना दिलेली होती. काही त्यांनी अगोदरच वाचलेली होती. खेड्यातल्या संस्कृतीत देशीपणा घेऊन आलेले व जतन करीत राहिलेले यशवंतराव नेमाडेसारख्या माणसांना आपले वाटले व त्यांची मैत्री पत्रानं, भेटीनं कायम राहिली. परंपरा व नवता या दोघांतलं चांगलं घेऊन चालणारे यशवंतराव अशी माणसं भेटली म्हणजे खूप प्रसन्न असायचे. असे त्यांचे मित्र कोणत्याही क्षेत्रातले असोत, वयाचं अंतर कितीही असो, त्यांच्याशी ते बरोबरीच्या नात्यानं वागत व मन खूप मोकळं करून बोलत.

१९८४. दिलीप पुरुषोत्तम चित्रे त्या वेळी 'भारत भवन'च्या 'वागर्थ'चा संचालक झाला होता. भारत भवन व भारत सरकारच्या सांस्कृतिक खात्याच्या वतीनं दिल्लीला जागतिक कविसंमेलन आयोजित केलं होतं. बेचाळीस देशांतले नामवंत कवी आलेले होते. भारतातल्या कवींची त्यासाठी निवड केलेली होती. मराठीतले अरुण कोलटकर, चंद्रकांत पाटील, नामदेव ढसाळ व मी असे चारच कवी निमंत्रित होते. त्यातही अरुण व चंद्रकांत काहीतरी अचानक उद्‌भवल्यानं आलेच नाहीत. मी व नामदेव अशा दोन नामदेवांनीच तिथे उपस्थिती लावली.(पंजाबापर्यंत जाऊन आलेल्या संत नामदेवाचीही त्या वेळी मला फारच आठवण येत होती!)

यशवतरावांनी सांगितलं: माझी स्वतःची इच्छा आहे, आणि दिल्लीतल्या मराठी लोकांची सर्वांचीच खूप इच्छा आहे म्हणून त्याचं खाजगी स्वतंत्र काव्यवाचन ठेवावं. तशी आखणी तुम्ही करा. इथे माझ्याकडे कार्यक्रम ठेवावा. मी सगळी व्यवस्था आनंदानं करीन. तसं कळवा.

अशोक जैन व नरेश परळीकर ह्यांना मी पत्रं लिहिली. दिल्लीतला चार-पाच दिवसांचा कार्यक्रम त्यांनी पक्का ठरविला.

जागतिक कवी संमेलनासाठी माझ्या कवितांची इंग्रजी, हिंदी भाषांतरं चार महिन्यांपूर्वीच केली गेली होती. संयोजकांचं तसं पत्र आलेलं होतं. तीनमूर्ती भवनला तीन दिवस सारखं काव्यवाचन, काव्यचर्चा कवींच्या भेटीगाठीत कवितेवर टिपणं असा योजनाबद्ध सुरेख आखलेला कार्यक्रम होता. राष्ट्रपती ग्यानी झैलसिंग, उपराष्ट्रपती व्यंकटरमण उद्‌घाटक व प्रमुख अतिथी होते. देशातले कित्येक कवी, काव्यप्रेमी रसिक तीन दिवस कविता व कवींमध्ये पार एकरूप झालेले होते.

मी व माझी पत्नी असे मिळून आम्ही दिल्लीला गेलो होतो. वसंतदादा पाटील, शंकरराव चव्हाण, विठ्ठलराव गाडगीळ, शिवराज पाटील, काही सचिव, पत्रकार अशा खूप जवळच्या भेटी दोन-तीन दिवसांत झाल्या. अशोक जैन, नरेश परळीकर ह्यांच्या सोबत दिल्लीतली भटकंती रात्रंदिवस चाललेली होती. साहित्य संस्था, सांस्कृतिक केंद्र अशा दिल्लीतल्या भेटीनं मी ताजातवाना झालो.

वेणूताई व यशवंतरावांनी एका सायंकाळी त्यांच्या बंगल्यावर माझ्या काव्यवाचनाचा स्वतंत्र कार्यक्रम ठेवलेला होता. मी माझ्या एकट्याच्या कविता वाचायच्या नाहीत असं ठरविलेलं होतं. कवयित्री बहिणाबाई चौधरी जन्मशताब्दी दोन वर्षांपूर्वी साजरी केली गेली होती. शेतकऱ्यांची कवयित्री म्हणून मी माझ्या पळसखेडला एका मोडक्या गोडाऊनचा पुनरुद्धार करून एक लहानसं सांस्कृतिक सभागृह बांधून द्यावं व त्याला बहिणाबाई चौधरी स्मारक म्हणावं असं योजिलेलं होतं. ते मी पूर्ण केलं. त्या निमित्तानं १८८० ते १९८० अशी शंभर वर्षांतली खेड्यातली मराठी कविता असा दोन तासांचा काव्यवाचनाचा कार्यक्रम आखलेला होता. 'खेड्यातली मराठी कविता' असा कार्यक्रम मी कालक्रमानं सादर केला.

सायंकाळी दिल्लीतला अख्खा महाराष्ट्र प्रातिनिधिक पद्धतीनं खूप गर्दी करून जमला. जागा कमी पडली इतका.

यशवंतराव व वेणूताई कार्यक्रम सुरू होण्यापूर्वी अर्धा तास दरवाजाजवळ स्वागतासाठी उभे होते. त्यांनी हात जोडून सगळ्यांचं मनःपूर्वक स्वागत केलं. लेखक, साहित्यप्रेमी, पत्रकार, सचिव व खूप राजकारणी आले. वसंतदादाही आले. त्यांचं स्वागत वेणूताईंनी व यशवंतरावांनी केलं. दादा माझ्याजवळ आले. त्यांनी खिशातून दोन रेल्वेची परतीची आमची तिकिटं काढून ती मला दिली. 'दादा तुम्ही कशाला आणलीत? यशवंत (दादांचा पी.ए.) घेऊन येणार होता ती '- मला खूप लाज वाटली.

दादांच्या पी.ए.ला नरेशनं आमची परतीची तिकिटं करायला दिलेली होती. दादांच्याकडे आम्ही सकाळी खूप गप्पा मारल्या होत्या. पण दादा इकडे येतील हे शक्यच नव्हतं. कुणालाही ते पटत नव्हतं. निदान ज्यांना माहीत होतं त्यांना दादांचं यशवंतरावांकडे येणं फारच नवलाईचं वाटलं.

पुलोद शासनाची स्थापना झाल्यावर शरदराव मुख्यमंत्री झाले. 'मला धोका देऊन हे झालं. त्यात यशवंतरावांचे आशीर्वाद होते' असं दादांचं स्पष्ट मत होतं. ते बदलत नव्हतं. तेव्हापासून दादांनी यशवंतरावांशी बोलणं, फोन वगैरे तर टाळलं होतंच, पण ते यशवंतरावांना कधी भेटलेसुद्धा नाहीत. खूप मोठ्या लोकांनी समजूत काढून सलोख्याचे प्रयत्न केलेले होते. पण दादा खूप रागावलेले होते. नेहमी दूर राहिले. माझ्या काव्यवाचनासाठी दादा यशवंतरावांकडे अबोला मोडून आले व मनातली अढी पहिल्यांदाच तिथं कमी केली. एका साध्या कवीमुळे हे झालं म्हणून लोकांनी मला धन्यवाद दिले.

शरदराव पुलोदचे मुख्यमंत्री होते. नागपूरच्या डिसेंबरातल्या पहिल्याच अधिवेशनात सत्ता शरदरावांच्या हाती आल्यावर इकडचे आमदार तिकडे पळापळ करून गेले. हे नेहमीचंच आहे. वसंतदादा खूप चिडलेले होते. मी त्याच वेळी राज्यपाल नियुक्त आमदार झालो. व पहिल्यांदा अधिवेशनाला आलो होतो. आमदार निवासाच्या पहिल्या विंगजवळ लिफ्टच्याजवळ वसंतदादा दुसऱ्या

दुसऱ्या माळ्यावर जाण्यासाठी उभे होते. त्यांची प्रकृती खूप खराब होती. ते आजारीच होते. शरदरावांना कळेल एवढ्या खोट्या भावनेपायी जवळून जाणारा कोणताही आमदार दादांच्या लिफ्टजवळ थांबत नव्हता व त्यांना टाळून पुढे जात होता हे मी पाहिलं. मी दादांना लवून नमस्कार केला. लिफ्ट थांबवली दुसऱ्या माळ्यावर डाव्या कोपऱ्यात दादांना दोन खोल्या दिलेल्या होत्या त्या ठिकाणी सांभाळून घेऊन गेलो. माझ्यासोबत माझा मित्र चंद्रकांत पाटील होता. पहिलंच अधिवेशन, कुणीतरी आत्मीय जवळ असावं म्हणून मुद्दाम मी चंद्रकांतला बोलावून घेतलेलं होतं.

वसंतदादांनी आम्हांला खूप वेळ खोलीत थांबवून घेतलं. घरचं- दारचं विचारलं. रात्र खूप झाली पण दादांची बोलण्याची इच्छा होती. शालिनीताईंना माझी ओळख करून दिली. त्यांनी ओळखलं नाही किंवा त्यांना माझी माहितीच नसावी. पण दादा त्यामुळे शालिनीताईंवर थोडे रागावले. मी यशवंतरावांच्या खूप जवळ असलेला. शरदराव मुख्यमंत्री झाल्यावर मला त्यांनी आमदार केलेलं. हे सगळं असूनही दादांनी खूप आत्मीय भावनेनं त्यांचं दुःख दोन-तीन तास आमच्याजवळ व्यक्त केलं. सगळा दरम्यानचा इतिहास सांगितला. खूप खूप हळहळ करून ते मोकळं होत राहिले. मी संबंधितांशी बोलणार नाही. त्यात कुठली मध्यस्थीही नव्हती. माझ्याशी बोलून काही उपयोगही नव्हता, उलट नकोच होतं, हे त्यांनाही माहीत होतं. तरीही दादा बोलले व मन मोकळं केलं. मी नाइयापरीनं दादांची समजूत काढली व त्यांना शांत केलं.

यशवंतरावांच्यासोबत मी असताना अनेक ठिकाणी दादा होते. माझ्या वडिलांच्या मृत्यूनंतर त्यांच्यासोबत मुख्यमंत्री असताना दादा माझ्या घरी आलेले होते. का कुणास ठाऊक वसंतदादा माझ्याशी खूप जिव्हाळ्यानं बांधले गेलेले होते. (माझं भाग्यच असं होतं की वसंतराव नाईक, वसंतदादा, शंकरराव चव्हाण, आणि एका घटनेनंतर बॅ. अंतुले यांनी माझ्यावर खूप प्रेम

केलं होतं. मी-यशवंतराव, मी-शरदराव अशा संबंधांचा राजकारणाचा कुठलाही संबंध आड न येऊ देता शंकरराव-अंतुले यांनी मला नेहमीच आत्मीयतेनं वागवलं!)

भारतीय बैठक. श्रोत्यांसमोर लहान व्यासपीठावर मी कवितेची पुस्तकं घेऊन बसलो. यशवंतरावांनी व्यासपीठावर माझ्याजवळ वसंतदादांना व त्या वेळचे भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती यशवंतराव चंद्रचूड यांना आग्रह करून बसविलेलं होतं. अशोक जैन यांनी पाच मिनिटांचं प्रास्ताविक केलं. वेणूताई सगळ्यांचं स्वागत करून झाल्यावरही सभागृहाच्या दरवाजाजवळच बसल्या. उशिरा येणाऱ्या प्रत्येकाचं पुन्हा उठून त्या स्वागत करीत होत्या. यशवंतराव व कित्येक रसिक समोर बसलेले होते. 'खेड्यातली मराठी कविता' हा कार्यक्रम मी मनसोक्त, कुठेही ढिला न होऊ देता पावणेदोन तास श्रोत्यांना सादर केला. बहिणाबाई चौधरी, बालकवी, ग.ल. ठोकळ, ना.घ. देशपांडे, भालचंद्र लोवलेकर, बी. रघुनाथ असे अकरा कवी मी वाचले. प्रत्येक कवीचा वाङ्मयीन परिचय, पाच-सहा कविता व गरज असल्यास थोडी टिप्पणी. सगळ्या श्रोत्यांनी उत्स्फूर्त, प्रचंड दाद दिली. शंभर वर्षांतलं खेडं, तिथली माणसं, जीवन, संस्कृती, सौंदर्य व दुःख, भावभावना त्या कवितांमधून रसिकांपुढे ठेवल्या. श्रोत्यांच्या मनात त्या खोलवर घर करून राहिल्या. भालचंद्र लोवलेकर, बी. रघुनाथ, ना.घ. देशपांडे यांच्यासारख्या तिथे जमलेल्या बऱ्याचशा श्रोत्यांना नव्या, अनोळखी वाटणाऱ्या कवींना मी अशा पद्धतीनं सादर केलं की आजही त्यांच्या कवितांच्या आठवणी ते लोकं दिल्लीत गेल्यावर काढतात. यशवंतरावांनी या कवींच्या कवितेचं सौंदर्य व लय ह्याची आठवण नंतर गप्पांमध्ये सतत काढली व पुन्हा पुन्हा त्या कवींविषयी विचारपूस करून माहिती करून घेतली.

पळसखेडच्या शेतकऱ्यांसाठी लहानशी तरी सोय व्हावी म्हणून 'कवयित्री बहिणाबाई चौधरी' सभागृहाला यशवंतरावांनी

आर्थिक देणगी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक केंद्राच्या नावानं मित्रमंडळींकडून दिली. मला हे अपेक्षित नव्हतं.

दुसऱ्या दिवशी यशवंतरावांकडे मी, माझी पत्नी, अशोक जैन व नरेश जेवायला होतो. जेवणाच्या टेबलावर बसलो. यशवंतराव मनमोकळं हसून म्हणाले, आज वेणूताईंनी पाहुणचार करताना व्हिजिटेरियन जेवणाची काळजी घेतलेली आहे.

मला कऱ्हाडच्या 'विरंगुळा'तल्या जेवणाची आठवण झाली. अचानक अपघातानं गेलेला त्यांचा आवडता डॉक्टर पुतण्या व सूनबाईंच्या आठवणीनं यशवंतराव व वेणूताई पुन्हा व्याकूळ झाले. दोन मिनिटं उगाच थोडी स्तब्धता आली. अशोक मधेच म्हणाला;

'नवी बातमी माहीत आहे का?'

'कोणती?' असं यशवंतरावांनी विचारलं.

'कमलापती त्रिपाठी काँग्रेसचे अध्यक्ष झाले.'

'काँग्रेस आणखी म्हातारी झाली.' एवढंच ते बोलले व हसले.

जेवण करताना व नंतर यशवंतरावांनी सतत मला कवितेत अडकवून टाकलं. काव्यवाचनातल्या सगळ्याच कवींच्या कविता त्यांना आवडलेल्या होत्या. मी खूप प्रभावीपणानं त्या वाचल्या म्हणून मनावर ठसल्या असं म्हणत होते. त्या कवींनासुद्धा त्यांच्या कविता इतक्या प्रभावीपणे मांडता येणार नाहीत असंही म्हणाले. भालचंद्र लोवलेकरांच्या चोरलकाठच्या ओळी पुन्हा सांगा असा आग्रह धरला.

'चोरलकाठ
पाऊलवाट
हळूहळू जाईल शामाराणी
घाटावर आणाया पाणी....'

- अशी ती कविता मी पुन्हा एकदा अख्खी म्हणून दाखवली. जेवणाच्या टेबलावर पुन्हा कविता नव्यानं सुरू झाल्या.

'नाघंचं एकच पुस्तक माझ्याजवळ आहे. दुसऱ्यातल्या तुम्ही वाचलेल्या कविता मला लिहून द्या' म्हणून त्यांनी आग्रह धरला. माझ्याजवळचे काव्यसंग्रह व लिहिलेल्या कविता मी त्यांना देतो म्हणून सांगितलं. त्यांची पुस्तकंच नाहीत. इतके चांगले हे कवी आपल्याकडले प्रकाशक, साहित्य-संस्कृती मंडळ, मी व इतरांनी पुन्हा पुन्हा सांगूनही छापत नाहीत असं सांगितल्यावर त्यांना फार वाईट वाटलं. त्यानंतर कधीतरी कुमार गंधर्वांकडे देवासला यशवंतराव स्वतःच एकाएक जाऊन आले. भालचंद्र लोवलेकर कवीचं इंदोरमध्ये कोणी आहे का असं विचारलं. जे लोक समोर होते त्यांना चोरलकाठच्या पाच-दहा ओळी त्यांनी म्हणून दाखविल्या. तिथे जमलेल्या लोकांना लोवलेकर माहीतच नव्हते याचं विलक्षण दुःख झाल्याचं त्यांनी नंतर मला सांगितलं.

आज कविता किंवा साहित्य असा विषय सभागृहात किंवा तिकडे कुठे शासनात निघाला तर त्या मंत्र्यांजवळ, काही मुख्यमंत्र्यांजवळ डोकं फोडून तो विषय सांगावा लागतो. तरीही त्यांना तो समजत नाही. शासकीय निर्णय घ्यायला बिल्कूल समजत नसल्यानं अडचणी व असमर्थता येते. तेव्हा मला व यशवंतरावांना जवळून पाहिलेल्या, ऐकलेल्या अनेक लोकांना यशवंतरावांच्या मुळातल्या रसिकतेची, साहित्याच्या अभ्यासाची, मुरब्बी जाण असलेल्या सुसंस्कृतपणाची व लेखक, कवी, कला, संस्कृतीवर नुसतं वरवरचं शाब्दिक प्रेम न दाखविता चांगल्या योजना महाराष्ट्राला देणाऱ्या सुसंस्कृत राज्यकर्त्याची आठवण पुन्हा पुन्हा येते.

नंतर दोन्ही दिवस मी त्यांच्या घरीच होतो. दुपारी त्यांच्या घरातला ग्रंथसंग्रह सहज थोडा वेळ पाहिला. तेवढंच त्यांचं खरं भांडवल व आयुष्यासाठी जमा शिल्लक आहे. ते मग यावरच बोलत राहिले आपल्याकडे व्यक्तिगत खाजगी ग्रंथसंग्रह फारच कमी असतो. खाजगी ग्रंथसंग्रहांची थोडी तरी वाढ व्हावी पण ती चांगल्या प्रमाणात होत नाही हे मी पाहिलं. अनेकांचं असंच मत आहे असं ते म्हणाले. दोनपाचशे चांगली पुस्तकं कोणताही

मध्यमवर्गीय माणूस सहज घेऊ शकतो पण सर्वत्र नाही. सार्वजनिक लायब्ररीमध्येही कविता, सामाजिक व राजकीय वैचारिक लेखन फार कमी वाचलं जातं असा निष्कर्ष आहे. तसं पाहणीत दिसून आलं आहे. वाचनालयाच्या अनुदानामध्येसुद्धा खूप वाढ झाली पाहिजे. आज ते फारच कमी आहे. त्यात सुधारणा होत नाही. इतरत्र आपण पैसा देतो त्यामानानं लायब्ररीला काहीच देत नाही. तिथेसुद्धा फारच चांगली निवडक पुस्तकं क्वचितच असतात. त्या त्या ठिकाणचे लोक त्यांना आवडतील तीच व पुष्कळदा नको तीच पुस्तकं लायब्ररीत अधिक ठेवतात. कुठेही आपल्याकडे इथे कोणी लक्ष देत नाही. तिथल्या ग्रंथपालालासुद्धा पगार नसल्यागत आहे हे फारच वाईट आहे. परदेशातल्या सुंदर चालविल्या जाणाऱ्या वाचनालयांसंबंधी, पुस्तकांची बांधणी, टिकाऊपणा व इतर खूप काळजी घेण्याच्या बाबतीत, तिथल्या वाचनालयातल्या शांत सोयीच्या अभ्यासिकेच्या बाबतीत, संदर्भ लायब्ररीच्या बाबतीत त्यांनी खूप सांगितलं. मोठ्या एकेका लेखकाच्या लेखनाचं स्वतंत्र दालन पाहिजे व त्या लेखकावरच्या आजवरच्या संपूर्ण लिखाणाची, संशोधनाची पुस्तकं त्या दालनात पाहिजेत. असं मुंबईत करता येण्यासारखं आहे. परदेशात फार काळजीपूर्वक व परिश्रमानं हे केलं जातं. शेक्सपिअर, वर्ड्स्वर्थ अशा लेखकांचीच नव्हे तर त्यांच्या जवळपास लहानमोठ्या लेखकांची स्मारकं व संदर्भ लायब्ररी याची जिवापाड काळजी घेतली जाते. त्यांच्या पुस्तकांचं हस्तलिखितांचं, साध्या साध्या पण महत्त्वपूर्ण ऐतिहासिक पत्रव्यवहाराचं काळजी घेऊन जतन करण्याची पद्धत आहे. एवढी साहित्यावर प्रेम करणारी रसिक जनता, समाज, राज्यकर्ते तिथे आहेत. थोडं फार तरी आपण त्यासारखं काही करावं. पण शक्य नाही. कोणीही यात फार गांभीर्यानं घेत नाही. कऱ्हाडला थोडं फार असं काम मी नगरपालिकेकडून सांस्कृतिक सभागृह व लायब्ररी उभारताना आता करून पाहतो आहे. कितपत जमेल ते पाहतो. कारण शेवटी तिथल्या लोकांच्या सहभागावर व

आस्थेवरच ते अवलंबून आहे. नुसतं माझ्यावर नाही. आपल्याकडे एशियाटिक सोसायटीच्या दुर्मिळ चांगल्या पुस्तकांना **वाळवी लागून** चांगल्या लायब्ररीची व पुस्तकांची कशी हेळसांड व मोडतोड चाललीय याचाही त्यांनी उल्लेख केला. नुसतं पुस्तकांच्या किमती कमी करा एवढंच सगळे म्हणतात, पण इतर वस्तूंच्या वाढत्या किमतीच्या प्रमाणात त्याही वाढल्या. तशा फार वाढल्या नाहीत. लोक स्वतःची पुस्तकं घेऊन वाचतील व वाचनालयांना अधिक अनुदान वगैरे दिलं गेलं तर थोड्या किमती कमी होतीलसुद्धा. पण तेही मला खरं वाटत नाही. केरळ व कलकत्त्यात हे प्रामुख्यानं दिसून येतं. परंतु मराठीच्या आजच्या सुंदर पुस्तकांपेक्षा त्यांचं प्रॉडक्शन व पुस्तकांचं देखणेपण बांधणी सगळं तसं पुष्कळ अंशी तकलादूच आहे. यावर विधान परिषदेत व खाजगीतही या वेळी मी वाचनालयाचं जास्ती लावून धरल्याचं व त्यासाठी अधिक कामकाज केल्याचं काही सदस्यांना बोलतं केलं तर थोडा फार उपयोग होईल, याचं त्यांना सांगितलं. त्यावर कोणी फार बोलत नाही व शासनकर्त्यांनाही असल्या विषयांमध्ये फारस रस वाटत नाही हे दुर्दैव आहे असं त्यांचं मत होतं.

पुस्तकं चाळताना माझा *'पावसाळी कविता'* काव्यसंग्रह हाती आला. यशवंतरावांनी लगेच वेणूताईंना बोलविलं. माझी पत्नी व वेणूताई आल्या. *'पावसाळी कविताची '* अर्पणपत्रिका वेणूताईंना व मला दाखवीत यशवंतराव म्हणाले, 'मी वेणूताईंना ही अर्पणपत्रिका पुस्तक प्रकाशित झाल्यावर माझ्याकडे आल्या तेव्हा दाखविली होती. तेव्हा त्या खूप आनंदित झाल्या होत्या. पण थोड्या संकोचल्या. मला कशासाठी अर्पण केलं असं म्हणाल्या होत्या. आता कवी समोर आहे. त्यांनी कवीला विचारावं.' मला बरंच बोलायचं होतं. पण मी काहीच बोललो नाही.

यशवंतरावांशी बोलताना मन मोकळेपणानं कृषी खात्यावर,

सांस्कृतिक खात्यावर, साहित्यकलेच्या शासनाच्या निष्क्रिय भूमिकेवर किंवा उथळ योजनांवर माझी काही मतं स्पष्टपणानं मांडली. या खात्यातल्या पुष्कळ चांगल्या योजनांना आवश्यक असूनही नीट न्याय मिळत नाही हे मी योजनांसकट संदर्भ देऊन बोललो. माझं म्हणणं अगदीच बरोबर आहे असंच ते म्हणाले. महसूल खातं किंवा त्यासारखं महत्त्वाचं मोठं खातं ज्या मंत्र्याकडे आहे त्यांच्याकडे पुन्हा सांस्कृतिक खातं उदाहरणार्थ दिलेलं असतं. शिक्षण खात्याच्या व्यापात पुन्हा ग्रंथ पारितोषिक, लायब्ररी, साहित्य-संस्कृती मंडळ, जन्मशताब्दी इत्यादी सगळं एकत्र असतं. पुन्हा एकदा उद्योगमंत्र्याकडे सामान्य प्रशासन, क्रीडा असं तिसरंच काही एकत्र केलेलं दिसून येतं. तो तो मंत्री त्याच्या मुख्य खात्याशिवाय फारसं लक्षही पुरवू शकत नाही. चित्रपट, मराठी चित्रपट, चित्रनगरी, कला, ललित कला, थोरांची जन्म वा स्मृतिशताब्दी , वाचनालयं, ग्रंथ पारितोषिकं, कलेच्या संबंधातली पारितोषिकं, योजना, कला संचालनालय, साहित्य-संस्कृती मंडळ, लोकसाहित्य या क्षेत्रांतल्या नव्या कल्पना व योजना, चांगल्या पुस्तकांचं पुनर्मुद्रण संपादन, इतिहास- संशोधन या अत्यंत महत्त्वाच्या विभागांकडे त्यामुळे फारच दुर्लक्ष होतं. इतकं महत्त्वाचं असूनही ज्यांना कळत नाही, किंवा या क्षेत्रात रस नाही त्या मंत्र्यांकडे हे विभाग आल्यावर फक्त करमणूक तेवढी होते.

राज्यात अन्न आणि पुरवठा, रोजगार हमी अशी नवीन स्वतंत्र खाती व मंत्री आपण निर्माण केले. या चित्रपट, साहित्य, सांस्कृतिक कार्यासाठी सगळं एकत्र करून एक मंत्री किंवा राज्यमंत्री दिला तरी पुष्कळ न्याय मिळू शकेल. नाहीतर आज कोणीही त्यात लक्ष घालीत नाही. सहजासहजी चालेल तेवढंच त्यात होत आहे. शरदराव मुख्यमंत्री झाल्यावर त्यांना व्यवस्थितपणानं असं करता येईल म्हणून मी १९७८ च्या सुमारास एक आराखडा करून दिला होता. त्यांनी ते का केलं नाही कळत नाही किंवा करणार असतील तोपर्यंत त्यांचं राज्य गेलेलं असावं.

यशवंतरावांना ही दृष्टी होती. हे असं नीट एकत्र करावं व त्याचं वेगळं खातं करावं हा यशवंतरावांचाही विचार होता, हे मला नंतर कळलं. या क्षेत्रातल्या बहुसंख्य योजना त्यांनीच नव्यानं सुरू केल्या व त्या क्षेत्रातले प्रश्न सोडविण्यासाठी कायमस्वरूपी व्यवस्था करून प्रतिष्ठा निर्माण करून दिली. ती त्यांची सगळी व्यवस्था व दालनं दुर्लक्षित झाल्यासारखी पुष्कळदा खिळखिळी झालेली पाहून फार दुःख होतं.

मधल्या काळात एसेम् जोशी, गोविंदराव तळवलकर, य. दि. फडके, सर्जेराव घोरपडे, भालचंद्र नेमाडे व अन्य काही लोकांकडे जुन्या कोणत्याही घटनांचे संदर्भ यशवंतरावांनी मागितले आहेत, ते पाठवायचे आहेत असं काही समजलं म्हणजे त्यांचं आत्मचरित्र लेखनाचं काम चांगलं चाललेलं आहे, पुढे गेलं आहे हे लक्षात येत होतं. त्या काळात आम्ही त्यांना भेटून त्रास देणाऱ्यांना थांबविण्याचं काम जमेल तेवढं करीत होतो. यशवंतरावांनी १९५७च्या संयुक्त महाराष्ट्राच्या संदर्भातली कागदपत्रं, काही माहिती मागितली तेव्हा दुसऱ्या खंडाच्या लेखनाला प्रारंभ झाला असावा हे लक्षात आलं. त्याच वेळी पहिला भाग *'कृष्णाकाठ'* लोकांसमोर आला. त्या पुस्तकाचं सगळ्याच थरांतल्या वाचकांकडून उत्स्फूर्त स्वागत झालं. यशवंतरावांनाही त्यामुळे पुढे लिहायचा उत्साह वाढला. दुसऱ्या व तिसऱ्या भागाची लोक फार उत्सुकतेनं वाट पाहत होते. *'कृष्णाकाठ'*चा प्रकाशन समारंभ इत्यादी सगळं लोकांनी आग्रह धरला होता तरी यशवंतरावांनी टाळलं त्या निमित्तानं मात्र श्री. सर्जेराव घोरपडे यांच्या घरी त्यांनी पाच-सात मित्रांना तेवढं बोलविलं. केवळ साहित्यावर त्यांच्याशी मनसोक्त गप्पा मारल्या. त्यांच्यासोबत जेवण घेतलं व सही करून *'कृष्णाकाठ'*ची एकेक प्रत भेट दिली. सर्वश्री शरदराव पवार, सौ. प्रतिभाताई, व्यंकटेश माडगूळकर, भालचंद्र नेमाडे, विनायकराव पाटील, गोविंदराव तळवलकर, गो. मा. पवार व मी आणि प्रकाशक सर्जेराव घोरपडे एवढेच लोक

त्या ठिकाणी होते.

दुसऱ्या खंडाच्या काही घटनांसंबंधी यशवंतराव सहज मित्रमंडळींशी बोलले. छान चर्चा झाली. महाराष्ट्रातल्या महत्त्वपूर्ण अशा ऐतिहासिक राजकीय घडामोडींचा काळ म्हणून सगळे दुसऱ्या खंडाची - *'सागरकाठ'*ची उत्सुकतेनं वाट पाहत होते.

वेणूताई वारल्या. यशवंतरावांचं त्यानंतरचं सगळंच जीवन पार बदलून गेलं. त्यांचं कशातच लक्ष लागेना. त्यांनी फार मनाला लावून घेतलं होतं. आणि ते साहजिक, नैसर्गिक होतं. आयुष्यभर फार मोठमोठ्या जबाबदारीच्या ठिकाणी असताना सावलीसारख्या वेणूताई त्यांच्याबरोबर राहिल्या. पण राजकारण व व्यासपीठापासून दूर राहिल्या. अबोल राहिल्या. यशवंतरावांच्या मोठेपणाच्या एवढ्या मोठ्या कालखंडात लोकसंग्रहात त्यांच्या मित्रांसाठी, येणाऱ्या-जाणाऱ्यांसाठी सदैव पाहूणचार करीत स्वागतशील राहिल्या. त्यांचं शांत, हसरं, प्रसन्न व्यक्तिमत्त्व सगळ्या महाराष्ट्रात जवळून परिचित होतं. वेणूताई गेल्या तेव्हापासून यशवंतराव खचले. कशातच त्यांना रस वाटत नव्हता. एकटे असताना ते घरात लहान मुलासारखे रडायचे. नाशिकला वेणूताईंचा अस्थिकलश गंगेच्या प्रवाहात सोडला तेव्हा यशवंतराव बाजूच्या खडकावर बसून वाहत्या पाण्याकडे डोळे भरून पाहत होते. खूप वेळ एकाकी सुनसान मनानं गोदावरीच्या काठी बसून होते. बाजूला प्रचंड गर्दीचा गराडा गजबजून होता. तरीही ते एकटेच होते.

यशवंतराव वेणूताईंच्या मृत्यूनंतर सार्वजनिक समारंभाला फारसे जात नव्हते. क्वचित एखादा कार्यक्रम स्वीकारीत असत. आत्मचरित्राचं कामही मंदावलं होतं. भेटणाऱ्यांच्या जवळ ते मोकळं होत नव्हते. हळूहळू ते स्वतःला सावरण्याचा प्रयत्न करीत, पण त्यांच्या घरातलं भकास एकटेपण त्यांच्या अंगावर येत होतं.

तसं फार जवळच्या आप्त मित्रांशी ते बोलून दाखवीत. पुष्कळदा कोंडणाऱ्या त्यांच्या घरातून त्यांना काढल्याशिवाय गत्यंतर नव्हतं. नंतर त्यांनासुद्धा एखाद्या समारंभाला लोकांमध्ये जावंसं वाटू लागलं. आयुष्यभर हजारो लोकांमध्ये एकजीव झालेले यशवंतराव, त्यांची जिव्हाळ्याची माणसं सभा सम्मेलनात भेटली म्हणजे पुन्हा बहरून आल्यागत वाटायचं. त्यांच्या बोलण्यात, वागण्यात पुन्हा थोडी फार टवटवी दिसायची.

औरंगाबादला श्री. बाळासाहेब पवार व काही महत्त्वाच्या कार्यकर्त्यांनी पुढाकार घेऊन शेतकऱ्यांचे नेते भाई उद्धवराव पाटील यांचा गौरव समारंभ आयोजित केलेला होता. यशवंतरावांना प्रमुख पाहुणे म्हणून बोलविलेलं होतं. यशवंतरावांनी स्वातंत्र्यपूर्वकाळात व नंतरच्या स्वातंत्र्यातल्या त्यांच्या दीर्घ सत्तेच्या संपन्न अशा काळात खूप मोठ्या ठिकाणी असतानाही काँग्रेसच्या माणसांबरोबरीनंच समाजवादी, कम्युनिस्ट, शे.का.प., भा.ज.प., रिपब्लिकन अशासारख्या सगळ्या वेगवेगळ्या पक्षांच्या नेत्यांशी सामान्य, कार्यकर्त्यांशी, सामान्य माणसांशी कमालीची जवळीक व आपलेपणाचे ऋणानुबंध जतन करून ठेवलेले होते. त्यांना शत्रू कधी मानलं नाही. विरोधी पक्षातल्या कितीतरी बड्या मंडळींशी खूप आदराचे व जिव्हाळ्याचे संबंध यशवंतरावांनी ठेवले. एसेम्सारख्या माणसांशी शेवटपर्यंत घरातल्या नात्यानं आदरानं वागले. औरंगाबादेला आलेले शेतकरी कामगार पक्षाचे शेकडो कार्यकर्ते यशवंतरावांशी जुन्या इतिहासातल्या काल-परवाच्या घटनांची आठवण देऊन मनसोक्त आपुलकीनं गप्पा मारीत होते. यशवंतराव कुठल्या कठल्या आठवणी सांगत होते व इतिहास उभा करीत होते. कार्यकर्त्यांच्या जवळ जायचे व विचारपूस करायचे. शेतकरी कामगार पक्षाचे, इतर समाजवादी पक्षाचे व अन्य कितीतरी जुन्या पिढीतले लोक यशवंतरावांशी खूप आपुलकीनं व आदरानं बोलत होते. शेतकरी

दिंडीत चांदूर रेल्वेला यशवंतरावांसोबत अटक झालेली माझ्या गावची वीस-पंचवीस तरुण मुलं मुद्दाम भेटीसाठी आलेली पाहून त्यांना फार बरं वाटलं. नामदेव सोनुने, देवचंद शिनगारे ही मुलं दिंडीत होती. शेतकऱ्यांची गाणी म्हणून मराठी कविता गाऊन रंजन करायची. ती आता मजुरी न करता थोडीबहुत शेती घेऊन पोटापाण्याला लागली हा शेतकरी दिंडीचा आपल्यासारख्या अनेक नेत्यांच्या विचारांचा प्रसाद आहे. आमचं जीवन बदललं, आम्ही नुसतं भेटायला, आशीर्वाद घ्यायला इथे आपल्याकडे आलो आहोत असं सांगितल्यावर यशवंतराव उल्हासित झाले व आमच्या मुलांशी खूप वेळ बोलले. त्या समारंभाची सुरुवात त्यांनीच शाहीर अण्णाभाऊ साठे व अमर शेख यांच्या क्रांतिगीतांनी करावी असं त्यांनी मला सुचवलं.

भाई उद्धवराव पाटलांचा डोळ्यांत भरावा, खूप काळ विसरता येणार नाही, इतका सुंदर देखणा भव्य सत्कार औरंगाबादेला झाला. एसेम् जोशी, यशवंतराव, एन.डी.पाटील, गणपतराव देशमुख, वर्धन, बापू काळदाते अशी त्यांच्यासोबत काम केलेली नामवंत मंडळी, खूप कार्यकर्ते, नेते सभा सम्मेलनात बोलले. भाई उद्धवराव पाटील, यशवंतराव यांचे संबंध जेव्हा उद्धवराव पाटील व यशवंतरावांच्या भाषणांमधून काही घटना, प्रसंग आठवणींतून लोकांसमोर आले तेव्हा बहुतेक नवे लोक ते ऐकताना थक्क झाले. सुसंस्कृत, सुजाण, परिपूर्ण राजकारण कसं करायचं असतं त्याचं एकमेव उदाहरण म्हणजे यशवंतराव चव्हाण. व्यासपीठावर सगळ्याच पक्षांची बडी मंडळी होती. विरोधापुरताच विरोध, तोही विशिष्ट काळापुरता मर्यादित, बाकी सगळे मिळूनच, सत्ताधारी व विरोधी असे एकत्र येऊनच राज्याचे, देशाचे प्रश्न सोडवायचे असतात. देशाची उभारणी करायची असते. यशवंतराव व एसेम् जोशी यांच्या भाषणांमधून हे महत्त्वाचं सूत्र प्रामुख्यानं सांगितलं गेलं. एसेम्, यशवंतराव, उद्धवराव या नेत्यांच्या दिवसभराच्या चर्चा, खाजगी चर्चा, गप्पागोष्टी ऐकल्यावर

व जिव्हाळा नि आदर पाहिल्यावर नव्यानं पुढारी झालेल्या व अपरिपक्व राजकारण करणाऱ्यांना फार अवघडल्यासारखं वाटलं. वेड्यासारखं पुन्हा पुन्हा हे खरंच आहे हे पाहत असूनही त्यांना खरं वाटेना. नवलाईचं, अद्‌भुत वाटलं.

बापूसाहेब काळदाते यांचं भाषण सुरू झालं तेव्हा पाऊस सुरू झाला. दहा हजार लोक सभामंडपात होते. अंगावर पाणी गळत होतं. कोणीही जागचं हललं नाही. उठले नाहीत. गडबड केली नाही. शांतपणानं पावसात थोडं भिजत ऐकत राहिले. थोड्या वेळानं पाऊस थांबला. बापूसाहेब काळदाते त्यांच्या लांबलचक पल्लेदार अलंकारिक वक्तृत्वानं बोलत गेले. शेतकऱ्यांच्या व दुष्काळाच्या प्रश्नांवर बोलले. बापूंच्यानंतर यशवंतराव बोलले.

बापूसाहेब बोलायला उभे राहिले तेव्हा पाऊस सुरू झालेला होता. बापू सुरुवातीला बोलताना म्हणाले होते, मी बोलायला उभा राहताच पाऊस आला वगैरे. दुष्काळी प्रदेश, पाणी यासंबंधी व शेतीच्या वाढत्या मोडकळीच्या प्रश्नांसंबंधी अगोदरच्या सगळ्या वक्त्यांचा उल्लेख करून यशवंतरावांनी काही योजना व उपाय गांभीर्यानं सांगितले. उद्धवरावांच्यासारख्या शेतकरी नेत्याच्या गौरवात ते जरूरीसुद्धा होतं.

यशवंतराव म्हणाले, 'आता सत्याऐंशी दुष्काळी तालुके राहिले नाहीत. आता शंभराच्या पुढे दुष्काळी तालुके गेले. तिथे पाऊसच पडत नाही, काय करणार? पावसाचा प्रश्न पहिल्यांदा गहन आहे. तो सुटला तर पुष्कळ गोष्टी सोप्या होतील. बापूसाहेब काळदाते यांची भाषणं सगळ्या दुष्काळी प्रदेशात व तालुक्यात ठेवा म्हणजे तेवढा तरी पाऊस हातचा होईल. आताच बापू म्हणाले म्हणून मी म्हणतो. एवढी पावसाची कळसूत्री आपल्या जवळच असल्यावर पुष्कळ आधार झाला. बापू, यशवंतराव, एसेम्, उद्धवराव सगळ्यांसकट प्रचंड टाळ्यांच्या कडकडाटात हसले. भाषण संपविलं.

मोजकं,नेमकं बोलण्याची कला यशवंतरावांजवळ होती.

भाई उद्धवराव पाटलांचा गौरव करताना भाईंच्या डोळ्यांत पाणी आलं. सगळेच भारावले. यशवंतराव खूप गौरवानं बोलले व म्हणाले, 'बाईसाहेबांचासुद्धा सत्कार आपण या वेळी त्यांच्यासोबत केला ही चांगली गोष्ट केली. त्यांच्या खडतर आयुष्यात बाईसाहेबांचा वाटा फार फार मोठा आहे.' आणि त्यांचे डोळे नकळत भरून आल्यासारखे वाटले. वेणूताईंची आठवण सहज त्यांच्या मनाला पांघरून गेली असावी.

समाजजीवनात आपण सगळेच मित्र आहोत. सहकारी आहोत. विरोधाचे काही क्षण, वेळा व प्रसंग तेवढे सोडून राष्ट्राच्या उभारणीत सगळ्यांचा वाटा व प्रतिष्ठा सारखीच आहे. केवळ सत्ताधाऱ्यांची ती नाही, हा विचार त्यांनी मुख्यतः मांडला. तसं आयुष्यभर जगले म्हणून त्यांच्या बोलण्याला विशेष अर्थ होता. महत्त्व होतं.

जळगावच्या अखिल भारतीय साहित्य सम्मेलनाच्या वेळी फक्त सम्मेलन दोन दिवसांवर आलं तेव्हा मी साहित्य महामंडळाचा अध्यक्ष झालो असं मुंबईहून जाहीर झालं. श्री. बाळासाहेब (मधुकरराव) चौधरी सम्मेलनाचे स्वागताध्यक्ष होते. यशवंतरावांनी जळगावच्या साहित्य सम्मेलनाला यावं म्हणून त्यांनी त्यांना बोलविलेलं होतं. यशवंतराव येणार होते. ऐनवेळी साहित्य सम्मेलनाच्या अध्यक्षपदाचा वाद इतका विकोपास गेला की कोर्ट कचेरी भानगडी सगळ्यांनाच नामुष्कीच्या झाल्या. मी एकटा काय करणार व किती करणार? माझं जळगाव हे कार्यक्षेत्र व जवळच्या संबंधातलं गाव असलं तरीही साहित्य महामंडळाचे सदस्य, ज्येष्ठ साहित्यिक, विशेषतः जळगावच्या सर्वच साहित्यिक, राजकीय, सामाजिक कार्यकर्त्यांनी सामंजस्य दाखवून खूप सहकार्य केलं म्हणून जळगावचं साहित्य सम्मेलन यशस्वी झालं. ती फार मोठी जबाबदारी, कसरत होती. खूप अडचणी होत्या. नंतर खूप

अभिनंदनाच्या तारा आल्या. सम्मेलन यशस्वी केल्यानं पुढल्या साहित्य सम्मेलनासाठी खूप निमंत्रणं आली. यशवंतरावांचं वृत्तपत्रातले मजकूर वाचून खास अभिनंदनाचं पत्र आलं. पद्मश्री शामराव कदम यांचा खूप आग्रह होता म्हणून पुढचं साहित्य सम्मेलन नांदेडला घ्यावं असं मी साहित्य महामंडळाचा अध्यक्ष म्हणून शिक्कामोर्तब केलं. सगळ्यांनीच होकार दिला. काकासाहेब गाडगीळ, सयाजीराव महाराज गायकवाड हे साहित्य प्रेमी साहित्य सम्मेलनाचे अध्यक्ष झालेले आहेत. नांदेडच्या साहित्य सम्मेलनाचं अध्यक्षपद यशवंतराव चव्हाण यांना द्यावं. त्यांना भेटून समजावून हे करता येईल म्हणून माझ्याकडे पद्मश्री शामराव कदम व महाराष्ट्रातल्या काही साहित्यिकांनी आग्रह धरला. बिनविरोध व निवडणूक न होता हे होत असलं तरच करा नाही तर शब्दही काढू नका असं या मुख्य मंडळींना चर्चेत सांगितलं. महाराष्ट्राला साहित्य, कला, संस्कृतीचा मोठा वारसा स्वातंत्र्योत्तर काळात देणाऱ्या एका राजकारणी साहित्यिकाचा भव्य सत्कार ह्या निमित्तानं नांदेडला करायचा महाराष्ट्रातल्या लेखक रसिकांचा विचार होता. सर्व घटक संस्था व साहित्य परिषदेच्या सदस्यांशी मी बोलणं सुरू केलेलं होतं. त्यात काहीच अडचण येणार नव्हती हे स्पष्ट झालेलं होतं. उलट सगळ्यांना हे नाव येत असल्याचा अपार आनंद होता. *'सह्याद्रीचे वारे'* *'ऋणानुबंध'* *'कृष्णाकाठ'*च्या लेखकाला या निमित्तानं अधिक लिहिण्याचीसुद्धा प्रेरणा सहज होईल असंही सगळ्यांना वाटत होतं म्हणून आग्रह होता. यशवंतराव तयार होणार नाहीत हे मला ठाऊक होतं. पण सगळ्यांची खूप इच्छा म्हणून मी प्रयत्न करायचं ठरविलं. मी नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात यशवंतरावांना पत्र लिहिलं. तुमच्याशी लवकर काही बोलायचं आहे. भेटीत सगळं सांगतो, कुठे भेटायचं ते सांगा. मी येतो. यशवंतरावांचं दोन-तीन ओळींचं पत्र आलं. २५ नोव्हेंबरला मी पुण्यात आहे. एसेम् जोशी यांचा ८१व्या वाढदिवसानिमित्त मोठा गौरवसमारंभ आहे. २६ ला मी पुण्याहून

कऱ्हाडला जाणार आहे. तुम्ही तिकडे या. बोलता येईल. यशवंतराव २७ला कऱ्हाडला लोकसभेसाठी उमेदवारी अर्ज भरणार होते. पुण्यात भेटून मी सोबत कऱ्हाडला येतो, असं मी त्यांना पुन्हा कळवलं.

२५ नोव्हेंबरला न्यू इंग्लिश स्कूलच्या सुंदर साधेपणानं सजवलेल्या पटांगणावर एसेम् जोशी यांचा ८१वा वाढदिवस साजरा झाला. देशातली एसेम् प्रेमी मंडळी फार मोठ्या संख्येनं आलेली होती. यशवंतराव चव्हाण संध्याकाळपर्यंत निश्चित येताहेत. सकाळी त्यांची प्रकृती थोडी बरी नव्हती एवढंच. पण ते अजूनही निश्चित वेळेवर येऊन पोहोचतील असं तिथले सगळे बोलत होते. स्वतः एसेम् जोशींचीसुद्धा यशवंतरावांनी यावं व या समारंभात भेटावं- बोलावं अशी खूप इच्छा होती. त्याप्रमाणे ठरलेलं होतं. सगळे त्यांची वाट पाहत होते. सायंकाळी सात वाजून चाळीस मिनिटांनी त्या सुंदर आयोजित केलेल्या गौरवसमारंभाची सांगता झाली. मी व्यासपीठाच्या समोरच बसलो होता. सात वाजून पन्नास मिनिटाला माझ्याकडे खूप धावपळीनं शरदराव आले. मला गाडीत घेतलं. कितीतरी भेटणाऱ्यांनी गाडीजवळ त्यांना कामानिमित अडवलं तरी त्यांना भरभर लोटून ते गाडीत बसले. एक शब्दही न बोलता शरदराव मला गाडीत टाकून सर्किट हाऊसवर घेऊन गेले. झटपट उतरून दुसऱ्या माळ्यावरल्या खोलीत घेऊन गेले. दरवाजा लोटला. शरदराव म्हणाले,

'साहेब गेले.'

'कोण साहेब?'

'चव्हाणसाहेब गेले. दिलीप पाटलानं फोन घेतला. राजीव गांधींचा दिल्लीहून फोन होता.' दोघंही शब्दही न बोलता घळाघळा रडत राहिलो.

सतत फोन.

दिलीपला फोनवर बोलता येत नव्हतं.

तो फोन घेत होता.

दिलीप पाटील त्या वेळी शरदरावांचा पी.ए. होता. (आता तो आमदार झाला आहे.)

दिलीपला फोनवर बोलणं कठीण झालं.

महाराष्ट्रातून देशातून रात्रभर माणसांच्या झुंबडी येऊ लागल्या.

शरदराव रात्रभर फोनवर बोलत राहिले.

मी त्यांच्याजवळ नुसता न बोलता रात्रभर ऐकत होतो.

दुसऱ्या दिवशी दुपारी मुंबईच्या विमानतळावर यशवंतराव चव्हाणांचा मृतदेह घेऊन येणार होते. किर्लोस्करांच्या छोट्या विमानात शरदराव पवार, सर्जेराव घोरपडे, आबासाहेब कुलकर्णी व मी असे चौघे सरळ विमानतळावर गेलो. त्याआधी मुंबईत जायची इच्छा नव्हती. पुण्यातही गेलो नाही. विमानतळ काठोकाठ, माणसांनी गच्च भरलेलं होतं. दिल्लीहून येणाऱ्या विमानाची लोक आतुरतेनं आणि जड अंतःकरणानं वाट पाहत होते. एक सुजाण, सुसंस्कृत, जनसामान्यांसाठी झिजणारं व्यक्तिमत्त्व विझलं होतं. सगळीकडे अंधार दाटलेला होता.

यशवंतरावांनी माझ्यासारख्या दूरवरच्या सामान्य मुलासाठी खूप प्रेम दिलं. मला मोठं केलं. एका कवितेतून हे झालं. त्यांनी व्यक्तिगत जीवनात मला फार मोठा आधार दिला म्हणून मी उभा राहिलो. माझ्या आयुष्यात त्यांचा वाटा फार मोठा व मोलाचा होता. अकरा वर्षांचा सहवास मला आयुष्यव्यापी झाला होता. त्यांनीच सांगितलेलं काम मी निष्ठापूर्वक, जमेल तेवढं करण्याचा प्रयत्न करतो आहे. प्रत्येक सुखाच्या व दुःखाच्या महत्त्वाच्या क्षणाला माझ्यासोबत आजही यशवंतराव असतात. माझ्या मनाचं तळघर त्यांनी व्यापून टाकलेलं आहे.

यशवंतरावांशिवाय महाराष्ट्राचा विचारच होऊ शकत नाही. कुठलीही अस्वस्थ करणारी घटना घडली, किंवा महाराष्ट्राच्या

सामाजिक-सांस्कृतिक जगात महत्त्वाची घटना घडली की मला यशवंतरावांची तीव्र आठवण येते. यशवंतरावांच्या संदर्भातलं माझ्या वाट्याला आलेलं सगळं काही सांगणं इथं शक्यच नाही. अनेक व्यक्ती, अनेक घटना, अनेक अनुभव आणि त्यावरची त्यांची मतं मी खोल जपून ठेवली आहेत, आणि ती सर्वांसमोर मांडावीत असं मला आज तरी वाटत नाही. यशवंतरावांबद्दलच्या या आठवणी, हे अनुभव यांना माझ्याजवळ वेगळं महत्त्व आहे. माझं जगणं समृद्ध करण्यात त्यांची विशेष जागा आहे. म्हणून हे एवढं लिहिलं- त्यांच्या पाचव्या पुण्यतिथीनिमित्तची ही एक विनम्र श्रद्धांजली म्हणूनही!

○○○

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान

यशवंतरावांशिवाय महाराष्ट्राचा विचारच होऊ शकत नाही. कुठलीही अस्वस्थ करणारी घटना घडली, किंवा महाराष्ट्राच्या सामाजिक-सांस्कृतिक जगात महत्त्वाची घटना घडली की मला यशवंतरावांची तीव्र आठवण येते. यशवंतरावांच्या संदर्भातलं माझ्या वाट्याला आलेलं सगळं काही सांगणं इथं शक्यच नाही. अनेक व्यक्ती, अनेक घटना, अनेक अनुभव आणि त्यावरची त्यांची मतं मी खोल जपून ठेवली आहेत, आणि ती सर्वांसमोर मांडावीत असं मला आज तरी वाटत नाही. यशवंतरावांबद्दलच्या या आठवणी, हे अनुभव यांना माझ्याजवळ वेगळं महत्त्व आहे. माझं जगणं समृद्ध करण्यात त्यांची विशेष जागा आहे. म्हणून हे एवढं लिहिलं- त्यांच्या पाचव्या पुण्यतिथीनिमित्तची ही एक विनम्र श्रद्धांजली म्हणूनही!

M92:
Mah
0159